# गोरेगाव उपनगरातील गणेशोत्सव व नवरात्रीउत्सवाचे बदलते स्वरुप :एक समाजशास्त्रीय अभ्यास.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
पदव्युत्तर अध्ययन व संशोधन विभाग,पुणे.

समाजशास्त्र या विषयात एम. फिल. पदवी करीता
सादर करण्यात आलेला लघुशोध प्रबंध.

संशोधिका
मुक्ता विनोद लव्हेकर.
(एम.ए.)

मार्गदर्शक
प्रा.डॉ. विजय मारुलकर.
प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख
एस.एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई ४०००२०
समाजशास्त्र विभाग.

नेहरु इंस्टीट्युट ऑफ सोशल सायन्सेस,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

फेब्रुवारी-२००९

# ऋणनिर्देश

एम. फिल. लघुशोध प्रबंधासाठी गोरेगाव उपनगरातील सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सवाचे बदलते स्वरुप : एक समाजशास्त्रीय अभ्यास हा विषय अभ्यासास घेउन मी त्यावर संशोधन केले आहे.

आजच्या काळात समाजातील लोकांची सार्वजनिक सण व उत्सव साजरे करण्याची पध्दती ही बदलत चालली आहे. लोकांचा कल हा मनोरंजन आणि मौजमजा करण्याकडे झुकत चालला आहे. आणि यामुळे सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्रीउत्सवाचा मुळ उद्देश हा बाजुला राहुन या उत्सवांना दहा दिवस मजा करण्याचे, साधन म्हणुन पाहीले जात आहे.

हे उत्सव सार्वजानिक स्वरुपात साजरे होत असल्या कारणाने संपुर्ण समाजच या उत्सवात सामील होत असतो. आणि या उत्सवा मार्फत जर लोकांना चुकीचा संदेश दिला जात असेल, आणि लोकांची उत्सवाप्रती मानसिकता बदलत असेल, त्याचा समाजावर आणि त्या सोबत पर्यावरणावर परीणाम होत असेल तर, हा विषय गंभीरतेने विचारात घेतला जाऊन त्यावर समाजशास्त्रीय दृष्ट्या अभ्यास करण्याची मला आणि डॉ. मारुलकर सर यांना आवश्यकता वाटली. त्यातुन **गोरेगाव उपनगरातील सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सवाचे बदलते स्वरुप : एक समाजशास्त्रीय अभ्यास** हा विषय चर्चेतुन निवडला गेला.

कुठल्याही व्यक्तीच्या जिवनात यश संपादन करण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीकडुन मिळणारी प्रेरणा ही त्या व्यक्तीच्या आयुष्यात खूप महत्वाची भुमीका ठरते. आणि हा प्रेरणा स्त्रोत हा अखंड झुळझुळणाऱ्या झऱ्यासारखा असणे म्हणजे दुधात साखरच !

प्रत्यक्ष संशोधन कार्यात उत्कृष्ठ मार्गदर्शन करणारे, अनेक समस्यांना तोंड देण्यासाठी खंबीरपणे पाठीशी उभे रहाणारे, कल्पकता जागृत करुन देणारे, तसेच संशोधनाचे कार्य जास्तीत जास्तं अचुकपणे कसे होइल या करीता सतत प्रयत्नशील असणारे आादरणीय मार्गदर्शक एस.एन.डी.टी. विद्यापिठातील समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजय मारुलकर सर यांच्या अचुक आणि वेळात वेळ काढुन केलेल्या मार्गदर्शनामुळे हे संशोधन मला पुर्ण करता आले. याबद्दल मी त्यांची सदैव आभारी राहील.

हे संशोधन करतांना मला टिळक विद्यापिठातील समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनुपमा केसकर मॅडम, डॉ. विशाल जाधव सर , आणि डॉ. जगन्नाथ कराडे सर सतत मदतशील राहीले. माझा प्रबंध आणखी चांगला कसा होइल या बाबत त्यांनी मला मार्गदर्शन केले. याबद्दल मी त्यांची सदैव ऋणी राहील.

तसेच गोरेगाव पूर्व आणि गोरेगाव पश्चिम येथील विविध गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव मंडळातील लोकांनी केलेल्या सहकार्या मुळेच मी हे संशोधन पुर्णत्वास नेऊ शकले. याबद्दल मी त्यांची सदैव आभारी राहील.

माझ्या प्रबंधाच्या कामात ज्यांनी माझा सतत उत्साह टिकवुन ठेवला आणि या संशोधन काळात मला समजुन घेतले त्या माझ्या कुटुंबीयांचे आभार मानणे हे औपचारीक असले तरी, त्यांच्या सहकार्या शिवाय हे संशोधन पुर्ण होउ शकले नसते.

हे संशोधन कार्य पुर्ण करण्यासाठी माझे मित्र आाणि मैत्रिणी यांची वेळोवेळी मला अतीशय मदत झाली, हे नमुद करणे मला आवश्यक वाटते.

हे संशोधन कार्य पुर्ण करतांना मला वेळोवेळी संदर्भग्रंथ पुरवणारे एस.एन.डी.टी. विद्यापिठ- चर्चगेट, मराठी ग्रंथालय-दादर, केशव गोरे स्मारक ट्रस्ट-गोरेगाव, टिळक महाराष्ट्र विद्यापिठ-पुणे येथील ग्रंथालय आणि त्यातील ग्रंथपाल यांची खूप मदत झाली. त्यांची मी खुप आभारी आाहे.

तसेच ज्या पुस्तकांची मला या संशोधन कार्यात मदत झाली आहे त्या पुस्तकाच्या लेखकांची मी सदैव ऋणी राहील.

**संशोधिका**

**मुक्ता विनोद लव्हेकर**

# अनुक्रमणिका


ऋणनिर्देश

कोष्टकांची यादी

आलेखांची यादी

| क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १) | प्रस्तावना | |
| २) | वाङ्मयीन आढावा | |
| ३) | संशोधन पध्दति | |
| ४) | तथ्यांचे विश्लेषण आणि अन्वयार्थ | |
| ५) | निरीक्षण आणि निष्कर्ष | |
| | संदर्भग्रंथ सूचि | |
| | मुलाखत अनुसूची | |

# प्रस्तावना

# (INTRODUCTION)

## प्रकरण १ले

# प्रस्तावना
# (INTRODUCTION)

जगात महोत्सव अनेक होतात पण सणांच्या बाबतीत म्हणाल तर आपल्या भारतात जेवढे सण आहेत तेवढे क्वचितच इतर देशात दिसुन येतील. भौगोलिक, ऐतिहासिक व धार्मीक महत्व असलेल्या सणांच्या बाबतीत आपण श्रीमंत आहोत. पण त्यातील बरेच सण आपण वेळेच्या अभावी कालबाह्य ठरवले आहेत.

भारताच्या तुलनेत ईतर देशात खुप कमी सण आहेत. जसे की अमेरीकेत आणि मुख्यतः पश्चिमी राष्ट्रांमधे 'ख्रिसमस' आणि नविन वर्षाच्या स्वागतासाठी न्यु ईअर असे दोन सण प्रामुख्याने साजरा केले जातात. तर मुस्लीम आणी अरब राष्ट्रांमधे 'ईद' मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते.

पण भारत देशाची गोष्टंच काही न्यारी आहे. विविध जातिचे, विविध धर्माचे, लोक आपापले सण गुण्यागोवींदाने साजरा करत एकत्रीत पणे रहातांना आढळुन येतात. भारतात कुठल्याही भागात जा तेथील सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मीक परिस्थितीत खुप फरक जाणवतो. कारण भारत हा विविधतेने नटलेल्या प्रथा अणि परंपरांचा देश आहे. तसेच भारतात अनेक विविध भौगोलिक परिस्थिती असणारे अनेक राष्ट्रं आहेत.

विविध राज्यात सुध्दा अनेक प्रकारचे सण व उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे होतात. उदाहरणार्थ, बंगाल मधे 'वसंतपंचमी' मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. तामिळनाडुमधे 'पोंगल' मोठ्या प्रमाणात साजरा होतो. केरळ राज्यात 'तिरुओणम' मोठ्या प्रमाणात साजरा होतो. आसाम मधे 'बिट्ठु' हा सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. गुजरात मधे 'दुर्गापुजा' मोठ्या प्रमाणात साजरी होते.

तसेच विविध धर्मात विविध सण साजरे केले जातात. मुस्लीम, पारसी, ख्रीश्चन, जैन, शीख, बुद्ध, असे अनेक धर्माचे लोक भारतात अनेक सण व ऊत्सव साजरा करतात. तसेच  विविध राज्यात पण अनेक सण व ऊत्सव साजरे केले जातात.

जसे की, मुस्लीम धर्मीयांत, 'इद-ए-मिलाद, मोहरम, शबे-मेराज, शब-इ-बरात, रमजान, शब-ए-कदर, रमजान इद, बकरी इद' हे सण साजरा होतात. पारसी समाजात, 'पारसी नववर्षारंभ, खोददाद साल, गाथा'  हे सण साजरे होतात. ख्रिश्चन धर्मीयांत, 'नाताळ, इस्टर, रविवार, नववर्षदिन' हे सण साजरा केले जातात. शीख धर्मीयांत, 'बैसाखी' हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. बुद्ध धर्मीयांत, 'बुद्धपौर्णीमा' मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. जैन धर्मीयात, 'श्रीमहावीर जयंती, आषाढ चौदस, पर्युषण पर्व, देवदिवाळी' हे सण साजरे होतात. आणि ज्यु धर्मीयात, 'रोष हरशाना, योम किज्युर, सुक्कोथ, हानुक्का, पूरीम, पेसह, शाबुओथ तिशआ-बे आब' हे सण साजरे होतात.

हिंदु धर्मीयांत मात्र अनेक सण साजरे केले जात असतात. तरिही काही सण असे आहेत की त्यामागे काही उद्देश आहेत. प्रथा, परंपरा आणि संस्कृती आहे प्रत्येक सणांमागे संस्कृती लपली आहे. प्रत्येक सणाचा असा

एक वेगळा असा इतिहास आहे. आणि प्रत्येक सणामागे एक वैज्ञानिक कारण आहे.

'गुढीपाडवा' या सणापासुन हिंदु सणांची सुरुवात होते. गेल्या काही वर्षात गुढीपाडव्याचं स्वरुप अमुलाग्र बदलत आहे. आता दारात गुढी ऊभारण्या पलीकडे हा सण साजरा होत आहे स्वागतयात्रा, नववर्षाचे कार्यक्रम, गुढीपाडवा विशेष ऊपक्रम अशा विविध अंगांनी हा सण साजरा होऊ लागला आहे. यातुन मोठ्या प्रमाणात मराठी जनता एकत्र येऊ लागली आहे. नव्या पिढिला गुढीपाडवा ही एक्साईटमेंट वाटु लागली आहे.

यानंतर येणारा सण म्हणजे 'रामनवमी'. राम जन्माचा हा सण. या दिवसाची एक सुट्टी मिळत असली तरी, राम हा देव की राजा? या वादात अनेक जण अडकलेले असल्यामुळे हा सण कधी येतो आणि कधी जातो हे कळतही नाही. राममंदीरात दुपारी बारा वाजता रामाचा जन्म होतो. फटाके वाजतात, दिवस संपतो. फारतर कीर्तन ऐकण्याच्या पलीकडे या सणाचा गाजावाजा होत नाही. आणि तिच गत 'हनुमानजयंती' आणि 'दत्तजयंतीची' आहे.

'अक्षयतृतीया' हा साडेतीन शुभमुहुर्तापैकी एक मुहुर्त आहे. त्यामुळे या दिवसाचं महत्व अजुन अबाधीत आहे. अनेक कार्यक्रम आयोजीत करुन हा दिवस साजरा केला जातो. गुढीपाडव्याप्रमाणेच या दिवशी अनेक नव्या ऊपक्रमांची सुरुवात केली जाते. तसेच या दिवशी अनेक जण शुभ दिवस असल्याने, सोने खरेदी व इतर मोठ्या वस्तुंच्या खरेदीला लोक गर्दी करतात.

याच दरम्यान येतो तो 'महाराष्ट्रदीन'. आपल्या राज्याची स्थापना झाली तो दिवस. हा दिवस सणांमधे येत नसला तरी या दिवसाचं महत्व लक्षात घेता इतर कुठल्याही सणांपेक्षा तो कमी नाही. पण आज मात्र एक सरकारी सुटी एवढंच महत्व या दिवसाला ऊरलं आहे.

महाराष्ट्रातिल सणांचा हा एक आढावा आहे. अमुक एक सण हा साजरा करणे, मानणे न मानणे हा एक वेगळा मुद्दा आहे. आपले सण किती आणि त्यातले आपण किती साजरे करतो किंवा साजरे करत नाही हा वेगळा मुद्दा आहे, फक्त त्याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातही कुठले सण मोठे आणि विशेषतः सार्वजनिक पध्दतिने साजरे केले जातात. याचा पण एक अभ्यास केलेला आहे. यात मुख्यतः 'गणेशोत्सव व नवरात्रीऊत्सव' यांचा अभ्यास यात विष्लेषणात्मक पध्दतीने केलेला आहे.

सणांना सार्वजनिक महत्वं आलं की त्याच्या कक्षा रुंदावत जातात. आणि मग घराच्या चार भिंतीत साजरे होणारे सण सार्वजनिक स्वरुपात अधिक मोठ्या प्रमाणावर साजरे होऊ लागतात. असं झालं की, त्या सणांचं महत्वं पण वाढतं आणि दरवर्षी त्या सणांची वाटही पाहिली जाते.

आपल्याकडे संपुर्ण श्रावण महिना हा असाच ऊत्सवांचा मानला जातो. पण त्या आधी ज्येष्ठ महिन्यात येणारी 'वटपोर्णीमा' हा सण साजरा करणाऱ्या अनेक सतिसावीत्री असल्याने अजुनही हा सण आपले अस्तीत्व ग्रामीण भागात टिकवुन आहे. पण आजकाल शहरी भागातील महिलावर्ग मोठ्या उत्साहात हा सण साजरा करत आहेत. हा सण कसा साजरा करावा याबाबत अनेक मतमतांतरं आहेत. हा सण ईकोफ्रेंडली साजरा करण्याकडे समाजाचा कल झुकत आहे. या विचारधारेमुळे या सणाला वेगळं महत्व प्राप्तं झालेलं आहे.

'आषाढी एकादशी' हा सण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सारख्याच उत्साहाने साजरा केला जातो. या सणाचं महत्व राखण्यात आणि ते वाढवण्यात महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाची भुमिका महत्वाची ठरते. आषाढीला हे वारकरी आळंदीहुन पंढरपुरला येतात आणि कार्तीकीला हे वारकरी पंढरपुरहुन आळंदीला येतात. पंढरपुरच्या विठ्ठलाचं दर्शन घेतात. सर्व धर्मियांना समभावी पध्दतिने वागवणारा हा सण वारकरी एकमेकांना

आदर देऊन एकमेकांच्या पाया पडुन आलींगन देऊन साजरा करतात. हजारो वारकरी या सणानिमित्तं एकत्र येत असतात.

शहरात मात्र एक दिवसाचा उपवास म्हणत उपवासाचे पदार्थ खाण्याशिवाय या सणाचं महत्वं ऊरलेलं नाही.

आषाढ महिन्या नंतर येणारा श्रावण महिना सणांची रेलचेल घेऊन येणारा. या महिन्यातील कुठलाही सण असो 'नागपंचमी' असो वा 'नारळीपोर्णीमा' या सणांचं नातं निसर्गाशी पर्यावरणाशी आहे. निसर्गात होणाऱ्या बदलांशी निगडीत हे सण असुन त्याची पुजा मांडणारे हे सण आहेत.

आता 'नागपंचमीला' नागाची पुजा केली जाते. या सणाच्या मागे किंवा हा सण सुरु होण्याच्या मागे निसर्गातील प्रत्येक प्राणी हा महत्वाचा आहे हे हिंदु धर्म संस्कृती सांगते. पण नागाला न मारता न पकडता पण हा सण साजरा केला जाऊ शकतो.

तर 'नारळीपोर्णीमा' हा सण समुद्राची पुजा केली जाऊन साजरा केला जातो. तसेच हा सण राखीपोर्णीमा म्हणुन पण साजरा केला जातो. भावा बहिणीच्या प्रेमाचे दृढ प्रेमाचे प्रतीक म्हणुन हा सण साजरा केला जातो.

'गोकुळाष्टमिच्या' दिवशी कृष्णजन्मं साजरा केला जातो. त्याच्या दुसऱ्या दिवशी गोविंदा रे गोपाळा च्या गजरात मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात 'दहीहंडी' फोडली जाते. मुंबईत आता या सणाने मोठे स्वरुप धारण केले आहे, राजकीय पार्ट्या पण या सणात मोठ्या प्रमाणात बक्षीसे जाहीर करतात.

पण इतर ठिकाणी मात्र हा सण रात्री बारा वाजता भजनं म्हणुन कृष्णजन्मं साजरा करणे व दुसऱ्या दिवशी गोपाळकाल्याचा नैवेद्यं वाटणे एवढाच हा सण सिमीत आहे.

तसेच 'श्रावणी सोमवार' म्हणजे श्रावण महीन्यातिल प्रत्येक सोमवारी ऊपवास आणि या महिन्यातिल प्रत्येक मंगळवारी नवविवाहीता मंगळागौरीची पुजा करतात. लग्नानंतरची पहिली पाच वर्षे नवविवाहीता हा सण साजरा करतात.

'श्रावण वद्यं अमावस्या' हा सण म्हणजे 'पिठोरी अमावस्या', म्हणजे 'मातृदिन'. जन्मदात्रीचे ऋण मानायचा हा दिवस इंग्रजी संस्कृतीत 'फादर्स डे' आणि 'मदर्स डे' साजरा केला जातो. पण मराठी संस्कृतीत मातेचे ऋण मानण्याचा हा दिवस आहे.

वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलाविषयी कृतज्ञता बाळगणारा 'पोळा' हा सण. या दिवशी बैलांना सजवुन पुरणपोळी खाऊ घातली जाते. त्यांना शेतातल्या कामातुन एक दिवस सुटी दिली जाते. त्यांची पुजा केली जाते. पण हा सण खेडेगावा पुरताच सिमित राहीला आहे. शहरात हा सण कधी येतो आणि कधी जातो ते कळतही नाही.

या प्रकारे श्रावण महिन्यात सुरु झालेली सणांची ही रांग सुरु होते आणि मग असते ती 'हरतालीका' स्त्रीया व मुली उपवास करुन महादेवाची पुजा करतात. 'वटपोर्णीमे' प्रमाणेच महीलांशी निगडीत असा हा सण अजुनही साजरा करतात.

भाद्रपद शुध्दं पंचमीला 'ऋषीपंचमी' असते. ऋषीपंचमी ही ऋषींबद्दलची निष्ठा व्यक्तं करायचा दिवस.

पण या महीन्यात मुख्यं आकर्षण असतं ते 'गणेशचतुर्थीचं'. सण असावा तर असा असं या सणाच्या बाबतित म्हणावं वाटतं ईतक्या

थाटामाटात व उत्साहात हा सण साजरा होतो. खरंतर गणेशचतुर्थी हा एक दिवसाचा सण पण त्याचं रुपांतर महोत्सवात झाल्याने या सणाकडे सगळ्यांचं लक्षं लागुन रहातं. आता तर हा सण ग्लोबल स्वरुपात रुपांतरीत झालाय. या गणपती बरोबर येणाऱ्या गौरीचं पण जोरदार स्वागत केलं जातं.

गणेशोत्सवानंतर चाहुल लागते ती 'नवरात्रीउत्सवाची'. या उत्सवात नऊ दिवस घटात धान्य ऊगवुन देविची पुजा केली जाते. पण आजच्या पिढीला गुजरात मधुन आलेला गरबा म्हणजेच नवरात्र हेच समीकरण आजच्या पिढीला माहिती असलं तरी हा सण महाराष्ट्राचा पण आहे. घटस्थापने पासुन या सणाला सुरुवात होते. व पुढे नऊ दिवस नवमी पर्यंत हा सण महाराष्ट्रात साजरा केला जातो. भोंडला किंवा हादगा, घागरी फुंकणं, हळदिकुंकु असे अनेक महिला विश्वाशी निगडीत कार्यक्रम याच नवरात्रीऊत्सवात पार पडतात.

त्या नंतर दहाव्या दिवशी येतो तो 'दसरा' हा सण, म्हणजे 'विजयादशमी'. साडेतीन मुहुर्ता पैकी एक. नऊ दिवस चाललेले देव दानवातिल युध्द संपवुन पार्वतिने या दिवशी काशीत प्रवेश केला, आणि रामाने याच दिवशी रावणाचा वध केला. असं या दिवसाला दुहेरी महत्वं आहे.

त्या नंतर येते ती 'कोजागिरी पौर्णीमा'. हा सण अजुनही चंद्राला ओवाळुन आणि मसाला दुध वाटुन साजरा होतो.

त्या नंतर येते ती 'दिवाळी'. चार दिवसांचा हा सण. 'धनत्रयोदशी, पाडवा, लक्ष्मीपुजन, आणि भाऊबीज'. संपुर्ण देशभरात हिंदु धर्मीयांत या सणाला अनन्य साधारण महत्व आहे. आनंद, सुख, समृध्दी घेऊन हा सण येतो असं मानलं जातं. या सणाचं सेलिब्रेशनही वैयक्तीक आणि

सार्वजनिक अशा दोन्ही स्तरांवर मोठ्या प्रमाणावर होतं. नविन वर्षाचं कॅलेंडर घरी आलं की पहिलेंदा दिवाळी कधी आहे हेच पाहीलं जातं. भारतीयांचा हा एक मोठा सण आहे. फटाके, मिठाई, नवीन कपडे व भेटिगाठी हे या सणाचं अप्रुप आहे.

जानेवारी महिना सुरु झाला की वेध लागतात 'मकर संक्रांतीचे'. जानेवारीच्या १४ तारखेला ठरावीक दिवशी येणारा हा पहिला मराठी सण. जानेवारीत थंड हवामान असल्याने ऊष्ण तिळ व गुळ यांच्या पासुन तयार केलेले पदार्थ या सणाच्या दिवसात केले जातात. या सणाचा संबंध पण पर्यावरणाशी आहे. सुर्याची पुजा याच दिवसात केली जाते. जवळपास १५ दिवस हा सण साजरा केला जातो. 'तिळगुळ खा आणि गोड बोला' म्हणत राग रुसवे दुर केले जातात.

'महाशीवरात्र' हा फेब्रुवारीत येणारा सण. महाराष्ट्रात हमखास ज्या दिवसात ऊपवास केला जातो त्या दिवसां पैकी हा एक दिवस.

त्या नंतर येते ती 'होळी' आणि 'धूलिवंदन'. हा सण महाराष्ट्रात 'शिमगा' या नावाने साजरा होतो. होळीच्या दिवशी जाळण्यात येणाऱ्या गोवऱ्या व आता पर्याय शोधुन आता ईकोफ्रेंडली ऊत्सव करण्याकडे लोकांचा कल दिसुन येत आहे. तर धुलीवंदन अर्थात धुलवड हा सण ईकोफ्रेंडली कसा करता येईल याकडे सर्वजण लक्ष पुरवत आहेत. धुळवडिला ऊडवण्यात व लावण्यात येणारे रंग हे नैसर्गीक असतील याकडे सर्वजण लक्ष पुरवत आहेत. (संदर्भ - महाराष्ट्र टाइम्स दि.१९ मार्च २००७)

असे हे महाराष्ट्रातील सण. प्रत्येक ऋतुचं आणि संस्कृतिचं जतन करणारे हे सण भारतात तर आहेतच पण प्रामुख्याने महाराष्ट्रातील आहेत . आता गणेशोत्सव आणि नवरात्रीउत्सव ही महाराष्ट्राची ओळख जगभर

झालेली आहेच त्या बद्दल जरा सवीस्तर माहिती जाणुन घेण्याचा प्रयत्न करुया.

## गणेशोत्सवः–

'लोकमान्यं टिळकांनी' सुरु केलेला सार्वजनिक गणेशोत्सव आता ग्लोबल स्वरुपात साजरा केला जाऊ लागला आहे. महाराष्ट्रातच नाही भारतातच नाही तर संपुर्ण जगभर गणेशोत्सवाची तयारी सुरु होते. दरवर्षी प्रमाणे गणेशोत्सव जवळ आला की अनेक गोष्टी घडु लागतात. मांडवाचा आकार त्यासाठीचे खड्डे, गणेश मंडळासाठीचा विज पुरवठा, कार्यकर्त्यां कडुन वर्गणीसाठी दिल्या जाणाऱ्या धमक्या, अतिरेक्यांची भिती, असे अनेक विषय या दरम्यान चर्चेस सुरु होऊ लागतात.

गणेशोत्सव सुरु होतो. त्या वेळेस हेच विषय पुढे जाऊन ध्वनिप्रदुषण, गणेश विसर्जन नदीत करावे की कृत्रीम तलावात, की समुद्रात येथपासुन ते मिरवणुकीचा वाढत जाणारा वेळ, मिरवणुकी मधील कार्यकर्त्यांचे वर्तन ,पोलीस यंत्रणेवर येणारा अतिरीक्त ताण अशा अनेक गोष्टींवर चर्चा होत रहाते. ती याच मार्गाने वर्षानुवर्षे सुरुच आहे.

लोकमान्यं टिळकांनी सुरु केलेला सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात करुन देखील '११०' वर्षापेक्षा अधीक काळ सरुन गेला आहे. स्वातंत्र्य चळवळ एकसंध व्हावी यासाठी केला गेलेला हा एक प्रयत्न होता. पुढे कालानुरुप त्याच्यामधे अनेक बदल होत गेले. स्वातंत्र्या पुर्वी पर्यंत या उत्सवाची संपुर्ण सुत्रे ही समाजाचे संपुर्णपणे पुढारपण करणाऱ्यांच्या मंडळीच्या हाती होती. या उत्सवाची सर्व कार्ये ही पुढारी लोकं करत असत. या सर्वाचा शब्दं ऊत्सवात प्रमाण मानला जात असे (संदर्भ - श्रीगणेशोत्सवाची साठ वर्षे पान क्र.-८).

त्या नंतर या उत्सवाची संपुर्ण सुत्रे ही तरुणांनी सर्वार्थाने त्यांच्या हातात घेतली. तरुणांनी गणेशोत्सव हा आपले नेतृत्व सिध्द करण्याचे व्यासपीठ या अर्थाने त्याचा वापर सुरु केला. त्यातुनच समाजाने त्यांना पुढारपण देऊ केले. नगरसेवक, महापौर, आमदार अशा अनेक पायऱ्या गणेशोत्सव मंडाळाचे कार्यकर्ते चढु लागले. वेगळेपण सिध्द करण्यासाठी देखावे ऊभे करणे, अनेक प्रकारचे सांस्कृतीक  कार्यक्रम आयोजीत करणे, असे अनेक उपक्रम या तरुण  पिढीने राबवले. हे सर्व उपक्रम कलावंतांचा उत्साह व ऊपक्रमशीलता वाढवणारे होते. या काळात गणेशोत्सवाची आरास व सजावट करण्याची जबाबदारी पण स्थानीक कलावंतच स्व खुशीने स्वतःचा वेळ खर्चुन स्विकारत होते. लोकवर्गणी हेच त्या काळात उत्पन्नाचे साधन होते. समाजातिल मध्यम व ऊच्चं वर्गातील कार्यकर्ते ही या उत्सवाची शक्ती होती. (संदर्भ - श्रीगणेशोत्सवाची साठ वर्षे पान क्र–११)

## विधायकता संपु लागली:–

'१९८० ते १९९०' च्या दशकात गणेशोत्सव सार्वजनिक होण्याचा मुख्यतः वाढण्याचा काळ होता. या काळात उत्सवांची संख्या झपाट्याने वाढली. महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर गावा गावात या उत्सवांचे लोण पसरले. व्याख्याने, पुराणे, किर्तने हाच उत्सवाचा प्रमुख ऊद्देश होता. या उत्सवात व्याख्याने ही मुख्यतः राजकिय, सामाजिक, आर्थीक विषयावर होत असत. यामधे हिंदु संघटनेचा प्रचार केला. मद्यपान बंदी, स्वदेशी, पैसाफंड ई. विषयांचा प्रचार केला गेला. या काळात तालमीचे आखाडे काढले गेले. कोणी मेळ्यातुन लष्करी शिस्तं शिकवली, तर कोणी ईतर चळवळींचा गुप्तपणे प्रचार केला. (संदर्भ- श्रीगणेशोत्सवाची साठ वर्षे पान क्र–१४)

याच काळात सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्वरुप पुन्हा बदलले. वर्गणीच्या धमक्या, पत्ते,जुगार ई. प्रकार सुरु झाले.

## १९९० चे दशक :–

'१९९०' च्या दशकात गणेशोत्सवाचे स्वरुप पुन्हा बदलले. सांस्कृतिक कार्यक्रमा ऐवजी विद्युत रोषणाई करण्याकडे सार्वजनिक गणेशोत्सवाचा कल वाढला. कार्यकर्त्यांचा सहभाग वाढला असला तरी, त्याचे विधायकपण सरु लागले.

वर्गणी साठी वाढणाऱ्या धमक्यांबरोबरच प्रसंगी जुगार आणी पत्ते पण खेळले जाऊ लागले. मिरवणुकीमधे बेताल नाच आणि अंगविक्षेपपण याच काळात सुरु झाले. सामान्य मध्यम वर्गीय माणुस याच काळात ऊत्सवातुन बाजुला सारला जाऊ लागला. पण काही प्रमाणात का होईना उच्चवर्गीय कार्यकर्ते या काळात पण या ऊत्सवात सहभागी होते. त्यांच्या म्हणण्याला काही प्रमाणात का होईना मान दिला जायचा.

## उत्सव ते उद्योग:–

नंतर मात्र या गणेशोत्सवाचे उत्सवाची ओळख काही मंडळींचा उद्योग असे स्वरुप प्राप्तं होऊ झाले. उत्सव ही उत्पादनाचे जाहिरात करण्याची ऊत्तम संधी आहे, हे लक्षात घेऊन अनेक कंपन्यांनी गणेश मंडळांना मुक्तं हस्ते निधी देण्यास सुरुवात केली. पहाता पहाता या कंपन्यांनी हा ऊत्सव आपल्या ताब्यात घेतला. कोणत्या मंडळांकडे किती प्रायोजक आहेत यावर त्यांचे महत्व अणि मान ठरला जाऊ लागला.

सहाजीकच देखावा ऊभारण्यासाठी आणि मिरवणुकीचा खर्च हजारांवरुन लाखांच्या घरात गेला.

पुर्वी कार्यकत्यांनी केलेल्या देखाव्यांमधे व्यावसाईक सफाई नसायची, तरिही बघणाऱ्यांमधे त्या बद्दल कौतुक असायचे . ही आरास करण्यासाठी त्या पुर्वीचे पंधरा वीस दिवस रात्रीचा दिवस मंडळांच्या खऱ्या कार्यकत्यांनी केलेला असायचा.

'१९९५' नंतर मात्र ही प्रथा बदलली. जागतिकीकरण झाल्याने मध्यम वर्गाकडे जरा जास्तं पैसा आला. सहाजीकच वर्गणीची रक्कम वाढली. आलेल्या मंडळांनी थेट व्यावसायीकांनाच देखावे करण्याचे कंत्राट दिले गेले. त्यामुळे देखाव्यांची भव्यता वाढली, सुबकता वाढली आणि कल्पकता निश्चीतपणे वाढली, पण त्यातील आत्मीयता मात्र हरवली. (संदर्भ - महाराष्ट्र टाईम्स दि.-३ ऑगस्ट २००८)

## गणपती उत्सव हा फेस्टीव्हल झाला:—

गणेशोत्सव हा सार्वजनिक गणेशोत्सवातुन फेस्टीव्हल झाला. पण फेस्टीव्हल मधे विस वर्षापुर्वी होणाऱ्या कार्यक्रमांवर आणि आत्ताचे कार्यक्रम यांचा धावता आढावा घेतला तर या प्रवासातील वेगळेपण दिसुन येईल. कधी काळी या फेस्टीव्हलमधे महाराष्ट्राच्या लोकधारेला प्रमुख स्थान होते. आता मात्र विदेशातील कसरतपटुंच्या कसरती, बिभत्सं नृत्यं हेच या ऊत्सवाचे आकर्षण ठरत आहे.

व्यावसायीकते मध्ये सुरवाती पासुनच चार पावले पुढे असणाऱ्या फेस्टीव्हलचे रुप हेच पढील दहा वर्षातील सार्वजनिक गणेशोत्सवाचे असणार का हा प्रश्नं पडल्या शिवाय रहात नाही. दहीहंडीमध्ये काही मंडळांच्या वतीने दाखवण्यात येणारा लेसर शो हे याचेच निदर्शक आहे.

## योग्यं नेतृत्व हवेः–

एकुणच आता हा प्रश्न पडु लागला आहे की हा उत्सव कोणाचा ? जरी काळाच्या ओघात बदल हा नैसर्गीक आहे हे जरी मान्यं केले तरी, सार्वजनिक गणेशोत्सवातील बदल हा निर्णायकी अवस्थेकडे चालला आहे. या ऊत्सवाला काहीतरी वेगळेपण देणे आवश्यक आहे. आणि लोकांपर्यंत हे पोहोचवणे पण तितकेच आवश्यक आहे. हा विचार काही लोक करत आहेत, आणि त्यासाठी काही प्रयत्न पण करत आहेत.

या उत्सवाला विधायक वळण देण्यासाठी योग्यं नेतृत्वं हवे त्याचा वापर करुन घेणारे पुढारी नकोत. पण आज नेमके हेच घडत आहे. गणेशोत्सवाचा वापर स्वताःच्या फायद्यासाठी मतदार संघ वाढवण्यासाठी स्वताःच्या राजकीय पार्ट्याचे बॅनर लावुन जाहीरात करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सवाचा वापर केला जात आहे. यासाठी हवा तितका पैसा हे पुढारी उत्सवात ओतायला तयार आहेत. आणि हव्या तितक्या सोई, सुवीधा ते या उत्सव मंडळांना द्यायला तयार आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव जर विधायक मार्गाने न्यायचा असेल तर त्यासाठी त्याचे नेतृत्व सुध्दा हुशार, विज्ञानवादी आणि पर्यावरणवादी हवे. पण आज नेमके ऊलट हे घडत आहे.

## लोकांचा सहभाग महत्वाचा :–

या सर्वा बरोबर हा उत्सव सर्व समावेशक होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. समाजातील कोणताही वर्ग हा या उत्सवा पासुन बाजुला होऊन चालणार नाही. कारण जितका समाज या उत्सवा पासुन तुटत जाईल तितका हा ऊत्सव चांगल्याकडुन वाईटाकडे आणि एककेंद्री होत जाईल, संकुचीत होत जाईल. समाजातील कोणत्याही वर्गाने या उत्सवातुन

नाके मुरडुन चालणार नाही. जितका लोक सहभाग वाढेल तितके नवीन विचार या ऊत्सवात वाढत जातील.

एकुणच गणेशोत्सव सुरु होऊन त्या मागील सामाजीक , सांस्कृतीक पार्श्वभुमीचा हा धावता आलेख , आढावा पाहीला.

## मुंबईचा बदलता गणेशोत्सवः–

मुंबईकरांचा खऱ्या अर्थाने जुना असा उत्सव म्हणजे गणेशोत्सव. अन्यं शहरांच्या तुलनेत गणेशोत्सव साजरा करण्याचि तऱ्हा ही वेगळी आहे. गेल्या काही वर्षात या उत्सवाचं स्वरुप अमुलाग्र बदलले आहे. आताच्या मुंबईकरांना फक्तं गणपतीचं दर्शन घेण्यापुरताच वेळ आणि इंटरेस्ट असतो.

लोकमान्यं टिळकांनी सुरु केलेल्या गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरुप दिलं आणि पहाता पहाता तो घराघरात साजरा होऊ लागला. गेल्या काही वर्षात सार्वजनिक गणेशोत्सवाचं समीकरण बदलंत चाललं आहे. गणेशभक्तांची संख्या तर लाखांच्या घरात गेली आहे. आणि त्यामुळे सहाजीकच गणेशमंडळांची संख्या पण वाढत आहे. प्रभादेवीचा सिध्दिविनायक हा मुंबईकरांचं आराध्यं दैवत बनला आहे. दर मंगळवारी तिथे लाखो भावीक दर्शन घेत असतात.

सहाजीकच यामुळे गणेशोत्सवाला मुंबईत आगळे वेगळे आणि भव्यं दिव्यं स्वरुप प्राप्तं झालं आहे.

लालबागचा राजा हि तर एक मोठी राजवट झाली आहे. या भागात म्हणजेच गिरणगावात गणेशोत्सव सुरुवाती पासुन मोठ्या प्रमाणात साजरा

होत आलेला आहे. लालबागचा राजा, गणेशगल्लीचा राजा ई. गणपतींच्या दर्शनासाठी कित्येक किलोमीटर रांगा लागतात. आदल्या दिवशी रात्रभर रांगेत ऊभे राहुन लोक दुसऱ्या दिवशी सकाळी दर्शन घेत असतात. गिरणीकामगारांवर आणि कॉम्रेड डांगे यांच्या सारख्या नेत्यांवर लोकमान्यं टिळकांचा खुप प्रभाव होता. कदाचीत त्यामुळे गणपती ऊत्सव गिरणगावात मोठ्या ऊत्साहाने साजरा होत आला आहे. आणि आता तर नवसाला पावणारा हा  लालबागचा राजा ही ख्यातीच झाली आहे.

उपनगरांमधे गणेशोत्सव तुलनेने ऊशीरा सुरु झाला आहे. पण आता मात्र शहरे, उपनगरे सर्वत्रच मोठ्या प्रमाणात गणेशोत्सवाचं स्वागत होतांना दिसत आहे. आणि हा उत्सव पण इतर शहरांच्या तुलनेत वेगवेगळ्या प्रकारे साजरा होतांना दिसत आहे.

एकेकाळी गणेशोत्सवांमधे मुंबईतील प्रत्येक उपनगरातील गणेशोत्सव मंडळे लोकनाट्यं, वग, व्याख्याने इ. कार्यक्रमावर भर देत असे. कारण मुंबईतील शाहिरी परंपरा मुंबईतील मराठी माणसाचे नाटक वेड, शाहिरी पथकाचे कार्यक्रम हे एकेकाळी करमणुकीचं मोठं साधन होतं. त्या काळी नाटकाचे प्रयोग पण फारसे खर्चीक नसत आणि साध्या स्टेजवर ते होऊ शकत असत.

पण आता मात्र मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सवासाठी बाहेरुन कलाकार बोलावतात. तेच नाटकांचं पण झालं. नाटकांचा खर्च पण वाढला. प्रयोगासाठी त्यांना हे स्टेज लहान पडु लागलं. खर्च वाढु लागला. त्याच वेळेस दुरदर्शन म्हणजेच टि.व्ही. संच आले.

त्यानंतर आालं चित्रपट आणि ऑर्केस्ट्राचं युग. सार्वजनिक गणेशोत्सवात पुर्वी चित्रपट मैदानात दाखवले जात असत. शिवाय जुने चित्रपट दाखवायचे असतील तर त्यांचा खर्च पण कमी असे. आणि चित्रपट बघायला पण खुप गर्दी होत असे. कारण त्या वेळेस भरमसाठ चॅनल्स,

केबल कनेक्शन पण आले नव्हते. अणि प्रत्येक घराघरांत टिव्ही.संच पण आले नव्हते. आता मुंबईत मैदानंच नावापुरती राहिली आहेत. आणि टि.व्ही., व्हि.सी.डी प्लेअर पण घराघरात आले आहेत.

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या काळात होणाऱ्या सभा सुध्दा चांगले वक्ते, ऊत्सुक श्रोते, चांगले विषय या अभावी थांबले. शिवाय टि.व्ही. हे एक मनोरंजनाचे साधन पण ऊपलब्ध होते.

तसंच ऑर्केस्ट्राचं हल्ली चॅनल्सवर विविध गाण्यांचे कार्यक्रम होत असतात. त्यामुळे ऑर्केस्ट्रा पण मागे पडला आहे. शिवाय रात्री दहा नंतर शासनाने ध्वनीक्षेपकं, स्पीकर्स इ. वर बंदी घातल्याने लाऊडस्पीकर्स पण बंद असतात. मुंबईकर कामं आटोपुन घरी पोहोचायलाच रात्री दहा वाजतात. मग ऑर्केस्ट्रा होणार तरी कसा.

पुर्वी ही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळं आपलं स्टेज नवोदित कलाकारांना उपलब्धं करुन देत असत. आणि यातुनच अनेक मोठमोठे कलाकार मराठी रंगभुमीला मिळाले आहेत.

एकुण मुंबईत सार्वजनिक गणेशोत्सवात सर्व भर असतो तो केवळ मोठमोठ्या स्टेजवर, भव्यंदिव्यं देखाव्यांवर आणि रोषणाईवर. त्यासाठी काही मंडळे लाखो रुपये खर्च करतात. खर्चीक देखावे, उंचच उंच मुर्ती, भव्यं दिव्यं स्टेज आणि ते पहायला येणारे लोक या सर्वांचीच संख्या वाढत चालली आहे.

गणपती दर्शनासाठी दररोज लाखो लोक या गणेशोत्सवात येत असतात. आणि हेच लक्षात घेऊन मोठमोठ्या कंपन्यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या जागी त्यांच्या जाहिराती लावावयास सुरुवात केली आहे. त्यासाठी या कंपन्या या गणेशमंडळांना लाखो रुपये देत असतात. मग

मंडळांच्या सुरवातीलाच दिसणारी गुटखा, सिगारेट, दारुची कमान कुणालाही खटकत नाही.

गणेशोत्सव मुंबईकरांसाठी दर्शना पुरताच मर्यादित राहीला आहे. आणि तो आता विशिष्टं लोकांचिच मक्तेदारी होत चालला आहे.

## नवरात्रीउत्सवः–

खरंतर आता नवरात्रीउत्सव म्हणण्याच्या ऐवजी दांडीया किंवा गरबा याच नावाने नवरात्रीउत्सव ओळखला जाऊ लागला आहे. घटस्थापने पासुन या सणाला सुरुवात होते. आणि पुढे दहा दिवस हा सण साजरा होतो.

२५ ते ३० वर्षापुर्वी मुंबईतील नवरात्री उत्सवाचा माहौल हा वेगळा असायचा. गुजराती समाज असलेल्या खेतवाडी ,भुलेश्वर, ठाकुरद्वार, घाटकोपर, मालाड या भागात गरबा व्हायचा. मराठी परिसरात त्याची आजीबात लागण झाली नव्हती. गणेशोत्सवात पालक खास रजा काढुन लालबाग ते खेतवाडी ,अणि कुंभारवाडा  या भागातील गणपती मुलांना दाखवुन आणायचे. त्या नंतर नवरात्रीउत्सवाची सुरुवात व्हायची. आणि मग महालक्ष्मीची जत्रा अनुभवण्यास गर्दी होई. काही मराठी परिवार कोल्हापुर, वणी, सप्तशृंगी, तुळजापुर, माहुर, अशा देवीच्या ठिकाणी यात्रेला जायचे.

मुंबईत मात्र जिवदानी, वज्रेश्वरी, ड़हाणुची महालक्ष्मी अशा ठिकाणी खुप गर्दी उसळायची. महालक्ष्मीचं दर्शन घेणं ही आवश्यक गोष्टंच मानली जायची. दक्षीण मुंबईत रहणाऱ्या मराठी लोकांनी कुळाचारच मानला होता. खणा नारळाने देविचि ओटी भरुन झाली की जत्रेत चार-पाच तास

फिरायला जात. त्या जत्रेत काय नसायचं, आठवडाभराच्या बाजारात असत त्याच्या कैक पटीनं वाजवी भावात त्याच गोष्टी उपलब्धं असत. खाऊगल्ली पेक्षा जास्तं स्टॉल्स, खेळणी, वाद्ये इ. अनेक प्रकारच्या गोष्टी या जत्रेत मिळायच्या. जत्रेत अनेक प्रकारचे खेळ असायचे. आणि अशा अनेक गोष्टी या महालक्ष्मीच्या जत्रेचं आकर्षण ठरायच्या.

याचं प्रमुख कारण म्हणजे त्या काळात टि.व्ही. आणि फँटसी लँड नव्हते. अणि एस्सेलवर्ल्ड वगैरे गोष्टी तर कोणाच्या स्वप्नांत पण आल्या नव्हत्या. फक्तं राणीचा बाग, चौपाटी, हँगिंग गार्डन, गेट वे ऑफ इंडीया इ. स्थानं आणि महालक्ष्मीची जत्रा एवढीच विरंगुळ्याची साधनं होती.

जत्रेची नशाच त्या काळी एवढी होती की, हाजिअली चौकाजवळ असलेल्या हिरापन्ना ईमारतीत खुप वर्षापासुन रास गरबा चाले, पण तिथे लोक थांबतही नसत.

२०-२५ वर्षापुर्वी श्रावणात मुली व बायका पिंगा घालत, फुगड्या झिम्मा खेळत. पुरुष मंडळी मात्र पत्ते कुटत. कुठे ग्रंथवाचन चाले, पारायणं चालत, पण गणेशोत्सवात मात्र गणपती समोर मात्र त्या काळी पिक्चर दाखवण्याची क्रेझ होती. पुढे दर्शन घेणाऱ्या भक्तांना दर्शन घेण्यास त्रास होऊ लागला म्हणुन मग हे पिक्चर नवरात्री उत्सवात दाखवले जाऊ लागले.

टि.व्ही. वरती दुरदर्शन हे एकमेव पिक्चर बघण्याचे साधन, त्या मुळे त्याला कंटाळलेलं पब्लीक रोडवरचे पिक्चर पहाण्याकडे वळत. गोणपाट, चटया, चादरी इ. जागा दुपार पासुनच अडवल्या जात. रात्री मग मोठी मंडळी जमुन मोठ्या थाटात पिक्चर्स पाहीले जात. फुगड्या-भोंडला इ. गोष्टी स्त्रियांना आवडत तरीपण हा मामला घरगुतीच राहीला. बहुधा स्त्री सुलभ लज्जा तसेच आपल्याला कुणी हसेल इ. कारणं यामागे असावीत. तसेच याच काळात मराठी संस्कृतीला नाकं मुरडण्याची, नावं ठेवण्याची

आणि आधुनिकतावादाची, पाश्चीमात्यीकरणाची लाट त्या वेळेपासुनच तीव्र झाली.

पण आज त्याच स्त्रिया फाल्गुनी पाठकच्या दांडीयाला रोज वेगवेगळी वेशभुषा करुन जातात. रास गरबा तेव्हाही होता पण त्याची आजच्या सारखी झिंग चढलेली नव्हती.

विषेशतः गुजराती आणि मारवाडी समाजात देवीची आरती, स्तुती, थाळ, रासगरबा या क्रमानं कार्यक्रम होत असे. यात त्या त्या परीसरातील स्त्रिया स्वतःच गात, वाद्यं वाजवत व त्या ठेक्यावर नाचत. छोट्या झांजा-मंजीरे असा छोटा वाद्यवृंद त्या काळात असायचा. तो ठेका ऐकुन इतरांच लक्ष विचलीत व्हायचं

मराठी स्त्रीया पण मग रास गरबाचं कौतुक पहायला जात. पुरुष पण जात. पण त्यांची अगम्यं गाणी, टिपीकल गुजराती ड्रेस, आणि तो झींग आणणारा ठेका, त्या नृत्यातील अदा यावरच मराठी मंडळी या रास गरब्या कडे आकर्षीत झाली. आणि परिचीत मित्रमंडळींकडे नवरात्री उत्सवात जाण्याचे बेत आखले जाऊ लागले.

## बाबला डिस्को दांडीया युगः-

मराठी माणुस रासगरबात प्रचंड विरघळला. याची मुख्यतः सुरुवात बाबला या रिदम किंग पासुन झाली.
( ही बिरुदावली त्याला त्या काळच्या पंतप्रधान ईंदीरा गांधींनी दिली आहे.)

ही व्यक्ती म्हणजे संगीतकार कल्याणजी-आनंदजी यांचा छोटा भाऊ. बाबला ऑर्केस्ट्रा चा संस्थापक. ऊत्कृष्ठ रिदम वादक, कंपोजर

अरेंजर रिदमसाठी लागणाऱ्या प्रत्येक गोष्टीत परिपुर्ण. अनेक वाद्ये विविध देशांतुन शोधुन ती वापरात आणण्याचे श्रेय या बाबलाला दिले जाते. त्या काळात ढोल, बाजा- कच्छी, नासीक-बाजा हे प्रकार लोकांना आवडु लागले. त्या काळात कि बोर्ड आले नव्हते. बुलबुल, तरंग, बेंजो, इ. महत्वाची वाद्ये असायची. गोवींदा किंवा लग्नाच्या वरातीत ही वाद्ये हमखास असायची.

मराठी माणुस पारंपारीक गुजराती गाण्यांवर चटकन समरस होणे शक्यं नाही हे त्याने जाणलं. त्या काळात मराठीत लता मंगेशकर, अरुण दाते, आशा मंगेशकर, प्रल्हाद शिंदे, इ. महान गायकांची गाणी मराठी मनांवर राज्यं करत होती. प्रत्येकाच्या घरातील रेडीओ, ज्युक बॉक्स, टपरीवरचे स्पीकर्स आणि घरच्या मंगलकार्यासाठी लाऊड स्पीकर्स असायलाच हवे, हा हट्टं लोकांनी धरलेला असायचा. मग बँडवाले ही गाणी वाजव वाजव वाजवत. शेवटी इंग्लीश गाण्यांनी कार्यक्रमाची सांगता होत असे. कर्ण्यावर, स्पीकर-बॉक्सवर, कम सप्टेंबर, तकील, फन्का, टाऊन, मंडेलो, अब्बा, कुंग फु, फायटींग अशी गाणी वाजवत. आणि या डांस ओरीयंटेड गाण्यांवर त्या काळची तरुण पिढि नाच नाच नाचत.

ऱ्हीदम म्हणुन जगात जे काही जिथे काही बनत असे ते हा बाबला हमखास खरेदी करुन आणायचा. तुंबा, कोंगो, ऑक्टोपॅड, ऱ्हीदम सिक्वेंसर इ.. वाद्ये ही या बाबलानेच आणली, असे जाणकार वादक सांगतात. बाबलाने ठरवलं की दांडियाचं प्रोजेक्ट झणझणीत बनवायचं तर असाच मसाला कामी येणार. बाबला हा अस्सल गुजराती, पण गिरणगावातला.

## १९८०चे दशक:–

१९८० साली त्याने डिस्को-दांडीया हा अल्बम प्रसिध्दं केला. मराठी माणुस दांडीयाला आपलंसं करतोय हे पाहुन तो हरखला. त्याला हे चांगलंच कळालं की मराठी माणसं दांडियाच्या तालावर नाचतील पण गुजराती भाषेतील गाणी त्यांच्या ओठावर रुळणं कठीण आहे. त्याने रासगरबा सर्वसमावेशक स्टाईलनी त्याच्या डिस्को-दांडीया या अल्बम मधे वापरला. अणि त्यात हिंदी सुपरहीट गाणी वापरली. पुढे विविध वाद्ये वापरुन ठेक्यासाठी काठ्यांचा ताल दिला. आणि बेमीसाल मिसळ तयार केली. आणि त्याच्या या कॅसेट्स हातोहात खपल्या देखील. १९९१ मध्ये रास गरबा डिस्को-दांडीया सुपरहीट झाला.

मुंबईत ज्या महालक्ष्मी देवळात चार ते पाच किलोमीटर रांग असायची त्या मंदीरात या अल्बमच्या निर्मीती नंतर निम्म्याहुन कमी झाली. गरबा फीवरने मुंबई नादावली. तेही एका झटक्यात. गुजराती लोकांनी मात्र याला भरपुर नावं ठेवली पण बाबलाने डिस्को-दांडीया हा अल्बम लोकांनी नाचावं म्हणुन तयार केला.

आज हा गरबा-दांडीया मराठी नृत्यं प्रकार झालाय. पण आज हरीॐ विठ्ठलाच्या तालावर लोक नाचतात. आणि ॐकार स्वरुपा या एकनाथांनी केलेल्या गणपतीच्या आळवणीवर केलेल्या गाण्यावर पण नाचतात. शेवटी पब्लीक मानतं तेच खरं असतं.

## नवरात्र :–

नवरात्र खरंतर देविची ऊपासना. दुर्गा-भद्रकाली-अंबा-चंडी-भवानी अशी अनेकवीध देवीची रुपे पुजली जातात. जिवनात आईच्या स्थानी देवीला

मानतात. जसे आई मुलाचे पालन पोषण करते नऊ महीने ऊदरात वाढवते, तशी या सृष्टीची जन्मदात्री ही देवी आहे असं मानुन मानवी जिवन सुसह्यं करण्यासाठी  तिला प्रसन्नं करण्यासाठी या हिंदु संस्कृतीने हा नवरात्री ऊत्सव आरंभला. हिंदु धर्मात सृष्टीमधील अगम्यं गोष्टींना देवता मानुन निर्मीतित हातभार लावणाऱ्या मानवी जिवन सुसह्य करणाऱ्या प्रत्येक गोष्टीस देव रुपी संज्ञा दिली आहे.

## गुजराती रास गरबाः–

या रासगरब्या बद्दल सांगायचं झालं तर त्याचा उगम पश्चिम भारतात झाला. हा रासगरबा म्हणजे देविच्या स्तुतीपर करण्यात येणारी नृत्ये. यात देवीची किंवा कृष्णाची भक्ती आढळुन येते. पण आजकाल पारंपारीक रासगरबा कुठेच आढळुन येत नाही. तरिही आजहि गुजरात मध्ये हा रासगरबा पारंपारीक पध्दतीनेच खेळला जातो.

नवरात्रीत गुजराती समाजातही कुलाचाराप्रमाणे घटस्थापना होते. मातीच्या भोक असलेल्या मडक्यात अखंड दिप ठेवला जातो. १० ते ११ वर्षाच्या मुली पारंपारीक पेहेराव (चनीया-चोळी) घालुन हा घट ( यालाच गरबा- गर्भदीप) घेऊन परिचीतांच्या घरी येतात. आणि जणु काही देवीच आली आहे असं त्यांचं स्वागत करुन हा घट देव्हाऱ्यात ठेवला जातो. मग आरती स्तुतीपर गीतं गायली जाऊन देवीपुढे नैवेद्याचं थाळं ठेवुन पुजा करुन या मुली नृत्यं करत आणि हे कौतुक मोठे लोक पहात असत. आणि नंतर त्यांना खाऊ आणि बक्षीसे देत असत.

## मुंबइतील रासगरबा:–

जन्मगाव सोडुन पोटापाण्यासाठी मुंबईत आलेल्या या गुजराती समाजाला त्यांचा नवरात्रीउत्सव साजरा करावा असं प्रकर्षने वाटु लागले. मराठमोळे ऊत्सव दिवाळी, दसरा, गणपतीउत्सव साजरे होतांना पाहुन हा गुजराती समाज पण एकत्र आला. त्यांची लोक वस्ती असणाऱ्या त्यांच्या भागात त्यांना जसं जमेल तसं रासगरबा खेळला जाऊ लागला. तो अपरिचीत पण कानाला गोड वाटणारा ठेका ऐकुन येणारे जाणारे लोक थबकुन पाहु लागले. या नृत्यात मजा आहे हे ईतरांना जाणवु लागलं. त्यामुळे या ठेक्यावर ताल मराठी माणसाने धरला.

रासगरबा हा फिल्मी टच होताच मराठी माणसाने तो स्वीकारला. १९८१ सालात डिस्को दांडिया हा अल्बम लोकप्रीय झाला. आणि यावर रासगरबा आणि दांडीया खेळला जाऊ लागला. आणि नवरात्री मंडळं तयार होऊ लागली.

पुढे ढोलीडा-पंखीडा हा अल्बम मुसा पाईक, शेखर बर्वे, दक्षा बेगडा या त्रिकुटाने तयार केला.

## उत्सव ते उद्योग:–

१९९८ मधे फाल्गुनी पाठक या नावाचं वादळ आलं आणि तिने गुजराती संस्कृती आणि हिंदी गितं गाऊन रसीकांच्या ह्रदयात जाऊन बसली आहे ते आज पर्यंत वन वुमन शो क्वीन ठरलेली आहे. तिने गरब्याला अत्यंत आधुनीक रुप दिलं. त्यात प्रोफेशनल पणा आणला. आणि आज ती नवरात्री उत्सवात करोडो रुपये कमावत आहे.

फाल्गुनी पाठकच्या कार्यक्रमाला प्रत्येकी ५०० ते ५००० रुपयांचे प्रवेश पास असतात. तिच्या वेगळ्या आणि प्रतिष्ठीत दांडीयाला जाण्याची आज फॅशन बनली आहे. भरमसाठ प्रवेश फि असली तरी लोकांचा उत्साह दर वर्षागणिक वाढतच चालला अहे.

या फाल्गुनी पाठकचा दांडीया इतकी वर्षे गोरेगाव उपनगरातील स्पोर्टस क्लब येथेच होत असे, पण या वर्षी लोकांना जागा अपुरी पडल्याने अंधेरी स्पोर्टस क्लब येथे हलवण्यात आला आहे.

ठाणे उपनगरात आदेश बांदेकर या मराठी कलावंताने मराठी दांडीया हा नृत्यंप्रकार गेल्या दोन वर्षापासुन आणला असुन यात मराठी गाण्यावर दांडीया, झिम्मा, फुगडी खेळली जाते.

## मुंबईचा बदलता नवरात्रीउत्सवः–

आज मुंबईत प्रत्येक नवरात्री मंडळात, प्रत्येक कॉलनीमधे, प्रत्येक सोसायटीमधे या गरबा दांडीयाच्या तालावर प्रत्येक व्यक्तींची पावलं थिरकत आहेत. पुर्वी रात्रभर चालणारा हा गरबा आता शासनाच्या बंधनामुळे, ध्वनीप्रदुषणाच्या प्रश्नामुळे, अतिरेकी कारवायांच्या भिती मुळे, काही रात्री घडणाऱ्या घटनांमुळे रात्री दहा पर्यंतच करण्यात आला आहे. तरीपण आज लोक शेवटच्या दोन दिवशी बारा वाजेपर्यंत अविरत चारचार तास प्रचंड म्युझीकची नशा अनुभवत नृत्यं करतंच असतात.

दांडीया आणि नवरात्री उत्सवाचं गरब्याचं स्वरुप व्यावसाइक झालेलं आहे. मोठ्या शहरांतुन भव्यं असा कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. गणपती संपले की नवरात्री उत्सवाचे तंबु मैदानात पडायला लागतात. शाळेतील खेळायची मैदानं पण भाड्यानी घेतली जातात. एकट्या मुंबईतच

सुमारे दहाहजार नवरात्री उत्सव मंडळे आहेत. या दांडीयाचं प्रमुख आकर्षण म्हणजे डि.जे., स्पीकर्स, प्रचंड मोठ्या आवाजात लावलेली गाणी, आकर्षक सजावट, नेत्रदिपक रोषणाई, संध्याकाळचे ६-७ वाजले की हे नवरात्री उत्सवांचे मंडप सजावटीने झगमगुन ऊठतात. पारंपारिक वेषभुषा केलेल्या तरुण तरुणींची लगबग सुरु होते. आणि नामवंत डिजे आर्टीस्ट कोट्यावधी रुपयांची बिदागी घेऊन लोकांना त्यांच्या संगीताच्या तालावर नाचायला भाग पाडतात.

या दांडीयात सहभागी होण्यासाठी दर दिवसाचे २०० ते ५००० रुपयां पर्यंत शुल्कं आकारणारी अनेक मंडळे आहेत. सहाजीकच जेथे गरबा चालतो तेथे खाण्या पिण्याची पण व्यवस्था केलेली असते

मुंबईत या नवरात्री उत्सवाच्या काळात विस ते चाळीस हजार लोक विविध ठीकाणी गरबा खेळायला जातात. यात महाविद्यालयीन तरुण आणि तरुणींचं प्रमाण सर्वात जास्तं आहे.

आधुनीक दांडीयात कर्णकर्कश्यं संगीताचा भरणा अधीक आहे. सुरवातीला लोकलाजेस्तव एक ते दोन पारंपारीक गितं स्टेजवर म्हणली जातात. आणि नंतर खऱ्या जल्लोशाला सुरुवात होते. ड्रम्बीटचा ठेका घुमायला सुरुवात होते. आाणि फाडफाड इंग्रजी बोलणारे मुलं मुली चणिया चोळी घालुन झब्बा धोती घालुन नाचण्यात दंग होऊन जातात. सध्याचा नवरात्री ऊत्सव हा प्रचंड खर्चीक असा झाला आहे. प्रवेश शुल्काबरोबरच वेशभुषेसाठी पण प्रचंड खर्च ही आजची तरुण पिढी करते. हा खर्च हजारापासुन सुरु होऊन पुढे ज्याच्या त्याच्या ऐपतीनुसार वाढत जातो.

मुलींमधे शरारा, लाचा, चोळी, साडी असे प्रकार प्रसीध्दं आहेत. बाकी सर्व बाबतीत जरी आधुनीकता असली तरी ही पिढी पेहराव मात्र

पारंपारीकच करते. मुलं सुरवार, झब्बा ,पायजामा याबरोबरच केडीया सुरवार हा वेष परीधान करतात.

या नवरात्री उत्सवासाठी पोषाखात प्रचंड प्रकारचं वैविध्यं आलेलं आहे. या काळात कपडे विकणारी दुकानं पण सर्वाधीक व्यवसाय करतात. या नवरात्री ऊत्सवासाठी चार महीने आधीपासुन पोषाख आणि दागीन्यांची कारागीरी हे कारागीर करत असतात. हजारो कारागीरांना यात व्यवसाय मिळतो ही जमेची बाजु.

या नवरात्री उत्सवात जशी मंडळं पैसा कमावतात तसेच मंडपवाल्या पासुन ते खाद्यं पदार्थ विक्री करणाऱ्या पर्यंत अनेकांना यातुन व्यवसाय मिळत असतो. अनेक तरुण-तरुणींना आकर्षीत करण्यासाठी ही मंडळं प्रयत्न करीतच असतात. सेलिब्रीटींना बोलावत असतात. मंडपा पासुन ते दांडीया पर्यंत प्रत्येक गोष्टं सजवलेली असते. असा आजचा नवरात्री ऊत्सव दहा रात्री साजरा होतो

असे हे आजचे सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव प्रचंड ध्वनीप्रदुषण, विजेचा नाहक वापर, प्रचंड खर्च, यातच अडकले आहेत.

..............................................

# वाङ्मयीन आढावा

# (REVIEW OF LITERATURE)

प्रकरण २रे

# वाङमयीन आढावा
# (REVIEW OF LITERATURE)

**सरोजनी बाबर : श्रावण भाद्रपद**
**महाराष्ट्रराज्य लोकसाहीत्य**
**निर्मिती मे १९८५.**

सरोजनी बाबर लिखीत श्रावण भाद्रपद या पुस्तकात श्रावण भाद्रपद या मराठी महिन्यात येणाऱ्या सण व उत्सवांची माहिती पारंपारीक पध्दतीने देण्यात आली आहे.

सर्वात जास्तं हिंदु सण व उत्सव श्रावण भाद्रपद या मराठी महिन्यात येतात. उपास तापास, व्रतवैकल्य केले जातात, घराघरात हौसमौज केली जाते. भारत देश मुख्यतः शेतिप्रधान देश असल्यामुळे पेरणी झाली की पुर्ण पावसाळ्यात काहीच काम नसते. वेळ भरपुर, मग या महिन्यातले श्रावण व भाद्रपदातले सण व उत्सव सुरु झाले. उपास तापास याच दिवसात का? तर हवामानाने पोट खराब होण्याची शक्यता जास्तं, म्हणुन मग हे उपास तापास.

सरोजनी बाबरांनी या पुस्तकात सण व उत्सव कसे साजरे होतात , त्यांच्या पध्दती काय आहेत, त्या मागच्या गोष्टी काय आहेत, याबाबत

परिपुर्ण माहिती या पुस्तकात दिली आहे. सण व उत्सवा मागचे कुळाचार सुध्दा या पुस्तकात दिले आहेत.

सरोजनी बाबर यांनी त्यांच्या ओघवत्या शैलीत या पुस्तकाचे लिखाण केले आहे. त्यांच्या या पुस्तकात त्या वेळेस म्हणजे त्यांच्या लहानपणी हे सण व उत्सव कसे साजरे होत, हे आठवणीतुन सांगितले आहे. श्रावण भाद्रपद या मराठी महिन्यात येणारे हे सण त्या काळात कसे साजरे होत होते याचे चित्र लेखीका सरोजनी बाबर डोळ्या समोर उभे करतात.

त्याचबरोबर श्रावण भाद्रपद या पुस्तकात लेखीका सरोजनी बाबर प्रत्येक सणामागील इतिहास, सणाची सुरुवात कशी झाली, तो कशा प्रकारे निर्माण झाला, त्या मागचा उद्देश काय, सण साजरा करण्याच्या विविध पध्दती काय आहेत, तसेच विविध प्रांतात तो कशा प्रकारे साजरा केला जातो ते लिखित केले आहे .

तसेच त्यांनी त्या सण व उत्सवा मार्फत निर्माण झालेल्या प्रथा परंपरा इत्यादिंचे सविस्तर वर्णन आणि विष्लेषण या पुस्तकात केले आहे.

या पुस्तकात सर्व माहिती म्हणजेच पुर्वी सण व उत्सव कसे साजरे केले जात, या मधील गाणी, प्रथा परंपरा, व्रतवैकल्यं, त्या मागिल कथा, यांची माहिती मिळत असली तरी, हे पुस्तक गोष्टीनुरुप लिहीले गेल्याने त्या पुर्वीची आणि ऐतीहासीकच माहिती मिळते. वैज्ञानिक माहिती मिळत नाही.

तसेच लेखीका सरोजनी बाबर यांची लेखनशैली ही ओघवती असल्याने प्रत्येक उत्सवाचे वर्णन करत असतांना, तो उत्सव कसा साजरा होत असेल याचे चित्र वाचकाच्या डोळ्यासमोर ऊभे रहाते.

या पुस्तकातुन लेखीका सरोजनी बाबर यांना भाद्रपद या मराठी महिन्यात  येणाऱ्या सण व उत्सव प्रथा परंपरा, व्रतवैकल्यं, त्या मागील कथा यांची माहिती  आजच्या नविन पिढी पर्यंत पोहोचवायची आहे. काही सण कायमचे विस्मरणात गेले आहेत, त्याचे पण अवलोकन लेखीका सरोजनी बाबर  या पुस्तकात करुन देतात. आणि ते बव्हंशी साध्यपण झाले आहे.

नविन पिढीला हे सण पुर्वी कसे साजरे होत असतील याची ओळख हे पुस्तक करुन देते, सण साजरा कसा करावा याचे मार्गदर्शन हे पुस्तक करुन देते.

पण हे सर्व मार्गदर्शन करतांना ईश्वरवादी दृष्टीकोण वाचकाला बोचत रहातो. उत्सव कसा साजरा केला जातो यापेक्षा या पुस्तकात गाण्यांची संख्या जास्तं आहे. पोथीतिल कथा या पुस्तकात जास्तं आहे. म्हणजेच कहाण्या आणि त्या त्या उत्सवा नुसार येणारी गाणी यांचा भरणा जास्तं आहे. तसेच हे पुस्तक फार जुन्या काळातिल सण व  ऊत्सव कसे साजरे करावेत याची माहिती देते पण बदलत्या काळानुसार होणारे बदल उधृत केलेले नाहीत.

असे असले तरी, या पुस्तकात लेखीका सरोजनी बाबर यांनी भाद्रपद या मराठी महिन्यात येणाऱ्या सण व उत्सव याचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न महाराष्ट्र राज्य लोकसाहीत्य निर्मिती प्रकाशन संस्थेद्वारे केलेला आहे. आणि तो खुप मार्गदर्शक पण ठरला आहे.

श्रावण भाद्रपद हे पुस्तकाचे लेखीका सरोजनी बाबर यांनी दिलेले नाव या पुस्तकास अतिशय समर्पक असे आहे.

या पुस्तकाची पृष्ठसंख्या  ८९९  पाने असुन श्रावण भाद्रपदात येणाऱ्या प्रत्येक सणांचा एकेक विभाग आणि  त्या त्या सणांचे लेखन, कहाण्या ,गिते, ओवी गिते, गाणी इ. हे पुस्तक सजवले आहे.

साठ ते सत्तर वर्षापुर्वीचे हे पुस्तक सण व उत्सव कशा प्रकारे साजरे होत यासाठी आजही मार्गदर्शक ठरते.

**ज. स. करंदिकर : श्रीगणेशोत्सवाची साठ वर्षे**
**अध्यक्ष गणेश मंडळ, पुणे**
**इ. स. १९५३.**

ज. स. करंदिकर लिखित श्रीगणेशोत्सवाची साठ वर्षे या अध्यक्ष गणेश मंडळ प्रकाशीत ग्रंथात गेल्या साठ वर्षात गणेशोत्सवात कोणत्या प्रकारचे बदल झाले, गणेशोत्सवाचे स्वरुप मुख्यतः कसे बदलत गेले, मुख्यतः गणेशोत्सव सुरु कधी, कुठे, कसा झाला आणि तो नंतर सार्वजनिक कसा झाला, त्याला टिळकांनी सार्वजनिक स्वरुप कसे दिले या बद्दल सर्व माहिती या पुस्तकात मिळते.

पुण्यात सुरु झालेल्या उत्सवास टिळकांनी ज्ञानसत्राचे स्वरुप कसे दिले? या बद्दल या श्रीगणेशोत्सवाची साठ वर्षे या अध्यक्ष गणेश मंडळ प्रकाशीत ग्रंथात माहिती मिळते. धर्माबद्दल ऊदासीन झालेल्या लोकांना श्रीगणेशोत्सव सार्वजनिक पध्दतिने साजरा करुन कीर्तने, प्रवचने, मेळे, व्याख्याने वगैरे विविध प्रकारांनी समाज जागृती व्हावी यासाठी लोकमान्य टिळकांनी श्रीगणेशोत्सवास सार्वजनिक स्वरुप दिले. (पान क्र.- १०).

पुर्वी सुध्दा श्रीगणेशोत्सव घरगुती पध्दतिने साजरा केला जात असेच पण तो एकाच दिवसाचा असे.लोकमान्य टिळकांनी हा ऊत्सव सार्वजनीक करतांना दहा दिवसांचा केला. यामागे त्यांचा ऊद्देश चतुःसुत्री चा (स्वदेशी, स्वराज्य, बहिःष्कार, राष्ट्रीय शिक्षण) प्रसार करणे हा होता.

ज. स. करंदिकर लिखित श्रीगणेशोत्सवाची साठ वर्षे या अध्यक्ष गणेश मंडळ प्रकाशीत ग्रंथात मुख्यतः पुणे, मुंबई, व महाराष्ट्रातील श्रीगणेशोत्सवाची माहिती मिळते. प्रत्येक शहरातिल मेळे, मंडळे आणि त्या त्या शहरातिल गणेशऊत्सवातील व्याख्याने आणि त्यांचे विषय यांचा कालानुक्रमाने धांडोळा करंदीकरांनी घेतला आहे.

हे पुस्तक मुख्यतः चार भागात विभाजीत करण्यात आले आहे.

–पहिल्या भागात मुंबई पुणे आणि ईतर ठिकाणचे गणेशोत्सव यांचा ऊल्लेख वर्षानुक्रमे स्पष्ट करण्यात आला आहे.

–दुसऱ्या भागात सन्मीत्र-समाजादी मेळ्यांचा परीचय आणि परामर्ष या पुस्तकात समाविष्ट केलेला आहे.

–तिसऱ्या भागात मेळा समितिचा अनुभव आणि सुचनांचा समावेश या पुस्तकात केला आहे.

–तर चौथ्या भागात मुख्यतः नमुन्या दाखल काही व्याख्याने देऊन व्याख्याते  आणि व्याख्यानांचे विषय दिले आहेत.

ज. स. करंदिकर लिखित श्रीगणेशोत्सवाची साठ वर्षे या अध्यक्ष गणेश मंडळ प्रकाशीत ग्रंथात मुख्यतः उत्सवाचा पहिला ऊगमाचा कालखंड, ऊत्सवाचा उमेदिचा तो ऊत्सव जोर पकडण्याचा कालखंड, श्रीगणेशोत्सवाचा विराट प्रचार व प्रसार होण्याचे उत्तम साधन या श्रीगणेशोत्सवाची साठ वर्षे या अध्यक्ष गणेश मंडळ प्रकाशीत ग्रंथात अभ्यासायला मिळते.

या पुस्तकाचे वैशिष्ट्यं म्हणजे या पुस्तकात संपुर्ण महाराष्ट्र, गुजरात, मध्यभारत, दिल्ली या सर्व ठिकाणचे गणेशोत्सव व त्यांची ठिकाणे यांचा वर्षानुक्रमे इतिहास दिलेला आढळतो. तसेच तो त्या त्या ठिकाणी साजरा कसा होतो याचा तपशील दिलेला आहे. पण विषयाची व्याप्ती मोठी असल्याने प्रत्येक ठिकाणची चार ते पाच ओळीतच माहिती मिळते.

या पुस्तकाची लेखनशैली / भाषा अतिशय परखड आणि पुणेरी धाटणीची आहे. अतिशय त्रोटक आणि तुटक पध्दतिची शैली या पुसतकात ज.स. करंदीकरांनी वापरली आहे.

या पुस्तकाचे महत्व म्हणजे ज. स. करंदिकरांना मुख्यतः गणेशोत्सवाचा इतिहास उलगडायचा आहे. आणि तो वाचका पर्यंत पोहोचवायचा आहे पण तो पोहोचवण्यात लेखक कमी पडले आहेत, कारण विषयाची व्याप्तीच/ कालखंडच इतका मोठा घेतला आहे की त्यांना त्याबद्दल दोषी धरता येत नाही.

हे पुस्तक अभ्यासकाला गेल्या साठ वर्षातील गणेशोत्सव सुरु होऊन पुढची साठ वर्षे या बाबतित समग्र माहिती देते. बदलती सामाजिक, राजकिय परिस्थीती, संस्कृती, विचार यांची पण ओळख करुन देते. नुसता गणेशोत्सवच नाही तर त्या सोबत त्या त्या ठिकाणच्या लोकांचे विचार कसे बदलत गेले याचा परिपाक हे पुस्तक आहे.

विषयाची व्याप्तीच/कालखंडच इतका मोठा असल्याकारणाने पुस्तकातील प्रत्येक विषयाची खुप कमी व त्रोटक माहिती मिळते.

या पुस्तकाची पृष्ठसंख्या ५९६ पाने ईतकी आहे. हे पुस्तक मुख्यतः चार भागात विभागले गेले आहे. १९५३ साली लिहीले गेलेले हे पुस्तक म्हणजे गणेशोत्सवाचा भारतातील इतिहासच आहे.

अतीशय थोडक्यात महत्वपुर्ण पध्दतिने हे पुस्तक आजच्या काळातही गेल्या साठ वर्षातील गणेशोत्सव सुरु होऊन पुढची साठ वर्षे हा समग्र धावता आढावा वाचकाला करुन देण्यात लेखक ज. स. करंदिकर श्रीगणेशोत्सवाची साठ वर्षे या अध्यक्ष गणेश मंडळ पुणे प्रकाशनाच्या वतिने यशस्वी ठरलेले आहेत.

**ऋग्वेदी : आर्यांच्या सणांचा प्राचीन**
**(वामन मंगेश दुभाषी) आणि अर्वाचीन इतिहास**
**गिरगाव प्रकाशन**
**२२ एप्रिल १९१६**

आर्यांच्या सणांचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास या पुस्तकात लेखक ऋग्वेदी यांनी, आर्य काळातिल बाराही महिन्यांच्या ठळक सणांविषयी संपुर्ण विवेचन केले आहे. तसेच पुस्तकाच्या सुरवातीलाच मराठी महिन्यानुसार येणाऱ्या सणांची यादी या पुस्तकात दिली आहे.

आर्यांच्या सणांचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास या पुस्तकात लेखक ऋग्वेदी यांनी, एकेक सण घेऊन तो सण कुठला आहे ते सांगुन त्या सणामागील इतिहास, तो सण साजरा कसा करावा, त्याचे त्या लेखकाच्या काळात बदललेले रुप याबाबत त्यांनी लिखाण केले आहे. तसेच या पुस्तकात प्रत्येक सणांचा शास्त्रोक्त विधी, व रुढींबाबत लेखक ऋग्वेदी य पुस्तकात लिहितात.

गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव याबाबत त्यांनी गणेशोत्सव कसा साजरा करावा यात पुढाऱ्यांनी सुसंस्कृत मनाने समाज घडवुन आणला पाहीजे, आणि याची मदत गणेशोत्सव करत आहे, असे लेखक ऋग्वेदी यांनी आर्यांच्या सणांचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास या पुस्तकात लिखीत केले आहे. त्यांनी त्यांच्या काळातील गणेशोत्सवा संदर्भात लिखाण केले आहे.

तसेच नवरात्रीउत्सवाबाबत पण लेखक ऋग्वेदी यांनी या पुस्तकात कलकत्त्यात हा नवरात्रीचा दुर्गापुजन उत्सव कसा होतो या बाबत लिखाण

केले आहे तसेच राजपुत समाजात पुर्वी हा उत्सव कसा साजरा होत असे याबाबत लिखाण केलेले आहे.

आर्याच्या सणांचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास या पुस्तकात लेखक ऋग्वेदी मुख्यतः त्यांच्या काळातील तरुण पिढीला सण व त्या मागील परंपरा समजावण्याचा, त्या सणामागील इतिहास समजावण्याचा, तसेच धर्म समजुतीत व आचार विचारात कोणता फरक केला पाहीजे हे समजावण्याचा प्रयत्न प्रामाणीक पणे केला आहे.

या पुस्तकाची लेखनशैली लेखक ऋग्वेदी यांनी अगदी साधी, सरळ, व गंभीर, व विवेचनात्मक तसेच प्रौढ, सुबोध अशी आहे.

तसेच या पुस्तकाच्या शेवटी रमाबाई रानडे यांचा अभीप्राय पण दिला आहे.

आर्याच्या सणांचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास या पुस्तकात लेखक ऋग्वेदी यांनी त्यांच्या पिढीला आणि त्यापुढील पिढीला समोर ठेऊन हे पुस्तक लिहीले आहे. जे की आजच्या पिढीला पण उपयोगी आहे.

या पुस्तकात संस्कृत श्लोक पण दिले गेले आहेत. तसेच प्रत्येक सणांच्या कथेतुन आजच्या पिढीला काय बोध घेता येईल याचे पण लिखाण लेखक ऋग्वेदी यांनी आर्याच्या सणांचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास या पुस्तकात केले आहे.

या पुस्तकात त्या वेळेसच्या बदलत्या काळातील सामाजिक व राजकिय परिस्थिती संदर्भात ऊल्लेख येत नाही. या पुस्तकाची भाषा त्या काळात जरी सोपी व सहज वाटत असली तरी आजच्या काळात ती भाषा वाचायला जडच जाते. तसेच पुस्तकात गोष्टी व पुराणाचे दाखले खुप येतात.

असे असले तरी लेखकाने त्यांच्या पिढीला व त्या पुढील पिढीला समोर ठेऊन हे पुस्तक  लिहीले. आर्याच्या सणांचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास या पुस्तकात लेखक ऋग्वेदी लिखित पुस्तक आजही खुप मार्गदर्शक ठरते.

**सौ. वैजयंती केळकर : आपले नवरात्र**
**रोहन प्रकाशन, पुणे**
**सप्टेंबर २०००**

लेखीका वैजयंती केळकर यांनी आपले नवरात्र या पुस्तकाचे लेखन हे मनात एक विचार ठेवुन लिखित केले आहे.

महाराष्ट्रात खास स्त्रियांचे असे अनेक सण व ऊत्सव आहेत. त्यात भक्ती बरोबर कुलाचार, सामाजिक नितिनियम असे अनेक हेतु सामावलेले आहेत.

लेखीका वैजयंती केळकर यांनी या पुस्तकात भोंडला, हादगा, भुलाबाई ह्या विविध नावांनी नवरात्रा दरम्यान साजरा केल्या जाणाऱ्या अनेक लहान मुली स्त्रिया यांच्या ऊत्सवांची आणि गाण्यांची भरपुर माहिती या आपले नवरात्र या पुस्तकात दिली आहे.

महाराष्ट्रात भिन्नं भिन्नं नावांनी नवरात्रात साजरा होणाऱ्या या उत्सवाच्या माहिती बरोबरच हा उत्सव का साजरा होतो याची पण या पुस्तकात सविस्तर अशी माहिती दिली आहे.

आपले नवरात्र या पुस्तकात शक्तिपीठ म्हणजे काय, त्यामागील ऊद्देश, त्याचे महत्व काय, हेही लोकांना सांगायचा प्रयत्नं केला आहे.

महत्वाचे म्हणजे ज्याला आपण शक्ती किंवा देव असे म्हणतो त्याचे वैज्ञानिक स्वरुप मोशन, पावर इत्यादी रुपात आहे हेही मोठ्या कुशलतेने सांगीतले आहे.

या सणांचे धार्मीक, कौटुंबिक, सामाजिक, भावनिक स्वरुप काय आहे, हे पण लेखीका सोप्या भाषेत स्पष्टं करतात. या पुस्तकातुन लेखीकेने जमा केलेली माहिती, गाणी, यांचा संग्रह करुन केलेले लिखाण याचे कष्टं लेखनातुन जाणवतात.

पन्नाशीच्या पुढच्या स्त्रिमनात हे उत्सव रेंगाळत असतात. त्यांच्याशी निगडीत अनेक स्मरणेही असतात, पण झपाट्याने बदलत चाललेल्या आयुष्यात हे सगळे सण नाहीसे होतांना दिसत आहेत. लेखीका वैजयंती केळकर यांना या सर्वाचे जतन व्हावे असे मनापासुन वाटते आणि यातुनच हे पुस्तक लिहिल्याचे जाणवते.

तसेच या पुस्तकात विविध वर्षाचे सण व उत्सव यांची यादी आणि साडेतीन शक्तीपिठाची माहिती पण तपशीलवार दिली आहे.

या आपले नवरात्र पुस्तकात वैजयंती केळकर यांनी ज्यावेळी भोंडला खेळला जात असे त्या काळच्या समाजाचे वर्णन केले आहे ते तितकेसे बरोबर वाटत नाही, कारण समाज हा झपाट्याने बदलत जाणारा आहे. स्त्रीया कमी शिक्षीत आहेत पण त्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे हे चुकीचे वाटते कारण त्यावेळी पण स्त्रिया या घराबाहेर पडतच होत्या, शिकतच होत्या अर्थार्जन पण करत होत्या.

अभ्यासुंना नवरात्री उत्सवाच्या अभ्यासासाठी हे पुस्तक अतिशय ऊपयोगी असे आहे.

वाचकाला उत्सव साजरे करतांना सामाजिक आणि वैज्ञानिक विचारांना चालना देण्याचे काम लेखीका वैजयंती केळकर यांनी आपले नवरात्र या पुस्तकात केले आहे.

सणांचे धार्मीक, कौटुंबिक, सामाजिक, भावनिक स्वरुप काय आहे, हे पण लेखीका सोप्या भाषेत लिहीतात. लेखीका वैजयंती केळकर यांनी आपले नवरात्र या रोहन प्रकाशन पुणे प्रकाशित पुस्तकाचे लेखन अतिशय साध्या स्वरुपात केले आहे.

**प्रा. मधु जाधव : भारतीय सण आणि उत्सव**
**मनोविकास प्रकाशन, पुणे**
**ऑगस्ट २००६**

प्रा. मधु जाधव लिखित भारतीय सण आणि उत्सव या रोहन प्रकाशन पुणे प्रकाशित पुस्तकात भारतात साजरे होणारे सण व उत्सव यांच्या बद्दल समग्र माहिती दिली आहे.

या पुस्तकात लेखक प्रा. मधु जाधव, उत्सव कसे निर्माण झाले, त्यांचा इतिहास आणि त्या उत्सवामागील सामाजिक माहिती देण्याचा प्रयत्न करतात.

लेखक भारतीय सण आणि उत्सव या पुस्तकात म्हणतात, सण हे धर्मभावनेच्या मुळाशी जाणारे आहेत. आणि समाजमनाची बांधणी या सण व उत्सवांद्वारे होते.

सण माणसातला माणुस जागा करण्याचे कार्य करतात. मानवधर्म जागृत ठेवण्याचे कार्य हे सण व उत्सव सातत्याने करत असतात. असे लेखक प्रा. मधु जाधव लिहीतात.

यासाठी लेखकानी विविध संतांचा धर्माबाबतित आणि सण व उत्सवा बाबतित असणारा दृष्टीकोण पण दिला आहे.

कितीतरी सण असे आहेत की ते विसरले जात आहेत. त्या सण व उत्सवांच्या बाबतही लेखक भारतीय सण आणि उत्सव या पुस्तकात लिखाण करतात. या सणांमागे परंपरा आहे, मानवी मुल्ये आहेत त्यांचा विसर पडु नये म्हणुन हे सण व उत्सव असतात.

मानवी मनाला आनंद आणि उत्साह देण्याचे काम हे सण व उत्सव करतात असे प्रा. मधु जाधव यांना या पुस्तकातुन सांगावयाचे आहे.

व्यक्ती आणि समाज हे अभेद्य आणि न तुटणारे नाते आहे. हे संबंध अधीक दृढ व्हावे यासाठी सण व ऊत्सव हातभार लावत असतात. पण यातुन कालबाह्यं कर्मकांडाची आणि अंधश्रध्देची जोपासना होऊ नये, तसेच समाजाचा वेळ आणि पैसा याचा अपव्यय होऊ नये असे लेखक प्रा. मधु जाधव यांना सांगायचे आहे.

सणांचे उत्सवांचे स्वरुप काय आहे ? त्या विषयी परंपरेने कोणत्या आख्यायीका चालत आल्या आहेत ? कोणत्या ठिकाणी ते साजरे केले जातात ? त्याचे आजचे स्वरुप काय आहे ? त्यांची आजच्या काळात ऊपयुक्तता काय आहे ? हा दृष्टीकोण समोर ठेवुन प्रा. मधु जाधव यांनी भारतीय सण आणि उत्सव पुस्तकाचे लिखाण केले आहे.

जरी महत्वाच्या सणांना यात अंतर्भुत केले गेले नसले, आणि माहिती कमी प्रमाणात असली, तरी प्रा. मधु जाधव यांचा सण व ऊत्सवांची मुख्यं ऊद्दिष्टे सांगण्याचा हेतु या पुस्तकातुन स्पष्टं होतो.

गणेशऊत्सवा बाबत लिहीतांना लेखकाने हा उत्सव सार्वजनिक कसा झाला हे स्पष्टं केले आहे.

प्रा. मधु जाधव लिखित भारतीय सण आणि उत्सव या रोहन प्रकाशन पुणे प्रकाशित पुस्तकाची लेखनशैली गोष्टीरुप आणि इतिहास सांगणारी अशी झाली आहे. तरी लेखकाची वाचकाला उत्सवाची माहिती करुन देण्याची तळमळ जाणवल्या वाचुन रहात नाही.

या पुस्तकात भारतातील संपुर्ण सणांचा आणि विविध राज्यातील सण व उत्सवाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रा. मधु जाधव यांनी  मुख्यतः सणांची व उत्सवांची ऊपयुक्तता किती, या पेक्षा आजच्या काळातील त्यांचे स्वरुप काय असावे हा विचार मनात ठेवुन हे पुस्तक लिहील्याचे जाणवते. आणि ते वाचकाला पटते.

अंधपणे व्रते,सण उत्सव अनुसरु नका, सामाजिक जबाबदाऱ्या या उत्सवांद्वारे टाळु नका ऊदा. वटपोर्णीमा आहे म्हणुन ऑफीसला अर्धा दिवस सुटी घेणे चुकीचे आहे असे प्रा. मधु जाधव यांना वाटते.

भारतीय लोक परंपरा जपतात. परंपरेने चालत आलेल्या सण व उत्सवाचे काटेकोरपणे पालन करतात.

पण बदलत्या काळानुसार आणि वेळे अभावी ते शक्यं होत नाही आणि ते टाळता पण येत नाही यातुन त्या उत्सवाचे विकृतीकरण होत जाते असे प्रा. मधु जाधव भारतीय सण आणि उत्सव पुस्तकात लिहितात.

मानववादी, भुतदयावादी, सामाजिक दृष्टीकोण ठेवुन रुढीप्रथा परंपरा यांचा दबाव बाजुस सारुन, निरर्थक व्रते न करुन जर उत्सव साजरा केला तरच आपल्या भारतीय संस्कृतीची जोपासना होऊ शकते. देश आधुनीक आणि विज्ञानवादी होऊ शकतो हे प्रा. मधु जाधव भारतीय सण आणि उत्सव पुस्तकात मांडतात.

प्रा. मधु जाधव लिखित भारतीय सण आणि उत्सव हे पुस्तक जिज्ञासु अभ्यासकाला अतिशय उपयउक्त व्हावे असे लिखित करण्यात आले आहे.

**मंदा खारकर : वार्षिक सण व उत्सवाचा मुळारंभ**
**मॅजेस्टिक प्रकाशन पुणे**
**फेब्रुवारी २००२**

वार्षिक सण व उत्सवांचा मुळारंभ या पुस्तकात लेखिका मंदा खारकर वर्षभर साजऱ्या होणाऱ्या सण व उत्सवांचा उद्देश सांगु इच्छीतात.

या पुस्तकात लेखिका मंदा खारकर असा विचार मांडतात की २१ व्या शतकात ज्ञान आणि विज्ञानाच्या कक्षा रुंदावलेल्या आहेत, परंतु मानवी जिवन अतिशय धकाधकीचे असे झालेले आहे.

मानवाची मानसीक समाधानासाठी आणि प्रपंच सुखी होण्यासाठी व धार्मीक कार्यावर निष्ठा ठेवण्याची वृत्ती वाढत चालली आहे. असे लेखिका मंदा खारकर यांना वाटते.

वंशपरंपरेने पुर्वापार चालत आलेले सण अंधश्रध्देने साजरे करण्याऐवजी मुळ उद्देशांचा मागोवा घेतला पाहीजे असे लेखीका वार्षिक सण व उत्सवांचा मुळारंभ या पुस्तकात म्हणतात.

या पुजा अर्चा इत्यादी सोपस्कार करत बसण्याऐवजी त्या सणांमागील आशय  समजुन घेऊन आजच्या विज्ञानयुगास साजेल असे त्यांचे पुनरुज्जिवन व्हावे असा लेखिका मंदा खारकर यांचा लिखाणा मागील हेतु आहे.

लेखिका मंदा खारकर यांचे लिखाण हे एक लेखिका अशा वृत्तीचे नसुन एक सर्वसामान्यं गृहिणीच्या प्रातिनिधिक भुमिकेतुन लिहितात.

प्रत्येक महिन्यातिल सण व उत्सव, व्रतवैकल्यातुन आपल्या पुर्वजांनी मानवी जीवन घडवले आहे असे लेखीका या पुस्तकात म्हणतात. निसर्ग, प्राणी इत्यादींना महत्व देण्यासाठी, आदर देण्यासाठी हे सण व ऊत्सव निर्माण केले गेले आहेत असे लेखिका मंदा खारकर वार्षिक सण व उत्सवांचा मुळारंभ या पुस्तकात लिहितात.

या संगणक युगात ईश्वरनिष्ठेसाठी अंधश्रध्दा ऊपयोगी नसुन ऊत्तम संस्कारांची आवश्यकता आहे असे लेखिकेला वाटते. मानवतावादी विचार ठेवुन आणि प्रत्येक सणाबाबत पुर्ण विचार करुन जर आचरण ठेवले तर मानवी जीवन सुसह्यं होईल असे लेखिका मंदा खारकर वार्षिक सण व उत्सवांचा मुळारंभ या पुस्तकात लिहितात.

नवरात्री ऊत्सवा बाबत लिखाण करतांना लेखिका देविला भुमीचे रुप मानुन भुमिची पुजा करण्यास प्राधान्यं देतात.

या पुस्तकाची भाषा लेखिका मंदा खारकर यांनी अतिशय साधी, सरळ आणि सोपी असी ठेवली आहे. त्याची लेखन शैली अतिशय ओघवती अशी आहे.

या पुस्तकात सणांची माहिती अतीशय कमी आणि विज्ञान वादी विचारांचे विष्लेषण हे पुर्णपणे नसले तरीपण लेखिका मंदा खारकर यांचा लिखाणा मागचा हेतु स्पष्टं होत जातो.

वार्षिक सण व उत्सवांचा मुळारंभ या पुस्तकात लेखिका मंदा खारकर यांचे पुस्तक वाचकाला सणांचे विष्लेषण करण्यात अतीशय परिपुर्ण असे ठरते.

**गणेश ल. केळकर : सात वार बारा महिने**
**वसंत बुक स्टॉल प्रकाशन, दादर**
**डिसेंबर १९९९**

लेखक गणेश ल. केळकर यांच्या सातवार बारा महिने लिखित पुस्तकात मराठी महिन्यानुसार येणाऱ्या सणांची माहिती दिली आहे.

महाराष्ट्रात मुख्यतः सणाची रेलचेल आहे आणि प्रत्येक दिवस आणि सणांचे महत्व हे वेगळे आहे असे लेखक म्हणतात.

प्रत्येक वाराचा आणि दिवसाचा वेगळा असा ठसा महाराष्ट्रातील समाज जीवनावर आहे असे लेखकाला वाटते.

प्रत्येक व्यक्ती ही सुखाची इच्छा ठेवते, त्यासाठी ती अवीश्रांत धडपड करते, पण त्याला यश मिळतेच असे नाही. त्या यशाचा मार्ग दाखवण्याचे काम हे सण करीत असतात आणि म्हणुनच व्यक्ती आणि समाज जीवनात सण व उत्सवाचे महत्वं अबाधित राहुन दिवसेंदिवस वृध्दींगत होत आहे असे लेखक गणेश ल. केळकर या पुस्तकात लिहीतात.

सध्याच्या बदलत्या आणि गतिमान जीवनातही भौतीक सुखाची लालसा असुनही ताणतणाव असुनही माणुस सण साजरे करतो यामागे परंपरा आहे असे लेखक या सातवार बारा महिने पुस्तकात लिखित करतात.

येणाऱ्या नविन पिढीसाठी हे सातवार आणि बारा महिने त्या वारांचा इतिहास आणि भुगोल, सामाजिक आशय या सर्वांच्या माहिती साठी हे पुस्तंक अतिशय उपयोगी असे आहे.

धार्मीक आणि भौगोलीक माहिती भरपुर असलेल्या या सातवार बारा महिने पुस्तकात वैज्ञानिक माहितीचा अंतर्भाव नाही असे असुनही हे पुस्तक वाचकाला माहिती पुरवते.

या लेखक गणेश ल. केळकर यांच्या पुस्तकाची लेखनशैली ही ओघवती असली तरीही या पुस्तकाची भाषा हि जड आणि त्रोटक वाटते. पण असे असले तरी प्रत्येक भागात आणि प्रत्येक जण सण साजरा करतांनाही विविध प्रकारे आणि विविध प्रदेशात तो सण कसा साजरा होतो याची माहिती या पुस्तकातुन मिळते.

हे सातवार बारा महिने हे लेखक गणेश ल. केळकर यांचे पुस्तक वाचकाला अतिशय ऊपयुक्त ठरते.

**पु. वि. हर्षे : सण आणि सुट्ट्या**
**पुरुषोत्तम प्रकाशन, गिरगाव, मुंबई**
**ऑगस्ट १९७९**

लेखक पु.वि. हर्षे लिखित सण आणि सुट्ट्या या पुरुषोत्तम प्रकाशन गिरगाव मुंबई प्रकाशित पुस्तकात सुट्ट्या का मिळतात? त्या कुठल्या सणांमुळे मिळतात ? त्या सणांमागील कथा काय आहेत ? हे या पुस्तकातुन उलगडण्याचा प्रयत्नं केला गेला आहे.

आज एखाद्या सणाची माहिती करुन घेणे तर राहोच, पण त्या सणाचे नावही आता विसरत चालले आहे. आज सुट्टी कशाची आहे तर उत्तर आज बँक हॉलीडे आहे असे म्हणणारे अनेक लोक आहेत हे जाणवल्यावर लेखक पु.वि. हर्षे यांना हे पुस्तक लिहीण्याची आवश्यकता वाटली.

लेखक पु.वि. हर्षे यांनी या पुस्तकात प्रत्येक सणाच्या आख्यायीका सांगीतल्या आहेत आणि त्या निवेदनात्मक रुपात आहेत. पण त्या मागे एखाद्या धर्ममार्तंडाचा आवेश नाही तर त्या अतिशय साध्या आणि सोप्या स्वरुपात आहेत.

या पुस्तकातील सणांचे कथन फक्तं हिंदु धर्मापुरते मर्यादीत न रहाता इतर धर्मातील रितिरिवाजांचा पण यात समावेश आहे.

सण हे मानव जातीला केवळ आनंद प्राप्तं करुन देत नाहीत तर ते त्यांना एका समान प्रेरणेने आणि श्रध्देने एकत्र बांधुन ठेवतात असे लेखक लिहिले आहे.

प्रत्येक सणांच्या आख्यायीका पण या पुस्तकात अंतर्भुत केल्या आहेत.

पुस्तकातील लेखनात काही शाब्दीक उणीवा राहील्या असल्या तरी त्या देण्यात आलेल्या माहितीने झाकल्या गेल्या आहेत.

पु.वि. हर्षे यांनी या सण आणि सुट्ट्या पुस्तकात सण व ऊत्सवांची माहिती देतांना लेखकाचा स्वतंत्र असा स्वतःचा असा सामाजिक किंवा वैज्ञानिक उद्देश दिला गेलेला नाही. लेखकाचा मुळ उद्देश विद्यार्थ्यांना आणि इतरांना माहिती मिळावि हाच उद्देश आहे.

गणेशोत्सवाच्या बाबत महिती देतांना पु. वि. हर्षे हे, पेशव्यांच्या काळात गणेशोत्सव कसा साजरा होत असे याची माहिती देतात. लोकमान्यं टिळकाच्या काळात राष्ट्रभक्तीचा प्रचार करणे हा गुन्हा मानला जात असे.

राष्ट्रभक्तीचा प्रचार करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव आणि शिवयंती सार्वजनिक करुन त्यांना उत्सवाचे स्वरुप दिले आणि लोकजागृती केली असे या सण आणि सुट्ट्या पुस्तकात पु.वि. हर्षे लिहितात.

तसेच आजच्या गणेशोत्सवा बाबत पु.वि. हर्षे सण आणि सुट्ट्या पुस्तकात टिकात्मक लिखाण पण करतात.

या पुस्तकाची भाषा आणि लेखनशैली ही गोष्टीरुप आणि आख्यायीकेकडे झुकणारी झाली आहे. तरी लेखकाचा सुट्ट्या का आणि कशासाठी हे पोहोचवण्यात लेखक .वि. हर्षे सण आणि सुट्ट्या पुस्तकातुन सफल झाले आहेत.

**दा. कृ. सोमण : आपले सण व उत्सव**
**कॉन्सेप्ट बुक्स, पुणे**
**मे २००७.**

लेखक दा. कृ. सोमण लिखीत आपले सण व उत्सव या कॉन्सेप्ट बुक्स पुणे प्रकाशीत पुस्तकात, काही नव्या आणि आधुनिक विचारांसह सण आणि उत्सवांचा आढावा घेतला आहे.

लेखक दा. कृ. सोमण या पुस्तकात, सण व उत्सव का साजरे होतात त्यामागील महत्व काय, ते त्याच ऋतुत का साजरे केले जातात, या संबंधी लिहितात.

तसेच आजच्या काळात सण व उत्सव का साजरे केले पाहिजेत, ते कुठल्या पध्दतीने साजरे झाले पाहिजेत म्हणजे पर्यावरण रक्षण इत्यादी प्रकारे ते आधीक चांगल्या प्रकारे केले जाऊ शकतात असे लेखक दा. कृ. सोमण लिखीत आपले सण व उत्सव या पुस्तकात लिहितात.

सण व उत्सव हे शरीराचे आणि मनाचे आरोग्यं चांगले ठेवण्यासाठीच असतात, ऋतुंप्रमाणे ते आहारात बदल करायला सांगतात. निसर्गातील प्रत्येक घटकावर ते प्रेम आणि आदराची भावना व्यक्तं करावयास सांगतात. सण पर्यावरणाचे जतन करावयास सांगतात. माणसा माणसातील प्रेम माया आपुलकी अधीक दृढ करावयास शिकवतात. असे लेखक दा. कृ. सोमण आपले सण व उत्सव या पुस्तकात लिहितात.

आपले सण व उत्सव या पुस्तकात तुम्ही आनंदाने जगा आणि इतरांना पण जगु द्या असा संदेश सण व ऊत्सव देतात. या सणांच्या निमित्ताने आप्तेष्टं एकत्र येऊन आनंदाने दिवस घालवतात, असे लेखक दा. कृ. सोमण लिहितात.

या सण व उत्सवाच्या निमित्ताने मणसे एकत्र येऊन एक टीम तयार होते, आणि यात स्वयंसेवकाचे काम हे विना वेतन असते कामे करतांना कोणी लहान वा मोठा नसतो, प्रत्येक जण स्वयंसेवक असतो.

तर हे सण व उत्सव हे साजरे जरुर करावेत, परंतु त्यासाठी प्रत्येकाने आपापली जबाबदारीची बंधने घालुन घ्यावीत, आपला आनंदोत्सव दुसऱ्याच्या दुखाःचे कारण होऊ नये, असे  असे सामाजिक

विचार  लेखक दा. कृ. सोमण आपले सण व उत्सव या पुस्तकात लिहितात.

तसेच आपले सण व उत्सव या पुस्तकात लेखक दा. कृ. सोमण यांनी सणांचे वर्गीकरण पण केले आहे जे अभ्यासकाला अभ्यासाला मदतशीर ठरते.

१) राष्ट्रीय सण आणि उत्सव.
२) ऋतुवर आधारित सण आणि उत्सव.
३) कौटुंबिक सण आणि उत्सव.
४) गाणपत्यं सण आणि उत्सव.
५) सौर सण आणि उत्सव.
६) देवीचे सण आणि उत्सव.
७) शैव सण आणि उत्सव.
८) वैष्णव सण आणि उत्सव.
९) अवतारासंबंधीचे सण आणि उत्सव.
१०)व्रत- उत्सव.

या पुस्तकात लेखक दा. कृ. सोमण यांनी उत्सवा प्रती प्रेम आणि आदराची भावना ठेवुन तर लिखाण केलेले आहेच पण त्यांचे लिखाण आणि विचार पर्यावरण जागृती करणारे, जुन्या रुढी ज्या समाजास अहीतकारी आहेत उदा. अंधश्रध्दा यावर टिका पण करणारे आहेत.

गणेशोत्सवात पाळावयाची काही पथ्येपण आपले सण व ऊत्सव या पुस्तकात लेखक दा. कृ. सोमण यांनी दिली आहेत. ती थोडक्यात अशी आहेत की,

१)गणेशमूर्ती ही मातीचीच असावी.
२)ती जास्तीत जास्तं १८ ईंच ऊंचीची असावी.

३)गणेश मंडळाने वर्गणी ही ऐच्छीक ठेवावी.
४)गणेशोत्सव मंडळे ही नोंदणीकृत असावीत.
५)गणेशमंडळाने मूर्तीच्या आजुबाजुची सजावट करण्यासाठी थर्माकोलचा वापर टाळावा.
६)गणेशमंडळाने ध्वनिवर्धकाचा वापर संयमाने करावा.
७) गणेशमंडळात व्यसनी लोकांना प्रवेश नको.
८) गणेशमंडळाने निर्माल्याचा वापर हा खतनिर्मीती साठी करावा.
९) गणेशमंडळाने समाजप्रबोधनकारी कार्यक्रम ठेवावेत.
१०)गणेशमंडळाने स्वच्छता आणि स्वयंसुरक्षा आणि शिस्तं ठेवावी.
११)सर्वधर्म समभाव ठेवावा. समाजकार्यासाठी पैशाचा वापर करावा.
१२)गणेशविसर्जन हे कृत्रीम तलावात करावे.

नवरात्री उत्सवा बाबत लेखक दा. कृ. सोमण यांनी स्त्रिवादी दृष्टीकोण ठेवला आहे. जसे देवी ही दुष्टांचा नाश करणारी आहे असे मानतात, तसेच स्त्रियांनीपण आत्मसंरक्षण शिकावे. बलवान आणि जागृत व्हावे, ऊच्चपदे भुषवावीत.

एक स्त्री जर शिक्षीत असेल तर अवघे कुटुंब सुशिक्षित आणि सुसंस्कारीत होते.स्त्री नवऱ्याची व्यसनाधीनता थांबवु शकते, भ्रष्टाचार रोखु शकते असे असे लेखक दा. कृ. सोमण यांचे या आपले सण व उत्सव पुस्तकात लिहितात.

मंदीरातील देवाकडे लक्ष देण्यापक्षा घरच्या देवीकडे अधीक लक्ष दिले तर घराची आणि पर्यायाने देशाची अधीक प्रगती होईल, असे लेखक दा. कृ. सोमण लिहितात.

या प्रमाणे दा. कृ. सोमण लिखीत आपले सण व उत्सव या कॉन्सेप्ट बुक्स पुणे प्रकाशीत पुस्तकात, सण व ऊत्सवाप्रती सजग, सुसंस्कारीत, सामाजिकपणे लिखाण करतात.

आपले सण व उत्सव या पुस्तकात लेखक दा. कृ. सोमण अतीशय ओघवती भाषा वापरतांना दिसतात. वैचारिक लेखनशैली आणि सुजाण नागरीकाची विचारसरणी या पुस्तकातुन जाणवते. समाजप्रबोधनकारी दृष्टीकोण ही या पुस्तकाची ऊजवी बाजु ठरली आहे.

या पुस्तकाची भाषा ही अतीशय परखड झालेली आहे. अतिविज्ञानवादी आणि समाजवादी झालेली आहे असे पारंपारीक विचारसरणीच्या लोकांना वाटु शकते. पण असे असुनही, आजच्या काळात विचार करुन सण व उत्सव साजरे करणे ही आजच्या काळाची गरज आहे. तरच समाजाची, पर्यावरणाची हानी आपल्या सण व ऊत्सवा द्वारे थांबु शकेल आणि समाज सजग होईल.

समाजातील प्रथा-परंपरांचे आणि सण व उत्सवांचे अंधपणे अनुकरण करण्यापेक्षा सजगपणे आणि वैज्ञानिकपणे या सणांकडे पहा असे लेखक दा. कृ. सोमण यांचे या आपले सण व उत्सव पुस्तकात सांगणे आहे.

# संशोधन पध्दती

# (RESEARCH METHODOLOGY)

## प्रकरण ३रे

# संशोधन पध्दती

# (RESEARCH METHODOLOGY)

महाराष्ट्रात मुख्यतः हिंदु धर्मात उत्सव अनेक होतात पण प्रामुख्याने सार्वजनिक स्वरुपात साजरे होणारे दोन सण, ज्यांचे स्वरुप भारतापुरते मर्यादित राहिले नाही तर जागतिक झाले आहे व ते दोन मोठे सण व उत्सव म्हणजे गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव. या दोन्ही उत्सवांचे स्वरुप खूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. ज्या कारणासाठी हे उत्सव सुरु झाले होते, ती कारणे आता बाजुला पडत चालली आहेत.

टिळकांचा गणेशोत्सव सार्वजनिक रित्या सुरु करण्यामागे हेतु लोकांनी एकत्र यावे हा होता. चतुःसुत्री मार्फत ((स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण) प्रसार करणे, लोकांना सजग करणे हा होता. पण आज ११० वर्षाच्या कालखंडा नंतर गणेशोत्सवाचे स्वरुप संपूर्णपणे बदललेले दिसुन येते.

पुर्वीच्या काळात या गणेशोत्सवात कीर्तने, प्रवचने, मेळे, व्याख्याने वगैरे विविध प्रकारांनी समाज जागृती घडुन येण्यास हातभार लागत असे. तसेच गणेशोत्सव हा विविध कलाकारांना पुढे आणण्याचं हक्काचं व्यासपिठ होतं. पण आज मात्र गणेशोत्सवाचे स्वरुप संपूर्णपणे बदललेले दिसुन येते. करोडोंची उलाढाल या सार्वजनिक गणेशोत्सवात आज घडुन येते. यातील सर्वात जास्तं खर्च हा फक्त दिखावेगिरी साठी केला जातो.

विशिष्ट वर्गातील लोकांची मक्तेदारी असा हा उत्सव झाला आहे. गणेशमूर्तींच्या ऊंचीची गणेशमूर्तींच्या देखाव्यांची स्पर्धा म्हणजे सार्वजनिक गणेशोत्सव हेच समिकरण आज रुढ झाले आहे. लोकांचे गणेशप्रेम या दिवसात उतु जात असते. भव्यदिव्य  उत्सव, गर्दी, पर्यावरणाची हानी, लोकांचा वाया जाणारा वेळ आणि पैसा यास हे सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव कारणीभुत आहेत. पण त्याच बरोबर लोकांचा सकारात्मक कल पण या उत्सवा कडे दिसुन येत आहे.

जी गोष्ट सार्वजनिक गणेशोत्सवाची तीच सार्वजनिक नवरात्रीउत्सवाची पण हा मराठी नवरात्रीउत्सव आता नवरात्रीउत्सव या नावाने न ओळखला जाता, गरबा या नावाने ओळखला जात आहे. नऊ दिवसांचा हा मराठी नवरात्रीउत्सव पुर्वी  घटस्थापनेपासुन देविचे घट बसवुन पुजा करुन सुरु होऊन विवाहीत बायका दहा दिवस हळदीकुंकु, व मराठी भोंडला, झिम्मा, फुगडी ई. खेळ खेळुन रात्री देवीसमोर जागरण करीत असत.

गुजरात मधे खेळला जाणारा गरबा कधी  मराठी जनतेचा महाराष्ट्राचा झाला ते कळलंच नाही. देविच्या आराधनेसाठी खेळली जाणारी नृत्यं आणि गाणी आता डि.जे. अणि ऑर्केस्ट्रावर कर्णकर्कश्य आवाजात लावुन त्या म्युझिक आणि गाण्यांच्या तालावर दहा रात्री हजारो लोक बेधुंद होऊन नाचत असतात. चमचमत्या रोषणाईत रोज रात्री वेगवेगळे पेहराव, वेशभुषा यांच्या स्पर्धा पण या उत्सवात घेतल्या जातात. करोडोंची उलाढाल या सार्वजनिक नवरात्रीउत्सवात आज घडुन येते.

एकुणच लोकांचा ओढा देवाकडे वाढला असला तरी, अशा सार्वजनिक उत्सवा मार्फत भोगवादी प्रवृत्ती, गर्दी, पर्यावरणाची हानी, लोकांचा वाया जाणारा वेळ आणि पैसा यात वाढ होत आहे.

या विषयाकडे संशोधिकेचे लक्ष वेधण्याचे कारण म्हणजे, या उत्सवाकडे बघण्याचा दृष्टीकोण अभ्यासणे. गोरेगाव उपनगरातिल सामाजिक व सांस्कृतिक बदल अभ्यासणे.

मुंबई शहरातील पार्ल्यानंतर ओळखले जाणारे दुसरे मराठी माणसाचे सांस्कृतिक उपनगर म्हणजे गोरेगाव होय. बदलत्या काळानुसार येथिल सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सवाचे स्वरुपही बदलत आहे. ते अभ्यासणे. या बदलत्या स्वरुपाची कारणे काय असु शकतात, याचा अभ्यास करुन ती जाणुन घेणे. सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव यांच्या बदलत असणाऱ्या स्वरुपाचा सामाजिक दृष्ट्या सकारात्मक अणि नकारात्मक परीणाम याचा अभ्यास करुन ती जाणुन घेणे.. तसेच हा विषय सध्या चर्चेत आहे. यासाठी संशोधिकेला हा विषय निवडावा वाटला.

या विषयाबद्दल बरेच काही चांगले वाईट लिहुन येत असते पण ते सर्व वाचुनही लोकांची मतं काय आहे हे जाणुन घेऊन त्यावर समाजशास्त्रीय अभ्यास करणे महत्वाचे वाटते.

पुण्यातील गणेशोत्सवाबद्दल अनेक प्रबंधकारांनी लिखाण केले आहे. पण मुंबईमधील गोरेगाव उपनगरातिल सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव या संदर्भात अभ्यास अजुनही झाला नाही. तसेच या उत्सवांचा अभ्यास करताना या उपनगरातिल लोकांची उत्सवाप्रती बदलणारी मानसिकता अभ्यासणे महत्वाचे वाटते आहे.

"गोरेगावची लोकसंख्या २००१ मधे सात लाख, शेहचाळीस हजार चोपन्न ईतकी होती". (संदर्भ – गोरेगाव नगरपालीका खाते अधिकारी.) या लोकांची सामाजिक आणि सांस्कृतिक जडण घडण कशी आहे हे अभ्यासता येईल. माणुस हा उत्सवप्रीय आहे तो या उत्सवात स्वतःला झोकुन देतो त्या मागची कारणे अभ्यासणे महत्वाचे वाटले.

नुसता गणेशोत्सव किंवा नुसता नवरात्रीउत्सव यांचा वेगवेगळा अभ्यास न करता या दोन्ही उत्सवांचा एकत्रीत अभ्यास करणे हे महत्वाचे वाटले, कारण एक देव अणि एक देवी हा लिंगभावी दृष्टीकोण पण या संदर्भात आवश्यक ठरतो.

एकुणच या विषयाचा सर्वांगिण अभ्यास तोही समाजशास्त्रीय दृष्टीकोणातुन करण्याचा प्रयत्न संशोधिकेनेन या प्रबंधात केला आहे.

## संशोधन समस्येचे विधान :–
(STATEMENT OF RESEARCH PROBLEM)

**गोरेगाव उपनगरातील सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सवाचे बदलते स्वरुप : एक समाजशास्त्रीय अभ्यास.**

## संशोधनाची उद्दिष्टे:–
(RESEARCH OBJECTIVES)

गोरेगाव उपनगरातील सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव या संदर्भात दृष्टीकोण बदलत चालला आहे. उत्सवाची सुरुवात ही ज्या कारणासाठी झाली ती कारणे आता बाजुला पडत चालली आहेत. उत्सव म्हणजे चंगळवाद, भोगवाद, दहा दिवस मजा, गाणी ,म्युझीक, डि. जे. यावर धांगडधिंगा करण्याचे हुकमी साधन असे आजची तरुण पिढी

मानत आहे. पैशांचा म्हणजेच या उत्सवात जमा होणाऱ्या वर्गणीचा दुरुपयोग होत आहे. रोषणाई, ध्वनियंत्रणेवर होणारा खर्च, मोठमोठ्या मूर्ति, प्रचंड मोठे देखावे, याची प्रत्येक मंडळात चढाओढ सुरु आहे.

बदलत्या जागतिकिकरणामुळे जग बदलले, समाजही बदलला, त्या प्रमाणे सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव पण बदलला. त्यामागे काही विशिष्टं कारणे आहेत.

या उत्सवा दरम्यान पर्यावरणाची अतिशय हानी होते आहे. मोठमोठ्या मूर्ती, रोषणाई, देखावे, ध्वनीयंत्रणा ई. अनेक कारणांनी मृदाप्रदुषणात, जलप्रदुषणात, ध्वनीप्रदुषणात वाढ होते आहे.

नवरात्री उत्सवात रोज नऊ दिवस गरबा नृत्यं, गणेशोत्सवात दहा दिवस रांगाच्या रांगा गणेश दर्शनासाठी लावणे यात मुंबईकरांचे तासन् तास वेळ आणि पैसा वाया जात आहे.

पोलिस यंत्रणेला या उत्सवादरम्यान अतिरिक्त सुरक्षा यंत्रणा प्रदान करुन या उत्सवा दरम्यान कुठलेही अनुचित प्रकार होऊ नये याची दक्षता घ्यावी लागते.

गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव या संदर्भात त्या काळात वृत्तपत्रे, मासिके यात सकारात्मक (संस्कृतिरक्षक) आणि नकारात्मक पर्यावरणाहानि या संदर्भात लेख लिहुन येत असले तरी समाजशास्त्रीय दृष्ट्या समाज हा विचार कसा करतो आहे याचे परिक्षण पण करणे महत्वाचे ठरते.

## १)गोरेगाव उपनगरातील सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सवाचे स्वरुप जाणून घेणे.

**२) १९५० नंतर गोरेगाव उपनगरातील झालेले सामाजिक आणि सांस्कृतिक बदल लक्षात घेणे.**

**३) सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सवांच्या बदलत्या कारणांचा अभ्यास करणे.**

**४)पर्यावरण,पैसा,वेळ, पोलिसयंत्रणा यांची होणारी हानी अभ्यासणे.**

**५) सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव यांच्या समाजशास्त्रीय दृष्ट्या सकारात्मक आणि नकारात्मक बाजु अभ्यासणे.**

## संशोधनाचि गृहितकृत्ये:–
(REASERCH HYPOTHYSIS)

ज्या कारणासाठी सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सवाची सुरुवात झाली ती कारणे लक्षात घेता बदलत्या काळानुसार गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव हा भोगवादाकडे झुकत चालला आहे असे दिसते.

सामाजिक एकता आणि पर्यावरणाची पुजा, व्याख्याने, देशभक्ती हे गणेशोत्सव व नवरात्रीउत्सवाचे उद्देश आता पुर्णपणे बदलले आहेत.

सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव यातुन समाजाचे पर्यावरण, पैसा, वेळ, पोलिसयंत्रणा यांचाअपव्यय  होतो आहे.

**१)बदलत्या काळानुसार गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव हा भोगवादाकडे झुकत चालला आहे.**

**२) सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सवाची सरुवात ज्या कारणा साठी झाली (सामाजिक एकता आणि पर्यावरणाची पुजा, व्याख्याने देशभक्ती) ती कारणे आता बाजुला पडत चालली असुन त्याचे स्वरुप आता भव्यदिव्य व स्पर्धात्मक होत चालले आहे.**

**३) सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव यांनी समाजाचा पर्यावरण, पैसा, वेळ, पोलिसयंत्रणा यांचा अपव्यय  होतो आहे.**

**४) सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सवाच्या काळात पर्यावरणीय प्रदुषणात प्रचंड भर पडते आहे.**

## संशोधनाचे कार्यक्षेत्रः–
( RESEARCH AREA)

मुंबईतिल पश्चिम उपनगरापैकी एक उपनगर म्हणजे गोरेगाव. दक्षिणेस जोगेश्वरी आणि ऊत्तरेस मालाडच्या मधोमध वसलेले आहे. या उपनगरात पहाडी, ऊकसर, गोरेगाव व आरे ही पुर्ण गावे तसेच चिंचवली,

दिंडोशी, माजास, कोंडीवरे, मरोशी, परजापुर, पाचपोळी या गावांचा काही भाग समाविष्ट आहे. १९४१ च्या सुमारास गोरेगावात तिन ते चार हजारांची वस्ती होती. २००१ मधे गोरेगावची लोकसंख्या सात लाख, शेहचाळीस हजार चोपन्न एवढी झाली. (संदर्भ – गोरेगाव नगरपालीका खाते अधिकारी.) आज गोरेगाव सिमेंटचे जंगल होऊनही आरे कॉलनीची हिरवाई प्रसिद्ध आहे.

एकुण चार हजार दोनशे साठ एकर जागेवर गोरेगाव शहर वसलेले आहे. जसजसा या गोरेगावचा विकास होत आहे, तसतसे ऊद्योगांचे माहेरघर पण गोरेगाव होत आहे.

दक्षिणेला घोडबंदर रोड, ऊत्तरेला सर्व औद्योगीक वसाहती, पूर्वेला महानंदा डेरी, निरलॉन, विरवाणी यासारख्या कंपन्या, नेसको सारख्या मोठ्या कंपन्या, आरेची दुग्ध वसाहत, मॉडर्न बेकरी, दिंडोशी सारखी मोठी वसाहत, ओबेरॉय मॉल, बिगबजार सारखे सुपर मार्केट, पश्चीमेला लिंकरोड, आय. टी. सेंटर्स, मोठ्या प्रमाणात असणारे बि.पि.ओ. कॉलसेंटर्स इ.अनेक सुवीधांनी गोरेगावचे आजचे चित्र बदलत आहे.

राजकारणातही गोरेगावच्या अनेक व्यक्तींची नावे घेतली जातात. रामभाऊ नाईक, मृणालताई गोरे, सुभाष देसाई, गजानन किर्तीकर, ही आपापल्या क्षेत्रातील मातब्बर मंडळी ही गोरेगावचीच.

प्रख्यात व्हायोलीन वादक पंडित डि.के. दातार, तबला वादक सुरेश तळवळकर, अभिनेता सुनील बर्वे, पुष्कर श्रोत्री, दिग्दर्शक सतिश मन्वर, चिन्मय मांडलेकर अशी अनेक मंडळी ही गोरेगावचीच.

विलेपार्लेनंतर साहित्यिक आणि सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात आघाडीवर असणारे गोरेगाव हे मुंबईतील दुसरे उपनगर आहे. स्वातंत्र्यपुर्व काळात येथे मोठ्या प्रमाणात गोरे सोल्जर राहात म्हणुन या

गावास गोरेगाव हे नाव पडले. तर काहींच्या मते येथे गुरे जास्तं प्रमाणात असल्याने गुरांचे गाव ते गोरेगाव हे नाव पडले. तर काहींच्या मते येथे गोरे आडनावाच्या व्यक्ती जास्तं प्रमाणात असल्याने गोरेगाव हे नाव पडले.

गोरेगावात अनेक सण व उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. गोरेगाव हे मुंबईतील धार्मीक दृष्ट्या महत्वाचे स्थान आहे. अनेक मंदिरे, धार्मीक मठ इ. चे पावीत्र्यं येथे मोठ्या प्रमाणात राखले जाते. गोरेगावातील ध्यानसाधना केंद्र, अंबीका माता मंदिर, श्री काडसिध्देश्वर मंदिर, रामेश्वर मठ, शनी मंदिर, आसाराम बापु ध्यानसाधना केंद्र, साई मंदिर, वाघेश्वरी मंदिर ही गोरेगावातिल प्रसिध्द ठिकाणे आहेत.

झपाट्याने वाढणारे उड्डाणपुल नी वसाहत प्रकल्प होऊनही गोरेगाव हे आरे कॉलनीच्या जंगलासाठी विषेश प्रसिध्द आहे. या जंगलामुळे व तेथील हिरवाईमुळे गोरेगाव विषेश प्रसिध्द आहे.

केशव गोरे स्मारक ट्रस्ट, मयुराश्रम, स्वाधार, पुर्नर्वास, सन्मीत्र, अशा अनेक समाज सुधारक संस्था गोरेगावच्या लौकिकात भर घालत आहेत.

नागरी निवारा, रहेजा टाऊनशीप, बिंबिसार नगर सारख्या मोठ्या वसाहतींमुळे गोरेगावचा चेहरा मोहरा बदलत चालला आहे.

(संदर्भ – केशव गोरेस्मारक ट्रस्ट अहवाल वर्ष–२००२-२००३.) (गोरेगाव नगर पालिका.)

## गोरेगाव ऊपनगरातील सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीऊत्सवाची मंडळे:–

| | | |
|---|---|---|
| १)विनायक नगर, सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीऊत्सव मंडळ | : | आय १५, विनायक नगर सार्वजनिक रहिवाशी संघ, रोड नं. २ गोरेगाव (पश्चिम). |
| २)काकाजी नगर, सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीऊत्सव मंडळ | : | जवाहरनगर रोडनं. १ जोशीवाडी गोरेगाव (पश्चिम) |
| ३) सन्मित्र सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि जयदुर्गा नवरात्रीऊत्सव मंडळ | : | तात्या टोपे नगर आरे रोड,रेल्वेस्टेशन गोरेगाव(पश्चिम) |
| ४)इंडस्ट्रीयल कॉलनी सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीऊत्सव मंडळ | : | इंडस्ट्रीयल कॉलनी गोरेगाव (पश्चिम). |
| ५) काकाजी नगर, सार्वजनीक गणेशोत्सव व नवरात्रीऊत्सव मंडळ | : | सावित्री बाई चाळ गोरेगाव (पश्चिम). |
| ६) आराधना क्रीडा मंडळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ | : | संकल्पसिध्दी गणेश मंदिर विश्वेश्वर नगर, वीरवाणी इस्टेट गोरेगाव (पूर्व) |
| ७)गोकुळधाम सार्वजनिक गणेशोत्सव | : | गणेशमैदान, साईमार्ग, |

| | | |
|---|---|---|
| व नवरात्रीऊत्सव मंडळ | | गोरेगाव (पूर्व) |
| ८) सोनावाला गणेशोत्सव मंडळ<br>जयअंबे मित्रमंडळ | : | सोनावलावाडी,<br>गोरेगाव(पूर्व) |
| ९)सिध्दीविनायक बाळगोपाळ:<br>गणेशमंडळ<br>संयोग नवरात्रीऊत्सव मंडळ | | कामा ईस्टेट संयोग<br>नगर गोरेगाव (पूर्व) |
| १०) धर्मविकास सार्वजनिक<br>गणेशोत्सव व नवरात्रीऊत्सव मंडळ | : | वालभट रोड कामा ईस्टेट<br>गोरेगाव (पूर्व) |

## संशोधनाच्या मर्यादा :–
(RESEARCH LIMITATIONS)

सदर संशोधनात गोरेगाव उपनगरात संशोधन करतांना संशोधिकेला अनेक प्रकारच्या अडचणी आल्या. संशोधिका पुणे येथील टिळक विद्यापीठात एम. फील. करत असल्याने तिला संशोधनासाठी मुंबई पुणे जाणे येणे करावे लागत असे. तसेच या संशोधनासाठी सुरवातीला मंडळात प्रवेश करतांना खूप अडचणी आल्या कारण कोणत्याही मंडळातील उत्तरदाता ही माहिती का द्यायची असा प्रश्न विचारुन नकारात्मक सुरुवात करत असे. नंतर बरेच समजावुन सांगीतल्यावर तो उत्तरे देण्यास होकार देत असे.

अनेक नवरात्रीउत्सव मंडळातील माहिती ही रात्री गरब्याचा कार्यक्रम झाल्यानंतर भरुन घेतली गेली कारण, त्या आधी उत्तरदात्यांचा कल अशा प्रश्नांना उत्तरे देण्याचा नसलेला दिसुन येत असे. या

संशोधनाचे तथ्यं संकलन करतांना गणेशोत्सव झाल्यानंतर नवरात्री उत्सवादरम्यानच गणेशमंडळांची माहिती भरुन घेण्यात आली. त्यामुळे गणेशमंडळातिल उत्तरदाते त्यांच्या वेळा नवरात्री उत्सवातील उत्तरदाते आणि त्यांच्या वेळा घेउन तथ्यं संकलन करतांना खुप कष्टं पडले.

## नमुना निवड :–
(DATA COLLECTION)

संशोधक आपल्या संशोधनामध्ये ज्या जनसंख्येच्या विशीष्टं चलाचा निरीक्षण व पृथःकरणाद्वारे अभ्यास करणार असतो, त्या संस्थेचे छोटे प्रमाण म्हणजे नमुना व त्याची निवड करुन सामाजिक समस्येचे ऊत्तर शोधुन संशोधन प्रक्रीया पुर्ण करण्यासाठी ज्यांच्या कडुन माहिती प्राप्तं करावी लागते त्याना प्रतिसादक असे म्हणतात. प्रतिसादक म्हणजे मोठ्या गटातील जनसंख्या होय. संपुर्ण जनसंख्येवर समस्येचा अभ्यास करणे संशोधकाला शक्यं नसते, म्हणुन संशोधक संपुर्ण जनतेचे प्रतिनीधीत्व करणारे काही गट वेगवेगळ्या पध्दतिने निवडतो.

१)सदर संशोधनात संशोधिकेने संपुर्ण जनतेचे प्रतिसादक म्हणुन दहा सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव मंडळांची निवड केली आहे.

२)ही मंडळे गोरेगाव (पूर्व) व गोरेगाव (पश्चिम) या दोन भागात विभागली गेली आहेत.

३) यातिल प्रत्येक मंडळ आधी सार्वजनिक गणेशोत्सव व त्यानंतर सार्वजनिक नवरात्रीउत्सव साजरा करते.

४)या मंडळांची निवड करण्या अगोदर संशोधिकेने गोरेगाव येथील बऱ्याच मंडळांना भेटी दिलेल्या आहेत. आणि जी मंडळे मोठ्या प्रमाणात, खूप वर्षा पासुन हे ऊत्सव साजरे करतात, जी मंडळे प्रचलीत आहेत त्या मंडळांची मोजणी केली. त्या मंडळांची संख्या ही गोरेगाव (पूर्व) भागातिल २० मंडळे आणि गोरेगाव (पश्चिम) भागातील २० मंडळे अशी भरली.

५) यादृच्छीक नमुना निवड पध्दती (RANDOM SAMPLING ) अवलंबुन, गोरेगाव (पूर्व) भागातिल २० मंडळे आणि गोरेगाव (पश्चिम) भागातील २० मंडळातुन प्रत्येकी ५व्या मंडळाची निवड केली आहे.

६) गोरेगाव (पूर्व) भागातील ५ मंडळे आणि गोरेगाव (पश्चिम) भागातील ५ अशी एकुण १० मंडळांची निवड केली आहे.

७) जी मंडळे सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव दोन्ही साजरा करतात तीच मंडळे निवड केली गेली आहेत.

८) सदर संशोधनासाठी प्रत्येक मंडळातुन ५ उत्तरदात्यांची निवड केली आहे.

९) प्रथम उत्तरदाता मंडळाची अध्यक्ष झालेली व्यक्ती निवडण्यात आली आहे, कारण अध्यक्ष झालेली व्यक्ती ही त्या मंडळाची सर्वेसर्वा असते. त्या मंडळातील संपुर्ण कार्यक्रम, त्याचे नियोजन हे अध्यक्ष झालेली व्यक्ती पहात असते. तसेच प्रत्येक वर्षी मंडळातील कार्यक्रमात होणारे बदल या बद्दल त्या व्यक्तीला संपुर्ण कल्पना असते.

तसेच अध्यक्ष झालेली व्यक्ती ही मंडळाची जबाबदार व्यक्ती असते. त्या सोबतच ती समाजातील व्यक्ती देखील असते, त्या व्यक्तीचे पण या ऊत्सवा बाबत स्वतःचे असे मत असते. म्हणुन प्रथम उत्तरदाता मंडळाची अध्यक्ष झालेली व्यक्ती निवडण्यात आली आहे .

१०) प्रत्येक मंडळातील खजीनदार आणि सेक्रेटरी, यांची निवड दुसरा आणि तिसरा उत्तरदाता म्हणुन केली आहे. कारण प्रत्येक मंडळातील खजीनदार हा त्या त्या मंडळाचा जमाखर्चाचा तपशील ठेवत असतो आणि खजीनदाराला वर्गणीची रक्कम कुठे जास्तं खर्च होते याची माहिती अचुक असते, तर सेक्रेटरी हा मंडळातील अध्यक्षाच्या खालोखाल महत्व असणारी व्यक्ती असते, अध्यक्ष व,कार्यकर्ते व वर्गणीदार म्हणजे सामान्य लोक यांना जोडणारा दुवा असते.

खजीनदार आणि सेक्रेटरी झालेली व्यक्ती ही मंडळाची जबाबदार व्यक्ती असते. त्या सोबतच ती समाजातील व्यक्ती देखील असते, त्या व्यक्तीचे पण या उत्सवा बाबत स्वतःचे असे मत असते. म्हणुन प्रत्येक मंडळातील खजीनदार आणि सेक्रेटरी, यांची निवड दुसरा आणि तिसरा उत्तरदाता म्हणुन केली आहे.

११) तिसरा आणि चौथा उत्तरदाता म्हणुन मंडळातील दोन कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली आहे कारण मंडळातील कार्यकर्ता हा कृतिशील असतो. मंडळातील लोक व इतर सामान्य लोक (वर्गणीदार) यांच्या मधिल तो दुवा असतो. म्हणुन तिसरा आणि चौथा उत्तरदाता मंडळातील दोन कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली आहे.

१२) असे प्रत्येक मंडळातिल एकुण पाच उत्तरदाते :– अध्यक्ष, खजीनदार, सेक्रेटरी, दोन कार्यकर्त्यांची निवड नमुना गोळा करण्या साठी करण्यात आली आहे.

१३) यात स्त्री किंवा पुरुष असा भेदभाव करण्यात आलेला नाही.

१४)तसेच फक्तं मंडळातीलच लोकांची ऊत्तरदाते म्हणुन निवड करण्यात आली कारण ते सामान्य नागरीक असतात, त्याच बरोबर ते ऊत्सवाप्रति एक वेगळ दृष्टीकोण राखुन असतात. प्रत्येक वर्षी ऊत्सव घडवुन आणण्यात त्यांचा मोठा सहभाग असतो.

१५) असे गोरेगाव (पूर्व) भागातिल ५ मंडळे आणि गोरेगाव (पश्चिम) भागातील ५ अशी एकुण १० मंडळे त्यातील प्रत्येक मंडळातील ५ म्हणजे एकुण ५० उत्तरदात्यांची निवड नमुना गोळा करण्यासाठी केली आहे.

**कोष्टक:–**

(TABLE)

| एकुण मंडळांची संख्या | गोरेगाव ( पूर्व) | गोरेगाव (पश्चिम) |
|---|---|---|
| १० | ५ | ५ |
| एकुण उत्तरदाते | गोरेगाव ( पूर्व) | गोरेगाव (पश्चिम) |
| ५० | २५ | २५ |
| अध्यक्ष | ५ | ५ |
| खजीनदार | ५ | ५ |
| सेक्रेटरी | ५ | ५ |
| प्रत्येक मंडळा तील दोन कार्यकर्ते | १० | १० |

## तथ्य संकलन प्रक्रिया :–
(DATA COLLECTION PROCESS)

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती मिळवण्यासाठी मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आला आहे.कोणते प्रश्न विचारायचे आहेत याचा विचार करुन अनुसूची तयार केली. प्रत्येक प्रश्नाचे जास्ती जास्तं पर्याय लक्षात घेऊन, त्यावर विचार करुन, त्या नुसार प्रश्नांची मांडणी करण्यात आली.

प्रत्येक प्रश्नांना पर्याय ठेवले गेले. यामागे उत्तरदात्यांना विचार करायला वेळ मिळु नये व प्रश्नांची उत्तरे खरी यावी हाच ऊद्देश संशोधिकेचा होता. प्रश्नांची उत्तरे मिळवण्याचे काम स्वतः संशोधिकेने प्रत्येक मंडळांना भेटी देऊन निरिक्षण करुन पुर्ण केले. उत्तरदात्याची औपचारिकता संशोधिकेने सुरवातीला बोलुन मोकळेपणा निर्माण करुन केली. आणि नंतर अनुसूची भरण्यात आली.

जेवढ्या उत्तरदात्यांना  प्रश्न विचारायचे होते त्या सर्वाना मराठी भाषेची ऊत्तम जाण होती. काही नवरात्रीउत्सव मंडळे ही गुजराती समाजातील असल्याने मुलाखत अनुसूचीतील प्रश्न हिंदीतुन अर्थ समजाऊन देण्यात येऊन नंतर अनुसूची भरण्यात आली.

माहिती संकलन करण्यापूर्वी उत्तरदात्याची मानसिक तयारी विषयाचे महत्व समजाऊन देऊन करण्यात आली. प्रत्येक उत्तरदात्याचा विश्वास संपादन करुन एकेकट्यांच्या मुलाखती घेतल्यामुळे प्रत्येक उत्तरदाता स्वतंत्र विचारांनी अनुसुची भरु शकला. त्यामुळे विचारण्यात आलेल्या प्रश्नांची खरी उत्तरे उत्तरदाता देऊ शकला.

प्रत्येक मंडळा मार्फत मुलाखत अनुसूची भरण्यात येतांना इतरही अनेक जण आजुबाजुला जमत कुतुहलाने विषया संदर्भात विचारत आणि आमच्या कडुनही माहिती भरुन घ्या असे आवर्जुन सांगत.

## १) व्यक्तीगत माहितीः–

या सदरात उत्तरदात्याचे वय, लिंग, धर्म, वैवाहीक दर्जा, या संदर्भात माहिती भरण्यात आलीतसेच उत्तरदात्याचे मंडळातील स्थान/पद पण भरण्यात आले

## २) कुटुंबाचा प्रकारः–

यात उत्तरदात्याचे कुटुंब हे केंद्र आहे की संयुक्त आहे, ही माहिती भरण्यात आली.

यानंतर मुलाखत अनुसूची दोन विभागात विभागली गेली. यात अ) विभाग गणेशोत्सव संबंधी प्रश्नांचा करण्यात आला ब) विभाग नवरात्रीउत्सव संबधी प्रश्नांचा करण्यात आला.

## ३) मंडळातील कार्यक्रम :–

या अंतर्गत मंडळात कुठले कार्यक्रम होतात, या वरुन आजच्या काळात या उत्सवात कुठले कार्यक्रम जास्तं होतात ते कळाले.

## ४) वर्गणी :–

मंडळात वर्गणी घेतली जाते का तसेच, त्याची सक्ती केली जाते का , मंडळ वर्गणी किती घेते, यावरुन मंडळातील जमाखर्चाची रक्कम कळु शकली.

**५) राजकिय पक्ष संबंधः–**

मंडळ राजकिय पक्षाशी संबंधीत आहे का, आर्थीक मदत केली जाते का, या प्रश्नांद्वारे राजकिय पक्षाचा सहभाग दिसुन आला.

**६) वर्गणीचा वापर जास्त कुठेः–**

यावरुन वर्गणीचा वापर जास्त कुठे होतो, जमाखर्चाच्या रकमेचा तपशील ठेवला जातो का, असेल तर कसा, हिशेब तपासणी केली जाते का, कुठल्या कार्यक्रमावर जास्तं खर्च केला जातो यावरुन वर्गणीचा वापर जास्त कुठे होतो मंडळाकडे जमा होणाऱ्या पैशांचे नक्की काय होते याचा अंदाज बांधता आला.

**७)पोलिस सहभाग :–**

मंडळासाठी पोलिस सुरक्षा घेतली जाते का, आणि त्याचा खर्च कोण करतं, तसेच पुर्वीच्या आणि आताच्या सुरक्षा व्यवस्थेत काय काय बदल झाले आहेत, यावरुन दहशतवाद, गैरवर्तन या बाबत माहिती मिळु शकली.

**८) मूर्ति :–**

दोन्ही ऊत्सवातील मुर्तिचे आकारमान, प्रकार याद्वारे मृदाप्रदुषण व पर्यावरण या दोन्ही प्रश्नास हात घालता आला.

**९)ध्वनीः–**

ध्वनीयंत्रणा कुठली, तिचा वापर केव्हापासुन सुरु झाला, सर्वात जास्तं
मुर्तीसमोर काय लावले जाते, यावरुन ध्वनीप्रदुषणाचा प्रश्न व बदलत जाणारी संस्कृती उलगडता आली.

**१०) विसर्जनः–**

मूर्तिचे विसर्जन, निर्माल्य, मिरवणुकीचे तास, सर्वधर्मियांचा सहभाग, पैशाचा अपव्यय आहे का, यावरुन पर्यावरण, लोकांचा वेळ, पैशाचा अपव्यय, या उद्दीष्टापर्यंत पोहोचता आले.

**११) हेतुः–**

या प्रश्ना मार्फत लोकांचा उत्सवाकडे बघण्याचा कल शोधण्यात मदत झाली. तो धार्मीक आहे की चंगळवादी आहे ते अभ्यासता आले.

**१२)गरबाः–**

नवरात्रीउत्सवात गरबा कुठे खेळला जातो, सुरु केव्हा केला जातो, शासनाची वेळेची बंधने पाळली जातात का कुठल्या प्रकारचे नृत्यप्रकार खेळले जातात, इ. प्रश्नांनी लोकांचा भोगवादी दृष्टीकोण ऊलगडता आला.

**१३) पासः–**नवरात्रीउत्सवात प्रवेश फीचे पास असतात का, किती रकमेचे, रक्कम वाढते का, खाण्या पिण्याची सोय मंडळ करते का, याद्वारे उत्सवात किती प्रमाणात व्यावसायीकता आली आहे हे अभ्यासता आले.

**१४)स्पर्धा :–**

नवरात्रीउत्सवात रोज रात्री स्पर्धा घेतल्या जातात का या द्वारे या तपासाने उत्सवाच्या निमीत्ताने चंगळवाद कसा वाढत आहे हे दिसुन आले.

**१५) मराठी संस्कृती आणि गरबा :–**

मराठी नवरात्रीऊत्सव आणि गुजराती गरबा, कुठल्या नृत्यप्रकारास प्राधान्य द्यावे, यावरुन मराठी संस्कृती लोप पावत आहे का, की या उत्सवात मराठी आणि गुजराती संस्कृतीचे मिलन झाले आहे हे दिसुन आले.

**१६) लोकांचा कलः–**

हा उत्सव म्हणजे पैशाचा अपव्यय आहे का, उत्सव साजरा करण्याचे स्वरुप कसे असावे, लोकांना उत्सवाचे महत्व का वाटते, पर्यावरण, लोकांचा वेळ, पैशाचा अपव्यय, हे अभ्यासता आले.

**१७) मंडळाची स्थापना वर्षेः–**

मंडळांची स्थापना वर्षे भरुन घेण्यात आली यावरुन ह्या उत्सवांचे स्वरुप काळानुसार कसे बदलत गेले हे अभ्यासता आले.

## तथ्यांचे वर्गीकरण :–

(CLASSIFICATION OF DATA)

मुलाखत अनुसूचीद्वारे जी माहिती संकलीत झाली त्याचे वर्गिकरण करण्या साठी सांकेतीकरण केले. त्यानंतर कोष्टके, आकृती, आलेखाद्वारे या माहितीची मांडणी करण्यात आली. संपुर्ण माहितीचे वर्गिकरण चार गटात करण्यात केले गेले. त्याच प्रमाणे धर्म, जात, शिक्षण, व्यवसाय, कौटुंबीक प्रकार असे माहितीचे वर्गीकरण केले गेले. तसेच मंडळाचा आर्थिक भाग, पर्यावरण विषयक प्रश्न, लोकांचा ऊत्सवाकडे बघण्याचा दृष्टीकोण, खर्चाचा वापर, ध्वनीप्रदुषण, जलप्रदुषण, मृदाप्रदुषण ई. चा अभ्यास करता आला.

## तथ्यांचे विश्लेषणः–
(ANALYSIS OF DATA)

तसेच या तथ्य विश्लेषणा अंतर्गत तथ्यांचे सुरवातीला सारणीकरण करुन नंतर त्यांचे वर्गीकरण केले. यानंतर त्या मिळालेल्या माहितीचे तुलनात्मक परिक्षण केले. यात त्यांचे कोष्टक तयार करुन मग त्याचे विष्लेषण केले. आवश्यक वाटणाऱ्या माहितीचे आलेख काढुन विष्लेषण केले.

लोकांचा कल सामाजिकतेकडे किती आहे, सांस्कृतिकतेकडे किती आहे, याचा पण अभ्यास करण्यात आला. या उत्सवा दरम्यान लोक पर्यावरणाला किती महत्व देतात हे पण अभ्यासता आले.

## संशोधन प्रबंध मुख्यतः पाच प्रकरणात विभाजीत करण्यात आला.

### १)प्रस्तावनाः–

या प्रकरणात मुख्यतः सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव सुरु कसा झाला आणि त्याची आजची रुपरेषा कशी झाली आहे, याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. विविध वृत्तपत्रे, मासिके, पुस्तके, वेबसाईट याचा सर्वांगीण अभ्यास केला गेला. एकुण हिंदु सण व उत्सव यांचा धावता आढावा घेण्यात आला. सार्वजनिक गणेशोत्सव उत्सवातुन उद्योगाकडे कसा बदलत गेला याचा आढावा घेण्यात आला आहे.

मुंबईतील मुख्य गणेशमंडळांचा व त्यात होणाऱ्या कार्यक्रमांचा अभ्यास यात सामील केला गेला. तसेच मराठी नवरात्रीउत्सव आता गरबा

कसा झाला ओळखला गेला याचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्या आधी मुंबईत हा नवरात्रीउत्सवात काय काय परंपरा होत्या हे संपुर्णपणे प्रस्तावनेमधे सामील करण्यात आलेले आहे.

## २)वाङमयीन आढावा :–

यात मुख्यतः सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव या विषयावर तसेच हिंदु सण व उत्सव आणि संशोधन पध्दतीशास्त्रा वर लिखीत झालेल्या ग्रंथ व पुस्तकांचा अभ्यास करण्यात आला आहे. यात ५० वर्षापुर्वी हे उत्सव साजरे कसे होत याचा अभ्यास करण्यात आला. या सर्व ग्रंथामुळे या विषया संदर्भातील पुर्वीची माहिती कळाली.

## ३) संशोधन पध्दती :–

या प्रकरणात संशोधिकेला संशोधन विषयाचा अभ्यास करण्यास प्रेरणा का मिळाली ते थोडक्यात सांगुन संशोधनाची उद्दीष्टे, गृहीतके, संशोधनाचे कार्यक्षेत्र, नमुना निवड पध्दती, तथ्य संकन प्रक्रीया यांचा विस्तृतपणे अभ्यास करता आला. तर तथ्यांचे विष्लेषण थोडक्यात सांगण्यात येऊन त्या नंतर प्रकरण योजना कशी केली गेली याचा आढावा घेण्यात आला.

## ४) तथ्यांचे विष्लेषण आणि अन्वयार्थ :–

या प्रकरणात मुलाखत अनुसूचीतील प्रश्नांच्या नुसार उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितिचे विष्लेषण करण्यात आले. तसेच महत्वाच्या प्रश्नांची तुलना केल्यामुळे निष्कर्षाप्रत पोहोचण्यास मदत झाली. जिथे आवश्यक वाटले तिथे आलेख व कोष्टके मांडुन उत्तरदात्यांचा विष्लेषक अभ्यास करण्यात आला.

**५) निष्कर्षः–**

तथ्यांचे विष्लेषण व अन्वयार्थ झाल्यानंतर त्याचा अभ्यासपुर्वक व सखोल अभ्यास केला आणि त्या नंतर त्यावर विचार करुन निष्कर्ष काढण्यात आले

**या प्रकारे संपूर्ण संशोधन प्रबंध ५ टप्यात विभागला गेला आहे.**

.........................................

# तथ्य विश्लेषण आणि अन्वयार्थ

# (ANALYSIS & INTERPRETATION OF DATA )

## प्रकरण ४थे

# तथ्य विश्लेषण आणि अन्वयार्थ

सामाजिक संशोधनात तथ्यांचे संकलन केल्यानंतर विश्लेषण आणि वर्गीकरण करुन त्यांचा अन्वयार्थ लावणे आवश्यक असते. जोपर्यंत या तथ्यांचे विश्लेषण आणि अन्वयार्थ करीत नाही तोपर्यंत ही तथ्ये अर्थहीन असतात.

गृहितकृत्याच्या वा संशोधन समस्येच्या किंवा एखाद्या सिध्दांताबाबत संकलीत तथ्यांवर विचार करुन त्याचे विश्लेषण केले जाते. तथ्यांचे विशिष्टं प्रकारे संघटन करुन सिध्दांताची किंवा गृहितकृत्याची पडताळणी करता यावी याकरीता विश्लेषण करणे आवश्यक असते. आणि या तथ्यांचे निर्वचन करुनच त्या तथ्यांच्या आधारे निष्कर्ष मांडला जातो.

जुन्या संकल्पना आणि सिध्दांताचे पुनर्परीक्षण करुन नविन नियम आणि सिध्दांत शोधणे हे संशोधनाचे ऊद्देश असतात. या उद्देशपूर्ती करीता तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन आवश्यक असते. प्रत्येक संशोधन हे वस्तुनिष्ठं ज्ञान मिळवण्याकरीता केले जाते. आणि तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन केल्या शिवाय वस्तुनिष्ठ संशोधन होऊ शकत नाही.

नुसते तथ्यांचे संकलन करुन संशोधन पुर्ण होत नाही, तर त्या तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन करुनच तथ्यांना अर्थ प्राप्तं होतो. आणि त्या आधारेच निश्चीत निष्कर्षाची प्राप्ती होते. म्हणुन तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन ही संशोधनातील एक महत्वाची पायरी आहे.

तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन करण्यासठी प्रथम तथ्यांचे संपादन करावे लागते. मग द्वितीयक तथ्यांची छाननी केली जाते. त्यानंतर तथ्यांचे वर्गीकरण केले जाते. नंतर सांकेतीकरण केले जाते, यातुन तथ्यांची वैशिष्टे स्पष्टं होत जातात. आणि त्या नंतर तथ्यांचे सारणीकरण केले जाते. कारण सारणीकरणाने तथ्यांचा तुलनात्मक अभ्यास करता येतो. आणि यातुन तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचनाचे कार्य सोपे होते. आाणि अशा प्रकारे तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन केले जाते.

## गणेशोत्सवः–

९लोकमान्यं टिळकांनी “ सुरु केलेला सार्वजनिक गणेशोत्सव आता ग्लोबल स्वरुपात साजरा केला जाऊ लागला आहे. महाराष्ट्रातच नाही भारतातच नाही तर संपुर्ण जगभर गणेशोत्सवाची तयारी सुरु होते. दरवर्षी प्रमाणे गणेशोत्सव जवळ आला की अनेक गोष्टी घडु लागतात. मांडवाचा आकार, त्यासाठीचे खड्डे, गणेशमंडळासाठीचा विज पुरवठा, कार्यकर्त्यांकडुन वर्गणीसाठी दिल्या जाणाऱ्या धमक्या, अतिरेक्यांची भिती, असे अनेक विषय या दरम्यान चर्चेस सुरु होऊ लागतात. त्यानंतर गणेशोत्सव सुरु होतो. त्या वेळेस हेच विषय पुढे जाऊन ध्वनिप्रदुषण, गणेश विसर्जन नदीत करावे की कृत्रीम तलावात, की समुद्रात येथपासुन ते मिरवणुकीचा वाढत जाणारा वेळ, मिरवणुकी मधील कार्यकर्त्यांचे वर्तन, पोलीस यंत्रणेवर येणारा अतिरीक्त ताण अशा अनेक गोष्टींवर चर्चा होत रहाते. ती याच मार्गाने वर्षानुवर्षे सुरुच आहे.


लोकमान्यं टिळकांनी सुरु केलेला सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात करुन देखील ९११० “वर्षापेक्षा अधीक काळ सरुन गेला आहे.

स्वातंत्र्य चळवळ एकसंध व्हावी यासाठी केला गेलेला हा एक प्रयत्न होता. पुढे  कालानुरुप त्याच्यामधे अनेक बदल होत गेले. मुबईकरांचा खऱ्या अर्थाने जुना असा उत्सव म्हणजे गणेशोत्सव. अन्यं शहरांच्या तुलनेत गणेशोत्सव साजरा करण्याचि तऱ्हा ही वेगळी आहे. गेल्या काही वर्षात या उत्सवाचं स्वरुप आमुलाग्र बदलले आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवाचं समीकरण बदलत चाललं आहे. गणेशभक्तांची संख्या तर लाखांच्या घरात गेली आहे. आणि त्यामुळे सहाजीकच गणेशमंडळांची संख्या पण वाढत आहे. प्रभादेवीचा सिध्दिविनायक हा मुंबईकरांचं आराध्यदैवत बनला आहे. दर मंगळवारी तिथे लाखो भविक दर्शन घेत असतात.

सहाजीकच यामुळे गणेशोत्सवाला मुंबईत आगळे वेगळे आणि भव्यं दिव्यं स्वरुप प्राप्तं झालं आहे.

लालबागचा राजा हि तर एक मोठी राजवट झाली आहे. या भागात म्हणजेच गिरणगावात गणेशोत्सव सुरुवाती पासुन मोठ्या प्रमाणात साजरा होत आलेला आहे. लालबागचा राजा, गणेशगल्लीचा राजा इ. गणपतींच्या दर्शनासाठी कित्येक किलोमीटर रांगा लागतात. आदल्या दिवशी रात्रभर रांगेत उभे राहुन लोक दुसऱ्या दिवशी सकाळी दर्शन घेत असतात. गिरणीकामगारांवर आणी कॉम्रेड डांगे यांच्या सारख्या नेत्यांवर लोकमान्यं टिळकांचा खुप प्रभाव होता. कदाचीत त्यामुळे गणपती उत्सव गिरणगावात मोठ्या उत्साहाने साजरा होत आला आहे. आणि आता तर नवसाला पावणारा हा  लालबागचा राजा ही ख्यातीच झाली आहे.




उपनगरांमधे गणेशोत्सव तुलनेने उशीरा सुरु झाला आहे. पण आता मात्र शहरे, उपनगरे सर्वत्रच मोठ्या प्रमाणात गणेशोत्सवाचं स्वागत होतांना दिसत आहे. आणि हा उत्सव पण इतर शहरांच्या तुलनेत मुंबईत वेगवेगळ्या प्रकारे साजरा होतांना दिसत आहे.

एकेकाळी गणेशोत्सवांमधे मुंबईतील प्रत्येक उपनगरातील गणेशोत्सव मंडळे लोकनाट्यं, वग, व्याख्याने इ. कार्यक्रमावर भर देत असे. कारण मुंबईतील शाहिरी परंपरा मुंबईतील मराठी माणसाचे नाटकवेड, शाहिरी पथकाचे कार्यक्रम हे एकेकाळी करमणुकीचं मोठं साधन होतं. त्या काळी नाटकाचे प्रयोग पण फारसे खर्चीक नसत आणि साध्या स्टेजवर ते होऊ शकत असत.

आता मात्र मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सवासाठी बाहेरुन कलाकार बोलावतात. तेच नाटकांचं पण झालं. नाटकांचा खर्च पण वाढला. प्रयोगासाठी त्यांना हे स्टेज लहान पडु लागलं. खर्च वाढु लागला. त्याच वेळेस दुरदर्शन म्हणजेच टि.व्ही. संच आले.

त्यानंतर आालं चित्रपट आणि ऑर्केस्ट्राचं युग. सार्वजनिक गणेशोत्सवात पुर्वी चित्रपट मैदानात दाखवले जात असत. शिवाय जुने चित्रपट दाखवायचे असतील तर त्यांचा खर्च पण कमी असे. आणि चित्रपट बघायला पण खुप गर्दी होत असे. कारण त्या वेळेस भरमसाठ चॅनल्स, केबल कनेक्शन पण आले नव्हते. अणि प्रत्येक घराघरांत टिव्ही.संच पण आले नव्हते. आता मुंबईत मैदानंच नावापुरती राहिली आहेत. आणि टि.व्ही. , व्हि.सी.डी प्लेअर पण घराघरात आले आहेत. या सर्व कारणांमुळे सार्वजनिक गणेशोत्सवात होणारी गर्दी थांबली.

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या काळात होणाऱ्या सभा सुध्दा चांगले वक्ते, उत्सुक श्रोते, चांगले विषय या अभावी थांबले. शिवाय टि.व्ही. हे एक मनोरंजनाचे साधन पण उपलब्ध होते.


तसंच ऑर्केस्ट्राचं हल्ली चॅनल्सवर विविध गाण्यांचे कार्यक्रम होत असतात. त्यामुळे ऑर्केस्ट्रा पण मागे पडला आहे. शिवाय रात्री दहा नंतर शासनाने ध्वनीक्षेपकं, स्पीकर्स इ. वर बंदी घातल्याने लाऊडस्पीकर्स पण बंद असतात. मुंबईकर कामं आटोपुन घरी पोहोचायलाच रात्री दहा वाजतात. मग ऑर्केस्ट्रा होणार तरी कसा.

पुर्वी ही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळं आपलं स्टेज नवोदित कलाकारांना उपलब्धं करुन देत असत. आणि यातुनच अनेक मोठमोठे कलाकार मराठी रंगभुमीला मिळाले आहेत.

एकुण मुंबईत सार्वजनिक गणेशोत्सवात सर्व भर असतो तो केवळ मोठमोठ्या स्टेजवर, भव्यंदिव्यं देखाव्यांवर आणि रोषणाईवर. त्यासाठी काही मंडळे लाखो रुपये खर्च करतात. खर्चीक देखावे, उंचच उंच मूर्ति भव्यं दिव्यं स्टेज आणि ते पहायला येणारे लोक या सर्वांचीच संख्या वाढत चालली आहे.

गणपती दर्शनासाठी दररोज लाखो लोक या गणेशोत्सवात येत असतात. आणि हेच लक्षात घेऊन मोठमोठ्या कंपन्यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या जागी त्यांच्या जाहिराती लावावास सुरुवात केली आहे. त्यासाठी या कंपन्या या गणेशमंडळांना लाखो रुपये देत असतात. मग मंडळांच्या सुरवातीलाच दिसणारी गुटखा, सिगारेट, दारुची कमान कुणालाही खटकत नाही.

सार्वजनिक गणेशोत्सवात मुंबईकरांचा सहभाग कमी होत चालला आहे. गणेशोत्सव मुंबईकरांसाठी दर्शना पुरताच मर्यादित राहीला आहे. आणि तो आता विशिष्टं लोकांचिच मक्तेदारी होत चालला आहे.


उत्सव कोणाचा?

सार्वजनिक गणेशोत्सवातील बदल हा हळूहळू निर्नायकी अवस्थेकडे झुकू लागला आहे. आज सार्वजनिक गणेशोत्सवाला नेतृत्व राहिलेले नाही. कोणा एकाचा शब्द अंतिम, ही स्थिती राहिलेली नाही. गणेशोत्सवामध्ये कार्यकर्त्यांमध्ये आदर असलेली नावे तर आता एका हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच असतील. सध्याचे कोणतेही राजकीय नेतृत्व हे गणेशोत्सवाचे सार्वत्रिक नेतृत्व करू शकेल असे नाही.

परागा करंदीकर
parag.karandikar@esakal.com

**नवरात्रीउत्सवः-**

जन्मगाव सोडुन पोटापाण्यासाठी मुंबईत आलेल्या या गुजराती समाजाला त्यांचा नवरात्रीउत्सव साजरा करावा असं प्रकर्षाने वाटु लागले. मराठमोळे उत्सव दिवाळी, दसरा, गणपतीउत्सव साजरे होतांना पाहुन हा गुजराती समाज पण एकत्र आला. त्यांची लोक वस्ती

असणाऱ्या त्यांच्या भागात त्यांना जसं जमेल तसं रासगरबा खेळला जाऊ लागला. तो अपरिचीत पण कानाला गोड वाटणारा ठेका ऐकुन येणारे जाणारे लोक थबकुन पाहु लागले. या नृत्यात मजा आहे हे इतरांना जाणवु लागलं. त्यामुळे या ठेक्यावर ताल मराठी माणसाने धरला.

रासगरबा हा फिल्मी टच होताच मराठी माणसाने तो स्वीकारला. १९८१ सालात डिस्को दांडिया हा अल्बम लोकप्रीय झाला. आणि यावर रासगरबा आणि दांडीया खेळला जाऊ लागला. आणि नवरात्री मंडळं तयार होऊ लागली.

आज मुंबईत प्रत्येक नवरात्री मंडळात, प्रत्येक कॉलनीमधे, प्रत्येक सोसायटीमधे या गरबा दांडीयाच्या तालावर प्रत्येक व्यक्तींची पावलं थिरकत आहेत. पुर्वी रात्रभर चालणारा हा गरबा आता शासनाच्या बंधनामुळे, ध्वनीप्रदुषणाच्या प्रश्नामुळे, अतिरेकी कारवायांच्या भिती मुळे, काही रात्री घडणाऱ्या घटनांमुळे रात्री दहा पर्यंतच करण्यात आला आहे. तरीपण आज लोक शेवटच्या दोन दिवशी बारा वाजेपर्यंत अविरत चारचार तास प्रचंड म्युझीकची नशा अनुभवत नृत्यं करतंच असतात.

दांडीया आणि नवरात्री उत्सवाचं गरब्याचं स्वरुप व्यावसायीक झालेलं आहे. मोठ्या शहरातुन भव्यं असा कार्यक्रमांच आयोजन केलं जातं. गणपती संपले की नवरात्री उत्सवाचे तंबु मैदानात पडायला लागतात. शाळेतील खेळाची मैदानं पण भाड्यानी घेतली जातात. एकट्या मुंबईतच सुमारे दहाहजार नवरात्री उत्सव मंडळे आहेत.

या दांडीयाचं प्रमुख आकर्षण म्हणजे डि.जे., स्पीकर्स, प्रचंड मोठ्या आवाजात लावलेली गाणी, आकर्षक सजावट, नेत्रदिपक रोषणाइ, संध्याकाळचे ६-७ वाजले की हे नवरात्रीउत्सवांचे मंडप सजावटीने झगमगुन ऊठतात. पारंपारिक वेषभुषा केलेल्या तरुण

तरुणींची लगबग सुरु होते.आणि नामवंत डिजे आर्टीस्ट कोट्यावधी रुपयांची बिदागी घेऊन लोकांना त्यांच्या संगीताच्या तालावर नाचायला भाग पाडतात.

या दांडीयात सहभागी होण्यासाठी दर दिवसाचे २०० ते ५००० रुपयां पर्यंत शुल्कं आकारणारी अनेक मंडळे आहेत. सहाजीकच जेथे गरबा चालतो तेथे खाण्या पिण्याची पण व्यवस्था केलेली असते

मुंबईत या नवरात्री उत्सवाच्या काळात विस ते चाळीस हजार लोक विविध ठीकाणी गरबा खेळायला जातात. यात महविद्यालयीन तरुण आणि तरुणींचं प्रमाण सर्वात जास्तं आहे.

आधुनिक दांडीयात कर्णकर्कश्यं संगीताचा भरणा अधीक आहे. सुरवातीला लोकलाजेस्तव एक ते दोन पारंपारिक गितं स्टेजवर म्हणली जातात. आणि नंतर खऱ्या जल्लोशाला सुरुवात होते. ड्रम्बीटचा ठेका घुमायला सुरुवात होते. आाणि फाडफाड इंग्रजी बोलणारे मुलंमुली चणिया चोळी घालुन झब्बा धोती घालुन नाचण्यात दंग होऊन जातात.

सध्याचा नवरात्री ऊत्सव हा प्रचंड खर्चीक असा झाला आहे. प्रवेश शुल्काबरोबरच वेशभुषेसाठी पण प्रचंड खर्च ही आजची तरुण पिढी करते. तसेच दांडीयाच्या टिपऱ्यांचा पण या दिवसात प्रचंड खप होतो. हा खर्च ज्याच्या त्याच्या ऐपतीनुसार वाढत जातो.

मुलींमधे शरारा, लाचा, चोळी , साडी असे प्रकार प्रसीध्दं आहेत. बाकी सर्व बाबतीत जरी आधुनीकता असली तरी ही पिढी पेहराव मात्र पेहराव मात्र पारंपारीकच करते. मुलं सुरवार, झब्बा, पायजामा याबरोबरच केडीया सुरवार हा वेष परीधान करतात.

या नवरात्री उत्सवासाठी पोषाखात प्रचंड प्रकारचं वैविध्यं आलेलं आहे. या काळात कपडे विकणारी दुकानं पण सर्वाधीक व्यवसाय करतात. या नवरात्री उत्सवासाठी चार महीने आधीपासुन पोषाख आणि दागीन्यांची कारागीरी हे कारागीर करत असतात. हजारो कारागीरांना यात व्यवसाय मिळतो ही जमेची बाजु.



# बाजारभर नांदताहेत टिपऱ्या!

## दांडियाची तयारी : पाच रुपयांपासून विविध पर्याय उपलब्ध

वैशाली कांबळे : सकाळ वृत्तसेवा

मुंबई : मंगळवारी घटस्थापना होईल आणि सर्वत्र दांडियाची एकच धूम सुरू होईल. मुंबईत विविध मंडळांतर्फे 'दांडिया रास'चे आयोजन केले जाते. रासगरबा हे याचे प्रमुख आकर्षण असले तरी दांडियाच्या तालावर फेर धरण्याचाही तरुण-तरुणी मोठा आनंद घेतात. दांडिया म्हटले की 'टिपऱ्या' हव्याच. गरबा वा दांडिया ही जरी गुजरातची लोककला असली तरी आज संपूर्ण देशाने ती आपलीशी केली आहे. गुजराती बांधवांबरोबरच नवरात्रोत्सवाचा आनंद सर्व जण लुटत आहेत. म्हणूनच उत्सवादरम्यान बाजारभर टिपऱ्याच टिपऱ्या नांदत आहेत. यंदा पाचपासून ६० रुपये किमतीच्या १५ प्रकारांतील टिपऱ्यांनी बाजार सजला आहे.

जागर देवीचा

नवरात्रीचे विशेष आकर्षण असते ते गरबा आणि दांडिया रासचे. मग अगदी लयबद्धरीत्या नाचता आलेच पाहिजे, असा हट्ट कोणीच बाळगत नाही. रासगरबा खेळण्यासाठी टिपऱ्यांची गरज भासत नाही. टाळ्यांच्या साह्याने हा गरबा रंगतो; परंतु दांडियासाठी टिपऱ्या लागतातच. हे लक्षात घेऊनच दांडिया राससाठी रिटेल आणि होलसेल अशा दोन्ही बाजारपेठा टिपऱ्यांनी बहरल्या आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने उत्सवांना रात्री फक्त दहा वाजेपर्यंतची वेळ बंधनकारक करण्यात आली असल्याने याचा विपरीत परिणाम व्यवसायावर होतो, असे अनेक दुकानदारांचे म्हणणे आहे.

नवरात्रोत्सवानिमित्त बाजारात आलेल्या विविध प्रकारच्या टिपऱ्या.

**नाना रंग... नाना ढंग**

सनखेडा, दुरंगी, तिरंगी, बेअरिंग (बोटामध्ये अडकवून फिरवता येईल अशी स्टिलची टिपरी), वास, सॅटीन व बांधणीचे कापड गुंडाळलेली, घुंगरू लावलेली, मॅटेलिक आणि अॅक्रेलिक रंगांतील अशा विविध प्रकारच्या टिपऱ्यांनी बाजार फुलला आहे. विविध रंगांच्या आणि प्रकारच्या रिबिन्स व लेस सजविण्यात आलेल्या टिपऱ्याही बाजारात उपलब्ध आहेत. लहान, मध्यम आणि मोठ्या अशा आकारांत टिपऱ्या उपलब्ध आहेत. यांची किंमत अगदी पाच ते ६० रुपयांपर्यंत आहे.



या नवरात्री उत्सवात जशी मंडळं पैसा कमावतात तसेच मंडपवाल्यां पासुन ते खाद्यं पदार्थ विक्री करणाऱ्या पर्यंत अनेकांना यातुन व्यवसाय मिळत असतो. अनेक तरुण-तरुणींना आकर्षीत करण्यासाठी ही मंडळं

प्रयत्न करीतच असतात. सेलिब्रीटींना बोलावत असतात. मंडपा पासुन ते दांडीया पर्यंत प्रत्येक गोष्टं सजवलेली असते. असा आजचा नवरात्री ऊत्सव दहा रात्री साजरा होतो

## तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन करण्यासाठी खालील प्रकारे तथ्यांचे वर्गीकरण करण्यात आले.

### १) व्यक्तीगत माहिती:–

या सदरात ऊत्तरदात्याचे वय, लिंग, धर्म, वैवाहीक दर्जा, या संदर्भात माहिती भरण्यात आलीतसेच ऊत्तरदात्याचे मंडळातील स्थान/पद पण भरण्यात आले

### २) कुटंबाचा प्रकार:–

यात ऊत्तरदात्याचे कुटुंब हे केंद्र आहे की संयुक्त आहे, ही माहिति भरण्यात आली.

**यानंतर मुलाखत अनुसुची दोन विभागात विभागली गेली. यात**
**अ) विभाग गणेशोत्सव संबधी प्रश्नांचा करण्यात आला**
**ब) विभाग नवरात्रीऊत्सव संबधी प्रश्नांचा करण्यात आला.**

### ३) मंडळातिल कार्यक्रम :–

या अंतर्गत मंडळात कुठले कार्यक्रम होतात, या वरुन आजच्या काळात या उत्सवात कुठले कार्यक्रम जास्तं होतात ते समजले.

**४) वर्गणी :–**

मंडळात वर्गणी घेतली जाते का तसेच, त्याची सक्ती केली जाते का मंडळ वर्गणी किती घेते, यावरुन मंडळातील जमाखर्चाची रक्कम कळु शकली.

**५) राजकिय पक्षाशी संबंधः–**

मंडळ राजकिय पक्षाशी संबंधीत आहे का, आर्थीक मदत केली जाते का, या प्रश्नांद्वारे राजकिय पक्षाचा सहभाग दिसुन आला.

**६) वर्गणीचा वापर जास्त कुठेः–**

यावरुन वर्गणीचा वापर जास्त कुठे होतो, जमाखर्चाच्या रकमेचा तपशील ठेवला जातो का, असेल तर कसा, हिशेब तपासणी केली जाते का, कुठल्या कार्यक्रमावर जास्तं खर्च केला जातो यावरुन वर्गणीचा वापर जास्त कुठे होतो मंडळाकडे जमा होणाऱ्या पैशांचे नक्की काय होते याचा अंदाज बांधता आला.

**७)पोलिस सहभाग :–**

मंडळासाठी पोलिस सुरक्षा घेतली जाते का, आणि त्याचा खर्च कोण करतं, तसेच पुर्वीच्या आणि आताच्या सुरक्षा व्यवस्थेत काय काय बदल झाले आहेत, यावरुन दहशतवाद गैरवर्तन या बाबत माहिती मिळु शकली.

**८) मुर्तीः–**

दोन्ही उत्सवातील मुर्तीचे आकारमान, प्रकार याद्वारे मृदाप्रदुषण व पर्यावरण या दोन्ही प्रश्नास हात घालता आला.

**९)ध्वनीः–**

ध्वनीयंत्रणा कुठली, तिचा वापर केव्हापासुन सुरु झाला, सर्वात जास्तं

मुर्तीसमोर काय लावले जाते, यावरुन ध्वनीप्रदुषणाचा प्रश्न व बदलत जाणारी संस्कृती उलगडता आली.

**१०) विसर्जनः–**

मुर्तीचे विसर्जन, निर्माल्य, मिरवणुकीचे तास, सर्वधर्मियांचा सहभाग, पैशाचा अपव्यय आहे का, यावरुन पर्यावरण, लोकांचा वेळ, पैशाचा अपव्यय, या उद्दीष्टापर्यंत पोहोचता आले.

**११) हेतुः–**

या प्रश्ना मार्फत लोकांचा उत्सवाकडे बघण्याचा कल शोधण्यात मदत झाली. तो धार्मीक आहे की चंगळवादी आहे ते अभ्यासता आले.

**१२)गरबाः–**

नवरात्रीउत्सवात गरबा कुठे खेळला जातो, सुरु केव्हा केला जातो, शासनाची वेळेची बंधने पाळली जातात का कुठल्या प्रकारचे नृत्यप्रकार खेळले जातात, ई. प्रश्नांनी लोकांचा भोगवादी दृष्टीकोण उलगडता आला.

**१३) प्रवेश पासः–**

नवरात्रीउत्सवात प्रवेश फीचे पास असतात का, किती रकमेचे, रक्कम वाढते का, खाण्या पिण्याची सोय मंडळ करते का, याद्वारे उत्सवात किती प्रमाणात व्यावसायीकता आली आहे हे अभ्यासता आले.

**१४)स्पर्धा :–**

नवरात्रीउत्सवात रोज रात्री स्पर्धा घेतल्या जातात का या द्वारे या उत्सवाच्या निमीत्ताने चंगळवाद कसा वाढत आहे हे दिसुन आले.

### १ ५) मराठी संस्कृती आणि गरबा :–

मराठी नवरात्रीउत्सव आणि गुजराती गरबा, कुठल्या नृत्यप्रकारास प्राधान्य द्यावे, यावरुन मराठी संस्कृती लोप पावतांना दिसुन आली.

### १ ६) लोकांचा कलः–

हा उत्सव म्हणजे पैशाचा अपव्यय आहे का, उत्सव साजरा करण्याचे स्वरुप कसे असावे, लोकांना उत्सवाचे महत्व का वाटते, पर्यावरण, लोकांचा वेळ, पैशाचा अपव्यय, हे अभ्यासता आले.

### १ ७) मंडळाची स्थापना वर्षे:–

मंडळांची स्थापना वर्षे भरुन घेण्यात आली यावरुन ह्या उत्सवांचे स्वरुप काळानुसार कसे बदलत गेले हे अभ्यासता आले.

**संशोधीकेने तथ्यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी तथ्यांचे सारणीकरण केले. की ज्यातुन संशोधनाची उद्दीष्टे आणि गृहितके स्पष्टं होऊ शकतील.**

# उत्तरदात्याचे वय व वर्गवारी दर्शविणारा

## तक्ता क्र.–१

| शिक्षण \ वय | २१ ते ३० | ३१ ते ४० | ४१ ते ५० | ५१ ते ६० | ६० च्या वरील | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| बारावी | १० | ७ | ३ | १ | – | २१ |
| | ४७.६२% / ५०% | ३३.३३% / ४१.१८% | १४.२८% / ३७.५% | ४.७६% / २५% | – | |
| पदवीधर | २ | ५ | – | – | – | ७ |
| | २८.५७% / १०% | ७१.४३% / २९.४१% | – | – | – | – |
| पदव्युत्तर | – | – | – | – | – | – |
| | – | – | – | – | – | – |
| इतर | ८ | ५ | ५ | ३ | १ | २२ |
| | ३६.३६% / ४०% | २२.७३% / २९.४१% | २२.७३% / ६२.५% | १३.६४% / ७५% | ४.५५% / १००% | – |
| एकूण | २० | १७ | ८ | ४ | १ | ५० |

वरील तक्त्यात गणेशमंडळात सहभागी होणाऱ्या उत्तरदात्यांचे वय आणि गणेशमंडळात सहभागी होणाऱ्या उत्तरदात्यांचे शिक्षण या दोन प्रश्नांची तुलना केली आहे.

१) गणेशमंडळात सहभागी होणारे २१ ते ३० वयोगटातील उत्तरदाते २०(४०) आढळले. तर गणेशमंडळात सहभागी होणारे ३१ ते ४० वयोगटातील उत्तरदाते १७(३४%) आढळले. ४१ ते ५० वयोगटातील उत्तरदाते ८(१६%) आढळले. आणि गणेशमंडळात सहभागी होणारे ५१ ते ६० वयोगटातील उत्तरदाते ४(८%) आढळले. व गणेशमंडळात सहभागी होणारे ६० वयाच्या वरील उत्तरदाते १(२%) आढळले.

२) गणेशमंडळात सहभागी होणाऱ्या उत्तरदात्यांमधे १२ वी पास मधे २१(४२%) एवढे उत्तरदाते आढळले. आणि गणेशमंडळात सहभागी होणाऱ्या उत्तरदात्यांमधे पदवीधरांची संख्या ७(१४%) आढळली. पदव्युत्तर झालेले उत्तरदाते ०(०%) आढळली. आणि इतर म्हणजे बारावी च्या पेक्षा कमी शिक्षण घेणाऱ्यांची संख्या २२(४४%) एवढी आढळली.

३) गणेशमंडळात सहभागी होणारे २१ ते ३० वयोगटातील १२ वी पास उत्तरदाते १० (५०%) एवढे आढळले. ३१ ते ४० वयोगटातील १२ वी पास उत्तरदाते ७(४१.१८%) एवढे आढळले. ४१ ते ५० वयोगटातील १२ वी पास उत्तरदाते ३(३७.५%) एवढे आढळले. ५१ ते ६० वयोगटातील १२ वी पास उत्तरदाते १(२५%) एवढे आढळले.

४) गणेशमंडळात सहभागी होणारे २१ ते ३० वयोगटातील पदवीधरांची संख्या २(१०%) एवढी आढळली. ३१ ते ४० वयोगटातील पदवीधरांची संख्या ५(२९.४१%) एवढी आढळली.

५) गणेशमंडळात सहभागी होणारे २१ ते ३० वयोगटातील इतर म्हणजे बारावी च्या पेक्षा कमी शिक्षण घेणाऱ्यांची संख्या ८(४०%) एवढी आढळली. ३१ ते ४० वयोगटातील इतर म्हणजे बारावी च्या पेक्षा कमी शिक्षण घेणाऱ्यांची संख्या ५(२९.४१%) एवढी आढळली. ४१ ते ५० वयोगटातील इतर म्हणजे बारावी च्या पेक्षा कमी शिक्षण घेणाऱ्यांची संख्या ५(६२.५%) एवढी आढळली. ५१ ते ६० वयोगटातील इतर म्हणजे

बारावी च्या पेक्षा कमी शिक्षण घेणाऱ्यांची संख्या ३(७५%) एवढी आढळली. ६० वयाच्या वरील इतर म्हणजे बारावी च्या पेक्षा कमी शिक्षण घेणाऱ्यांची संख्या १(१००%) आढळली.

यावरुन असे दिसुन येते की गणेशमंडळात सहभागी होणारे २१ ते ३० वयोगटातील तरुणांची संख्या ही सर्वात जास्त आहे आणि नंतर ती वयोगटाप्रमाणे कमी कमी होत जाते.

गणेशमंडळात सहभागी होणाऱ्या उत्तरदात्यांमधे १२ वी पास आणि त्यापेक्षा कमी शिकलेले उत्तरदाते कार्यकर्ते म्हणुन सहभागी होत असतात.

एकुण असे आढळते की गणेशोत्सव पार पाडणारा मोठा वर्ग जो आहे तो तरुण अथवा अशिक्षीत आहे. की जो बेकार आहे.

# गणेशोत्सव मंडळाकडे वर्षाला जमा होणाऱ्या वर्गणीचा विनीयोग दर्शविणारा तक्ता क्र.– २

| वर्गणीचा वापर | पर्याय निवडला | पर्याय निवडला नाही | एकूण |
|---|---|---|---|
| सांस्कृतिक कार्यक्रम | १९ | ३१ | ५० |
| | ३८% / २२.३५% | ६२% / ४७.६९% | |
| सजावट | ३८ | १२ | ५० |
| | ७६% / ४४.७१% | २४% / १८.४६% | |
| मिरवणूक | २८ | २२ | ५० |
| | ५६% / ३२.९४% | ४४% / ३३.८५% | – |
| देणगी | – | – | – |
| | – | – | – |
| पाहुण्यांची सरबराई | – | – | – |
| | – | – | – |
| एकूण | ८५ | ६५ | १५० |

**वरील तक्त्यात गणेशमंडळाकडे जमा होणारी वर्गणी कुठे वापरली जाते याचा तपशिल दाखवतो.**

१) वरील तक्त्यात गणेशमंडळाकडे जमा होणाऱ्या वर्गणीचा वापर सांस्कृतिक कार्यक्रमावर होतो असा पर्याय निवडणारे १९(२२.३३%) उत्तरदाते आढळले. आणि गणेशमंडळाकडे जमा होणारी वर्गणीचा वापर सांस्कृतिक कार्यक्रमावर होत नाही असा पर्याय निवडणारे ३१(४७.६९%) उत्तरदाते आढळले.

२) गणेशमंडळाकडे जमा होणाऱ्या वर्गणीचा वापर सजावटीमधे खर्च होतो असा पर्याय निवडणारे ३८(४४.७१%) उत्तरदाते आढळले. गणेशमंडळाकडे जमा होणारी वर्गणीचा वापर सजावटीमधे खर्च होत नाही असा पर्याय निवडणारे १२(१८.४६%) उत्तरदाते आढळले.

३) गणेशमंडळाकडे जमा होणाऱ्या वर्गणीचा वापर मिरवणुकीमधे खर्च होतो असा पर्याय निवडणारे २८(३२.९४%) उत्तरदाते आढळले. गणेशमंडळाकडे जमा होणारी वर्गणीचा वापर मिरवणुकीमधे खर्च होत नाही असा पर्याय निवडणारे २२(३३.८५%) उत्तरदाते आढळले.

४) गणेशमंडळाकडे जमा होणाऱ्या वर्गणीचा वापर देणगी आणि पाहुण्यांच्या सरबराईसाठी कुठलेही गणेशमंडळ खर्च करत नाही असे दिसुन आले.

यावरुन असे दिसुन येते की, गणेशमंडळाकडे जमा होणाऱ्या वर्गणीचा वापर सर्वात जास्तं सजावटीवर , त्यानंतर मिरवणुकीवर, आणि सर्वात शेवटी सांस्कृतिक कार्यक्रमावर खर्च केला जातो.

यात एक बाब महत्वाची आहे की, सर्वात जास्तं सजावटीवर जमा होणाऱ्या रकमेचा भाग खर्च होतो. सजावटीच्या खर्चात मग रोषणाई, मूर्तीच्या आजुबाजुची सजावट, गणेशमूर्तीच्या सभोवतालचा परीसर, आणि गणेशमूर्ती सभोवतालचा मंडप इ. गोष्टी समाविष्टं होतात.

एकुणच आजच्या गणेशोत्सवात दिखावेगिरीला जास्तं महत्व आले आहे. टिळकांच्या काळात गणेशोत्सव हा देशभक्तीपर व्याख्याने, स्थानीक कलाकारांच्या कलेला प्राधान्य देण्यासाठी आणि अशा अनेक गोष्टींचा प्रसार करण्यासाठी होत असे, पण आज या गणेशोत्सवाचा मुळ गाभाच हरवला आहे. नुसती सजावट आणि दिखावेगिरिला महत्व प्राप्तं झाले आहे.

वरील तथ्यं विष्लेषणावरुन आणखीन एक गोष्ट आढळुन येतेकी, सर्वलोकांकडुन जमवलेल्या वर्गणीचा विनीयोग हा एखाद्या सामाजीक कार्यासाठी न होता रोषणाई आणि मिरवणुक अशा पैशाची नासाडी करणाऱ्या कार्यक्रमात खर्च केला जातो.

या पैशात एखाद्या सामाजिक कार्यास तडीस नेता येऊ शकते. एखाद्या गरीब मुलाचे शिक्षण होऊ शकते, अशा अनेक गोष्टी या पैशातुन होऊ शकतात. पण आज गणेशोत्सव केवळ दिखावेगिरीसाठी साजरा केला जात आहे हे आढळले.



टिळकांचा आत्मा तळमळत असेल...

– विक्रम गोखले

गणेशोत्सवाची प्रत्येक जण आतुरतेने वाट पाहत असतो. समाजाला एकत्र बांधून ठेवण्यासाठी लोकमान्य टिळकांनी चालू केलेल्या गणेशोत्सवाचं स्वरूप दिवसेनदिवस विद्रूप बनत चाललं आहे. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या नावाखाली चालू असलेला वेळ आणि पैशाचा अपव्यय पाहून ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले व्यथित होतात. आजच्या गणेशोत्सवाचं स्वरूप कसं सामाजिक अशांतीचं कारण ठरतंय ते त्यांच्याच शब्दात...

## प्रतिवर्षी आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तींचे आकारमान आणि प्रकार दर्शविणारा

### तक्ता क्र.– ३

| गणेशमूर्तीचे आकारमान / गणेशमूर्तीचा प्रकार | लहान | मोठा | आकार सतत बदलतो | आकार तोच रहातो | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| शाडू | – | ४ | ४ | – | ८ |
| | – | ५0% / २२.२२% | ५0% / ३0.७७% | – | |
| प्लास्टर ऑफ पॅरिस | ६ | १४ | ९ | १३ | ४२ |
| | १४.२८% / १00% | ३३.३३% / ७७.७८% | २१.४३% / ६९.२३% | ३0.९५% / १00% | |
| एकूण | ६ | १८ | १३ | १३ | ५0 |

वरील तक्त्यात गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा आकारमान आणी गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा प्रकार कुठला असतो यांची तुलना केली आहे.

१) गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा आकार लहान असतो असे उत्तर देणारे उत्तरदाते ६(१२%) एवढे आढळले. तर गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा आकार मोठा असतो असे उत्तर देणारे उत्तरदाते १६(३२%) एवढे आढळले. आणि गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा आकार दरवर्षी बदलत रहातो असे उत्तर देणारे उत्तरदाते १३(२६%) एवढे आढळले. व गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा आकार दरवर्षी तोच रहातो असे उत्तर देणारे उत्तरदाते १३(२६%) एवढे आढळले.

२) गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा प्रकार हा शाडुचा असतो असे उत्तर देणारे उत्तरदाते ८(१६%) एवढे आढळले. गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा प्रकार हा प्लास्टर ऑफ पॅरिस असतो असे उत्तर देणारे उत्तरदाते ४२( ८४%) एवढे आढळले.

३) वरील तक्त्यात गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा आकार लहान आणी गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा प्रकार प्लास्टर ऑफ पॅरिस असतो असे उत्तर देणारे उत्तरदाते ६(१००%) एवढे आढळले.

४) गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा आकार मोठा आणि गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा प्रकार शाडु आहे असे उत्तर देणारे उत्तरदाते ४(२२.२२%) एवढे आढळले.

५) गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा आकार मोठा आणि गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा प्रकार प्लास्टर ऑफ पॅरिस असतो असे उत्तर देणारे उत्तरदाते १४(७७.७८%) एवढे आढळले.

६) गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा आकार दरवर्षी बदलत रहातो आणी गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा

प्रकार शाडु आहे असे उत्तर देणारे उत्तरदाते ४(३०.५%) एवढे आढळले. तर गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तींचा आकार दरवर्षी बदलत रहातो आणी गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा प्रकार प्लास्टर ऑफ पॅरिस असतो असे उत्तर देणारे उत्तरदाते ९(६९.२३%) एवढे आढळले.

७) वरील तक्त्यात गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तींचा आकार लहान आणि गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा प्रकार शाडु आहे असे ऊत्तर देणारे ऊत्तरदाते ०(०%) एवढे आढळले.

तोच रहातो आणी गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीचा प्रकार प्लास्टर ऑफ पॅरिस आहे असे उत्तर देणारे उत्तरदाते १३(१००%) एवढे आढळले.


यावरुन असे दिसुन येते की, गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तींचा आकार मोठा असतो आणि दरवर्षी गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्ती प्लास्टर ऑफ पॅरिस पासुच बनवलेल्या आणतात.

दरवर्षी गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्ती प्लास्टर ऑफ पॅरिस पासुच बनवलेल्या असल्या मुळे जल आणि मृदा प्रदुषणात वाढ होते. यावरुन असे दिसुन येते की, गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तींचा आकार मोठा असल्याने त्या प्लास्टर ऑफ पॅरिस पासुच बनवलेल्या घ्याव्या लागतात कारण शाडु मातीच्या मूर्ती या कमकुवत असल्याने जास्तं मोठ्या असत नाहीत.

हे प्लास्टर ऑफ पॅरीस पाण्यात लवकर विरघळत नाहीत त्यामुळे गणेशोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी अनेक गणेशमूर्ती पाण्यात हात पाय तुटलेल्या अवस्थेत तरंगतांना दिसतात.

तसेच प्लास्टर ऑफ पॅरीस आणि त्यावर मूर्तीला दिलेले रंग हे विषारी असतात जे विसर्जनाचा आजुबाजुचा परीसर दुषीत करतात, मासे इ. जलचर यामुळे मरतात. या कारणांचा विचार न करता गणेशमूर्ती प्लास्टर ऑफ पॅरीसच्याच बनवल्या जातात आणि दहा दिवसांच्या सोहळ्या नंतर अशा हजारो मूर्ती पाण्यात विसर्जित केल्या जातात. असे संशोधिकेला आढळले.

तसेच आजकाल विविध कंपन्या आणि राजकीय पुढारी त्यांच्या जाहीरातींचे बॅनर लावण्यासाठी गणेशमंडळाला लाखो रुपये दान करतात. मग हा पैसा गणेशमूर्तींचा आकार मोठा घेण्यात खर्च केला जातो असे संशोधिकेला आढळले.


—AFP
Every man's
elephant
god

## गणपतीसमोर लावली जाणारी ध्वनीयंत्रणा दर्शविणारा तक्ता क्र. –४

| स्पिकर्स | डॉल्बी | डिजिटल | एकूण |
|---|---|---|---|
| ५० | – | – | ५० |
| १०० | – | – | १०० |

वरील तक्ता हा गणपतीसमोर गणेशोत्सवात कुठल्या ध्वनीयंत्रणेचा वापर जास्तं होतो हे दर्शवीणारा आहे.

या तक्त्यात सर्व गोरेगावातील मंडळातील उत्तरदाते ५०(१००%) स्पीकर्सचा वापर ध्वनीयंत्रणा म्हणुन करतात असे निदर्शनास आले.

ही स्पीकर्सचा वापर असणारी ध्वनीयंत्रणा अतीशय मोठा आवाज असणारी असते. हे स्पीकर्स ४ फुट ऊंचीचे आणि प्रचंड आवाज फेकण्याची क्षमता असणारे असतात.

मानवाची आवाज सहन करण्याची शक्ती ही १८० डेसीबल असते, आणी ही स्पीकर्सचा वापर असणारी ध्वनीयंत्रणा त्यापेक्षा जास्तं आवाज असणारी असते. त्यामुळे कानांना बहीरेपणा, ह्रदयाच्या ठोक्याची गती वाढणे, चिडचीडेपणा असे अनेक विकार होऊ शकतात.

या स्पीकर्सचा वापर असणाऱ्या ध्वनीयंत्रणेमुळे गणेशमंडळाच्या आजुबाजुच्या घराच्या भिंती हादरतात एकमेकांचे

बोलणे ऐकु येत नाही अशा अनेक अडचणी येतात. यात लोकांचा आणि ध्वनीप्रदुषणाचा पण विचार केला जात नाही.

आणि गणेशोत्सव मंडळांना फक्तं स्पीकर्सचा वापर ध्वनीयंत्रणा म्हणुन का करतात असे संशोधिकेने विचारल्यावर डि.जे. वर शासनाने बंदी घातली आहे हे उत्तर देण्यात आले.

लोकांचे हे अचाट आवाजाचे स्पीकर्स ध्वनीयंत्रणा म्हणुन वापरुन पण समाधान होत नाही त्यांची इच्छा अजुन शक्तीशाली डि.जे. ध्वनीयंत्रणा म्हणुन वापरण्याची आढळली.

## गणपतीसमोर लावल्या जाणाऱ्या संगिताची वैविध्यता

## दर्शविणारा तक्ता क्र. – ४(ब)

| संगिताची वैविध्यता | पर्याय निवडला | पर्याय निवडला नाही | एकूण |
|---|---|---|---|
| गाणे | १४ | ३७ | ५१ |
| | २७.४५%<br>२२.२२% | ७२.५५%<br>४२.५३% | |
| स्तोत्र | २९ | २0 | ४९ |
| | ५९.१८%<br>४६.0३% | ४0.८२%<br>२२.९९% | |
| संगीत | २0 | ३0 | ५0 |
| | ४0%<br>३१.७५% | ६0%<br>३४.४८% | |
| एकूण | ६३ | ८७ | १५0 |

**दिलेल्या तक्त्यात गणपति ऊत्सवात गणेशमूर्ती समोर संगीत कुठले लावले जातेआणि त्याचा पर्याय निवडणाऱ्या उत्तरदात्यांची तुलना करण्यात आली आहे.**

१)गणेशउत्सवात गणेशमूर्ती समोर गाणे लावले जाते हा पर्याय निवडणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १४(२२.२२%) एवढी आढळली.

२) गणेशउत्सवात गणेशमूर्ती समोर स्तोत्र लावले जाते हा पर्याय निवडणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २९(४६.०३%) एवढी आढळली.

३) गणेशउत्सवात गणेशमूर्ती समोर संगीत लावले जाते हा पर्याय निवडणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २०(३१.७५%) एवढी आढळली.

यावरुन असे विश्लेषण करता येते की, स्तोत्र हा पर्याय निवडणऱ्या उत्तरदात्यांची संख्या सर्वात जास्तं आहे त्या खालोखाल संगीत, हा पर्याय निवडणऱ्या उत्तरदात्यांची संख्या आहे,अणि सर्वात शेवटी गाणी हा पर्याय निवडला गेला आहे.

असे असले तरी संशोधिकेच्या प्रत्यक्षदर्शी पहाणीवरुन असे दिसुन आले की, या गणेशोत्सवात सकाळी ६ ते ९  आणि संध्याकाळी ७ ते ८ वाजेपर्यंतच स्तोत्र आणी संगीत म्हणजे काही भक्तीगीतं लावली जातात.

बाकी दिवसभर आणि रात्री ११ वाजे पर्यंत कर्कश्यं आवाजात डी.जे., स्पीकर्स लावुन आजुबाजुच्या वृध्दं लोकांचा, विद्यार्थ्यांचा, आजारी व्यक्तींचा विचार न करता केवळ मजा म्हणुन चित्रपटातील गाणी, अश्लील गाणी, रिमीक्स गाणी मोठ्या आवाजात लावली जातात.

यात लोकांचा आणि ध्वनीप्रदुषणाचा पण विचार केला जात नाही. आणि यास विरोध केला असता १० दिवस तर गणपती आहेत असे निरर्थक उत्तर दिले जाते. असे संशोधिकेला आढळले.

# गणेशमुर्तीची मिरवणुक आणि विर्सजनाची माहिती दर्शविणारा तक्ता क्र. –५

| गणेश मूर्तीची मिरवणूक / गणेश मूर्तीचे विसर्जन | एक ते तीन तास | चार ते सहा तास | सात ते दहा तास | एकूण |
|---|---|---|---|---|
| समुद्रात | १ | – | – | १ |
| | १००% / १४.२९% | – | – | |
| कृत्रिम तलावात | ६ | ४० | ३ | ४९ |
| | १२.२४% / ८५.७१% | ८१.६३% / १००% | ६.१२% / १००% | |
| दान करतो | – | – | – | – |
| | – | – | – | |
| एकूण | ७ | ४० | ३ | ५० |

या तक्त्यात गणेशोत्सवातील गणेशमूर्तीचे विसर्जन कुठे केले जाते? आणि गणेशोत्सवातील मुर्तीच्या विसर्जनाच्या मिसरवणुकीचे तास किती असावेत या दोन प्रश्नांचा तुलनात्मक अभ्यास संशोधिकेने केला आहे.

१) वरील तक्त्यात गणेशोत्सवातील गणेशमूर्तीचे विसर्जन समुद्रात केले जाते असे १(२%) उत्तरांत्याचे म्हणणे आहे. या गणेशमूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावात दान करतो असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ४९(९८%) इतकी आढळली.

२) गणेशोत्सवातील मुर्तीच्या विसर्जनाच्या मिरवणुकीचे तास १ ते ३ तास असावेत असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ७(१४%) ईतकी आढळली. तर गणेशोत्सवातील मुर्तीच्या विसर्जनाच्या मिरवणुकीचे तास ४ ते ६ असावे असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ४०(८०%) ईतकी आढळली. आणि गणेशोत्सवातील मुर्तीच्या विसर्जनाच्या मिरवणुकीचे तास  ७ ते १० तास असावेत असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ३(६%) इतकी आढळली.

३) वरील तक्त्यात गणेशोत्सवातील गणेशमूर्तीचे विसर्जन समुद्रात केले जाते आणि गणेशोत्सवातील मुर्तीच्या विसर्जनाच्या मिरवणुकीचे तास १ ते ३ तास असावेत असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १(१४.२९%) इतकी आढळली.

४) गणेशोत्सवातील मुर्तीच्या विसर्जनाच्या मिरवणुकीचे तास १ ते ३ तास असावेत आणि गणेशोत्सवातील मुर्तीच्या विसर्जनाच्या मिरवणुकीचे तास ४ ते ६ असावे असे ऊत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ६(८.७१%) इतकी आढळली.

५) गणेशोत्सवातील मुर्तीच्या विसर्जनाच्या मिरवणुकीचे तास ४ ते ६ असावे आणि या गणेशमूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावात दान करतो असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ४०(१००%) इतकी आढळली.

या वरुन असे आढळुन येते की, गणेश मूर्तीचे विसर्जन ४ ते ६ तास करावे असे ऊत्तर देणाऱ्या ऊत्तरदात्यांची संख्या सर्वात जास्तं आहे. म्हणजेच गणेशोत्सवातील मुर्तीच्या विसर्जनाच्या मिरवणुकीत नाचण्या साठी कर्कश्यं आवाजात डी.जे. लावुन नाचणे मजा करणे एवढाच लोकांचा उद्देश असतो.

आजुबाजुच्या वृध्दं लोकांचा, विद्यार्थ्यांचा, आजारी व्यक्तींचा आणि ध्वनीप्रदुषणाचा पण विचार न करता केवळ मजा करण्यासाठी या लोकांना गणेशोत्सवातील मुर्तीच्या विसर्जनाच्या मिरवणुकीच्या निमित्ताने बेधुंद होऊन दारु पिऊन नाचण्यासाठी ६ तास हवे आहेत.

कारण आपल्या देशात ही गोष्टं देवासाठी आहे म्हणल्यावर त्यावर काहीच प्रतिऊत्तर द्यायचे नाही ही संकल्पना रुढ आहे.



गणेशोत्सवात कालानुरूप अनेक बदल झाले. त्यातील आता जाणवणारा आणि महत्त्वाचा बदल म्हणजे तो निर्नायकी बनत आहे. हा उत्सव आता झुंडीचा होत चालला आहे. (संग्रहित छायाचित्र

एकीकडे गणपतीला निरोप द्यायचा अणि दुसरीकडे भान विसरुन लोकानी का नाचायचे हा संशोधिकेला लहानपणीपासुन पडलेला प्रश्नं आहे.

तीच गोष्टं गणेशोत्सवातील मुर्तीच्या विसर्जनाच्या मिरवणुकीच्या निमीत्ताने गुलाल ऊधळण्याची गुलाबी रंग आनंद व्यक्तं करण्याचे प्रतीक आहे म्हणुन या उत्सवात गुलाल लावला जातो पण काही किलो रासायनीक गुलाल ऊधळणे कितपत योग्यं आहे हा पण एक प्रश्नंच आहे.

या मिरवणुकीत पुन्हा रस्त्यावर नाचुन ६ तास ट्राफीक जाम करायचा, पोलीस यंत्रणेला कामाला जुंपायचं, आणि या गोष्टी वर्षातुन एकदा तर गणेशोत्सव येतो, आपली हीच संस्कृती आहे असं म्हणत दरवर्षी तेच करायला लोकांना आवडतं. असं संशोधिकेला आढळुन आलं.

तरीपण गोरेगावात सामाजिक आणि पर्यावरणमित्र विचार करुन कृत्रीम तलाव बांधल्याने काही प्रमाणात का होईना जलप्रदुषण कमी करण्याचा प्रयत्नं होत आहे.

गोरेगाव पुर्व भागात पांडुरंगवाडी तेथे हा तलाव बांधण्यात आला आहे. या तलावा मुळे आरे कॉलनी, आरे रस्ता, पांडुरंगवाडी, गोगटेवाडी, जयप्रकाशनगर अशा अनेक गोरेगावातील गणेशभक्तांची सोय या तलावा मुळे झाली आहे. पण मूर्ती दान करण्याची संकल्पना अजुनही पारंपारीक विचारांचे लोक मान्यं करत नाहीत.

सामाजीक आणि पर्यावरणवादी विचार करुन कृत्रीम तलाव बांधल्याने काही प्रमाणात का होईना जलप्रदुषण कमी करण्याचा प्रयत्नं होत आहे.

# मूर्तीची ऊंची आणि मूर्तीचे प्रकार दर्शविणारा
## तक्ता क्र. – ६

| मूर्तीची उंची / मूर्तीचे प्रकार | लहान | मोठा | पर्याय दिलेला नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| पारंपारिक | १७ | २३ | – | ४0 |
| | ४२.५% / १00% | ५७.५% / १00% | – | |
| आधुनिक | – | – | – | – |
| | – | – | – | |
| पर्याय दिलेला नाही | – | – | १0 | १0 |
| | – | – | १00% / १00% | |
| एकूण | १७ | २३ | १0 | ५0 |

**वरील तक्त्यात नवरात्री उत्सवातील देवीच्या मूर्तीची ऊंची किती असते? आणि या मूर्ती कोणत्या प्रकारच्या घेतल्या जातात? या प्रश्नांचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.**

१) नवरात्री उत्सवातील देवीच्या मूर्तीची उंची ही लहान असते हे मत मांडणारे १७(३४%) उत्तरदाते आढळले. तर उंचीचा आकार मोठा असतो असे म्हणणारे २३(४६%) उत्तरदाते आढळले.

२) वरील तक्त्यात नवरात्री उत्सवातील देवीच्या मूर्तीचा प्रकार पारंपारीक असतो असे ४०(८०%) उत्तरदाते आढळले. नवरात्री उत्सवातील देवीच्या मूर्तीचा प्रकार आधुनिक असतो असे ०(०%) उत्तरदाते आढळतात.

३) नवरात्री उत्सवातील देवीच्या मूर्तीची उंची ही लहान असते हे मत मांडणारे आणि नवरात्री उत्सवातील देवीच्या मूर्तीचा प्रकार पारंपारीक असतो असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १७(१००%) इतकी आढळली.

४) नवरात्री उत्सवातील देवीच्या मूर्तीची उंची ही मोठी असते आणि आकार पारंपारीकच असतो असे म्हणणारे २३(१००%) इतके उत्तरदाते आढळुन आले.

५) नवरात्री उत्सवातील देवीच्या मूर्तीची उंची ही लहान वा मोठी कशीहि असो पण मूर्तीचा प्रकार आधुनिक असतो असे उत्तर देणारे उत्तरदाते ०(०%) आढळले.

वरील तक्त्याच्या विश्लेषणावरुन असे दिसुन येते की ४६% लोक नवरात्री उत्सवातील देवीच्या मूर्तीची उंची ही मोठी असावी यास प्राधान्यं देतात. पण हे करतांना लोकांना मूर्ती उंच असली तर ती प्लास्टर ऑफ पॅरीसची असावी लागते. आणि जर ती प्लास्टर ऑफ पॅरीसची असली तर त्या मागे भुमी प्रदुषण आणि जलप्रदुषण हे पर्यावरण विषयक मुद्दे येतातच. पण याचा लोक विचार करत नाहीत.


खरेतर अश्वीन महीन्यात आणि हिवाळा ऋतुत येणारा हा उत्सव देवीची म्हणजे या पृथ्वीची पुजा करण्यासाठी निर्माण केला गेला

**आहे. देवीला मातेसमान मानण्याची परंपरा या भारत भुमीत आहे. तसंच पृथ्वीला देवीचेच रुप मानण्यात आले आहे कारण तिच लोकांना अन्नं, वस्त्र, निवारा, पाणी देते. आणी त्याच देवीची पुजा करतांना आज लोक त्याच देवी समान मानलेल्या पृथ्वीची पर्यावरणाची हानी करत आहेत.**

**नवरात्री उत्सवातील देवीच्या मूर्तीची उंची ही लहान वा मोठी कशीहि असो पण मूर्तीचा प्रकार हा पारंपारीकच असला पाहीजे याबाबत लोकांचे मत ठाम आहे. आधुनिक स्वरुपातील देवीच्या मूर्तीला सर्वजण नाकारतात.**

**म्हणजे पोलीसाच्या पोषाखातली अथवा नेता किंवा डॉक्टर या रुपातली जर देवीची मूर्ती तयार केली तरी लोक त्याचा स्विकारच करणार नाहीत, याचे एक कारण असे आहे की लोकांच्या श्रध्देचा हा प्रश्नं आहे.**

**सामान्यं मानवी रुपात देवी दिसत असेल तर तिच्यात आणि एखाद्या स्त्रित काय फरक राहीला? कुठल्याही देवाचे रुप लोकांनी कथा आणि पुराणातुन असे तयार केले की ते, अमानवी दिसावे म्हणजे काय तर जर एखादा देव चार हाताचा असुन त्याने विविध शस्त्रे धारण केलेली दिसली की तो लोकांना चमत्कार वाटतो आणि चमत्कारा शिवाय नमस्कर नाही ही म्हण प्रसीध्दंच आहे. ही परंपरेने चालत आलेली एक अंधश्रध्दाच आहे, असे संशोधिकेला वाटते.**



# <u>नवरात्रीउत्सव मंडळाच्या वर्गणीचि माहिती देणारा</u>

## <u>तक्ता क्र.–७</u>

| मंडळ वर्गणी घेते / किती वर्गणी घेते | होय | नाही | पर्याय दिलेला नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| ११ ते २५ | २८ | – | – | २८ |
| | १००% / ६३.६३% | – | – | |
| २६ ते ५१ | १० | – | – | १० |
| | १००% / २२.७३% | – | – | |
| ५१ च्या पुढे | – | – | – | – |
| | – | – | – | |
| स्वेच्छेने | ६ | – | – | ६ |
| | १००% / १३.६४% | – | – | |
| पर्याय दिलेला नाहा | – | १ | ५ | ६ |
| | – | १६.६७% / १००% | ८३.३३% / १००% | |
| एकूण | ४४ | १ | ५ | ५० |

**या तक्त्यात नवरात्री उत्सव मंडळ वर्गणी घेते का? जर घेत असेल तर किती घेते? यावरुन मंडळाच्या जमाखर्चाची माहिती मिळु शकली आणि त्या बरोबर नवरात्री उत्सव मंडळ वर्गणीची लोकांवर जबरदस्ती करते का? याचा पण अंदाज घेता आला.**

१)वरील तक्त्यातील माहिती वरुन असे दिसुन येते की, ५०(१००%) उत्तरदात्यांपैकी, २८(७६%) उत्तरदाते ११रु. ते २५रु. वर्गणी दरवर्षी या नवरात्री उत्सवात भरतात. तर १०(२०%) उत्तरदाते २६रु. ते ५१रु. वर्गणी दरवर्षी या नवरात्री उत्सवात भरतात. आणि ५१रु. च्या पुढे वर्गणी नवरात्री उत्सवात भरणाऱ्यांची संख्या ०(०%) ईतकी आहे. तर पर्याय न निवडणाऱ्या उत्तरदात्यां मधे ६(१२%) उत्तरदात्यां मधे समावेश होतो असे आढळले.

२) नवरात्री उत्सव मंडळातील ४४(८८%) उत्तरदात्यांनी मंडळ वर्गणी घेते असे म्हणले आहे. तर मंडळ वर्गणी घेत नाही असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १(२%) इतकी संशोधिकेला आढळली. पर्याय न निवडणाऱ्यांची संख्या ५(१०%) इतकी दिसुन आली.

३) वरील तक्त्यातील माहितीची तुलना केली असता, २८(६३.६३%) उत्तरदाते नवरात्री उत्सव मंडळात दरवर्षी वर्गणी ११रु. ते २५रु. घेतली जाते असे आढळले.

४) १०(२२.७३%) उत्तरदाते नवरात्री उत्सव मंडळात दरवर्षी वर्गणी २६रु. ते ५१रु. घेतली जाते असे आढळले.

५) ५१रु. च्या पुढे नवरात्री उत्सव मंडळात दरवर्षी वर्गणी भरणारे उत्तरदाते ०(०%) आहेत असे आढळले.

६) स्वेच्छेने वर्गणी भरणाऱ्यांची संख्या ६(१३.६४%) अशी आढळली.

वरील तक्त्यातील माहितीच्या अभ्यासावरुन असे दिसुन येते की, सार्वजनिक गणेशोत्सवात भरमसाठ वर्गणी घेऊनही, तेच मंडळ

लोकांकडुन पुन्हा नवरात्री उत्सवात वर्गणी घेतच असते. आणि याला होकार देणाऱ्या उत्तरदात्याची संख्या ४४(८८%) ईतकी आहे.

या तक्त्यातील माहितीच्या अभ्यासावरुन असे दिसुन येते की, सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव या दोन्ही उत्सवांसाठी भरमसाठ पैसा उकळला जातो. आणि तो रोषणाई, भपकेबाजपणा , डी. जे. यावर खर्च केला जातो. यावरुन या उत्सवा मार्फत भपकेबाजपणा फोफावला जातो हेच सिध्दं होते. तरुण पिढी या उत्सवाच्या माध्यंमातुन फक्तं भोगवादी प्रवृत्तीला उधाण देत असते.



CITY

MUMBAI MIRROR | WEDNESDAY, OCTOBER 1, 2008

# Dandiya queen insured for whopping Rs 1.2 cr

Sankalp takes no chances with star attraction Falguni Pathak, pays Rs 45,000 premium for 10-day cover

Mumbai Mirror Bureau

Given her immense popularity and appeal, dandiya queen Falguni Pathak has been insured for a whopping Rs 1.2 crore for a period of 10 days, starting Tuesday, during the navratri festival this year.

Taking no chances, the organisers of Sankalp have paid a premium of Rs 45,000 for Pathak's insurance cover that will be provided by Bajaj Allianz, a general insurance company.

"The insurance will cover her failure to perform due to a variety of possible reasons that may include illness or accidental injury during the event. We have opted for a 10-day insurance cover for her as her presence throughout the festival is important for us. She is the star attraction and we cannot think of dandiya without her," said Devendra Joshi, president of Sankalp Dandiya, the city's most famous dandiya show, which has now moved from Goregaon to Andheri's Bhavan's College campus.

When contacted, Santosh Balan, head of corporate communications for Bajaj Allianz, said, "The insurance cover has been provided under the celebrity and event insurance cover package which is valid only for the period of that event. In this case, the validity period is 10 days and the premium amount is around Rs 45,000."

Every day during the annual navratri festival, 35,000 to 45,000 people visit Sankalp Dandiya.

This year, in view of the increased terror threat, more than 40 CCTVs have also been installed at the venue. Sankalp has also insured the entire event, including the sets, for Rs 1.3 crore.

## Fire brigade to monitor number of revellers at dandiya venues

SUDHIR SURYAWANSHI

At every popular dandiya venue in the city, a fireman will be stationed at the gate. His duty is to do no more than count the number of people entering. If the fireman finds the number of people exceeding reasonable limits, he will ask the organisers not to allow any more people in. And should the organisers ignore his order, he can even stop the dandiya. This precaution is being taken in view of the tragic stampede at Jodhpur's Chamunda Temple on Tuesday, where 150 people were crushed to death, Chief Fire Officer A D Sawant said.

Nearly 80 dandiya organisations in the city and 380 in the suburbs have sought permission to organise shows.

Sawant said they have asked all organisers to follow fire brigade's norms to avoid any untoward incident. "We do not want to take any chances. We have asked our men to closely monitor all dandiya shows. If they feel the hall or ground is overcrowded, they will ask the dandiya organisers to stop further entry. In case the organisers do not take our men seriously, we will get the show shut down with the help of local police," said Sawant.

Meanwhile, a fire officer cautioned people not to believe in rumours. As a safety measure, the fire brigade has also asked organisers not to burst firecrackers, and to avoid cooking eatables at the venue.

"We have asked them to install fire fighting equipment and cover electric cables properly. Our firemen will be constantly monitoring the situation", said Sawant.

Girish Kavale, secretary of the Gopal Krishna Krida Mandal, a major dandiya organiser at Mumbai Central, said that they have received the guidelines from the fire brigade. "We have formed a team of 20 people, who will be at every nook and corner of the venue. They will help the fire brigade to keep the numbers in check," said Kavale.

ही वर्गणी ११रु. पासुन ५१रु.पर्यंत लोकांच्या ऐपती प्रमाणे का असेना वाढत जाते. आणि एका महिन्याच्या अंतरात हीच वर्गणी पुन्हा याच भपकेबाज पणासाठी तेच मंडळ घेत असते.

सामान्यं लोकं पण इतर लोकात वेगळे विरुध्दं वागलेले उठुन दिसेल, नंतर याच मंडळाच्या कार्यकर्त्यांकडुन समाजात त्रास होईल, या भावनेने मनाविरुध्दं का होईना ५०रु. हातावर टिकवतात.

असे लाखो रुपये सार्वजनिक गणेशोत्सवात आणि नवरात्री उत्सवात एका महिन्याच्या आत पाण्यासारखे वहावले जातात.

फक्तं (२%) उत्तरदाते जेव्हा मंडळ वर्गणी घेत नाही असे म्हणतात यावरुन सार्वजनिक गणेशोत्सवात आणि नवरात्री उत्सवात वर्गणी भरणे बंधनकारक आहे असे दिसुन येते, जरी उत्तरदात्यांनी हे संशोधिकेला स्पष्टं केले असले तरी, प्रत्यक्ष मंडळाच्या ठिकाणी तेथील लोकांच्या संवादातुन ही गोष्टं संशोधिकेला आढळून आली.

## नृत्यादरम्यान घडुन येणाऱ्या असभ्य वर्तनावरील मंडळाचे नियंत्रण दर्शविणारा तक्ता क्र.–८

| नृत्यादरम्यान असभ्य वर्तन प्रकार होतात / त्यावरील नियंत्रण | होय | नाही | पर्याय दिलेला नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| होय | १ | २८ | – | २९ |
| | ३.४४% / १00% | ९६.५५% / ६३.५% | – | |
| नाही | – | १ | – | १ |
| | – | १00% / २.६% | – | |
| पर्याय दिलेला नाही | – | १५ | ५ | २0 |
| | – | ७५% / ३४% | २५% / १00% | |
| एकूण | १ | ४४ | ५ | ५0 |

वरील तक्त्यात नवरात्री उत्सवात असभ्य वर्तनाचे प्रकार घडुन येतात का? आणि जर ते घडत असतील तर मंडळ त्यावर नियंत्रण घालते का? या प्रश्नांची तुलना करुन विश्लेषण केले आहे.

१) वरील तक्त्यात नवरात्री ऊत्सवात असभ्य वर्तनाचे प्रकार घडुन येतात असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १(२॰) इतकी आढळुन आली.

तर नवरात्री उत्सवात असभ्य वर्तनाचे प्रकार घडुन येत नाही असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ४२(८४%) इतकी आढळुन आली.

२) वरील तक्त्यात नवरात्री उत्सवात असभ्य वर्तनाचे प्रकार घडुन येत असतील तर मंडळ त्यावर नियंत्रण घालते असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २९(५८%) इतकी आढळुन आली. तर मंडळ त्यावर नियंत्रण घालत नाही असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १(२) इतकी आढळुन आली.

३) नवरात्री उत्सवात असभ्य वर्तनाचे प्रकार घडुन येतात आणि मंडळ त्यावर नियंत्रण घालते असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १(१००%) आढळली.

४) नवरात्री उत्सवात असभ्य वर्तनाचे प्रकार घडुन येत नाहीत आणि मंडळ त्यावर नियंत्रण घालते असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २८(६३.५%) आढळली.

५) नवरात्री उत्सवात असभ्य वर्तनाचे प्रकार घडुन येतात आणि मंडळ त्यावर नियंत्रण घालत नाही असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ०(०%) आढळली.

६) नवरात्री उत्सवात असभ्य वर्तनाचे प्रकार घडुन येत नाहीत आणि मंडळ त्यावर नियंत्रण घालत नाही असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १(२.६%) आढळली.

या तक्त्याच्या विश्लेषणावरुन असे दिसुन येते की संशोधिकेला उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तरात तफावत आहे जेव्हा नवरात्री उत्सवात असभ्य वर्तनाचे प्रकार घडुन येतात या प्रश्नाचे उत्तर ८४ उत्तरदाते

नाही असे देतात, तेच उत्तरदाते आमचे नवरात्री ऊत्सव मंडळ असभ्य वर्तनाचे प्रकारांवर नियंत्रण घालते असे ऊत्तर ५८ उत्तरदाते देतात.

यावरुन कुठली तरी एक माहिती उत्तरदाता खोटी देत आहे असे दिसुन येते. नवरात्री उत्सवात असभ्य वर्तनाचे प्रकार घडुन येतात हे खरे असेल, पण मंडळाचे नाव खराब होऊ नये म्हणुन खोटी माहिती भरण्यात येत असेल असे संशोधिकेला वाटते.

आणि हे खरेच आहे कारण अनेकदा वृत्तपत्रांमधे अशा उत्सवांच्या काळात छेडछाडीच्या आणि बलात्काराच्या बातम्या येतच असतात.

या उत्सवात हवसे, नवसे आणि गवसे लोक भाग घेत असतात त्यामुळे असे प्रकार या उत्सवात होणे स्वाभाविक आहे, आणि मुळात या उत्सवाचा मुळ ऊद्देश म्हणजेच परंपरेचे जतन करणे हा आज शोधुनही सापडत नाही. कित्येक तरुण मुले मुली या उत्सवात मजा करण्यासाठी सहभागी होत असतात, आणि यातुनच असे प्रकार घडुन येतात असे संशोधिकेला अभ्यासात आढळले.



4 TIMES CITY

# Have FUN, will DANCE

Sanjay Hadkar

**Mumbai:** Despite fears that Mumbai could be the next target of terror and the penumbra of an economic gloom, footfalls at dandiya grounds are expected to touch a new high this year.

Already about 450 dandiya organisers in the suburbs have applied for permissions to the fire brigade and police. In the island city the number is half that, about 200, but this is not new and is explained by the old reasons of lack of open grounds and a limited Gujarati population as compared to suburbs, said officials. Sion, Chembur, Borivli, Dahisar, Malad and Ghatkopar have the highest density of Gujaratis, the community at the forefront of the festival.

Officials pointed out that last year a total of 400 shows were organised both in city and suburbs, which indicates a 40 per cent rise in the number of applications this year. This jump, said officials, is because Navratri is seen as a moneyed festival and an increasing flock of organisers wants their slice of the pie. "Organising a show has become very lucrative and these event managers are making mega bucks by paying a pittance to authorities," said chief fire officer A V Sawant. The daily fee is Rs 60,000 per day for a big pandal (1,000 sq mt). Safety-conscious organisers can rent a fire engine for which they have to pay an additional fee of Rs 3,000 per hour—but barely a handful of shows apply for this.

**NO PLAYING WITH SAFETY**

- Tents cannot be completely closed; there should be enough exits
- No temporary wiring
- Good lighting
- Electricians on standby
- No smoking or cooking allowed
- Basic fire-fighting equipment should be in place
- No firecrackers allowed

Although revellers will be happy to have more shows to choose from, for officials it means an increased burden. Apart from crowd control and evacuation in case of a stampede or fire there is the edginess resulting from the terror strikes, and they fear that in this kind of mistrustful atmosphere, rumour can be dangerous.

Although safety rules at most public events—and at malls and multiplexes—are observed more in the breach, this year there will be a sharp accent on security. Sawant said there is a distinct sense of unease among organisers and people at large.

"We have given basic training in crowd management and evacuation to some of the bigger show organisers. They were told about the importance of public announcements in case of a bomb hoax or a rumour," he said.

It is common knowledge that many housing societies and buildings hold a garba raas on their terrace without official permission or basic precautions, which could prove fatal in an emergency. "They don't take an NoC from us, but if anything happens they expect firemen to come rushing to their rescue. They should understand that evacuation from a terrace takes hours," said a fire officer.

Some of the biggest shows in the city are Dandiya queen Falguni Pathak's Sankalp, Preeti-Pinky's show in Ghatkopar, Country Club Dandiya Raas in Kandivli and Viju Shah's show in Ghatkopar. TNN

# नवरात्रीउत्सव मद्यधुंद व्यक्ती आणि बिभत्स नृत्यं करणाऱ्यांवर केली जाणारी कारवाई दाखविणारा तक्ता क्र.–९

| बिभत्स नृत्य करणा–यांवर कारवाई केली जाते \ मद्यधुंदांना प्रवेश दिला जातो | होय | नाही | पर्याय दिलेला नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| होय | १ | २५ | – | २६ |
| | ३.८५% / ६.२५% | ९६.१५% / ८६.२१% | – | |
| नाही | १५ | ३ | – | १८ |
| | ८३.३३% / ९३.७५% | १६.६७% / १०.३४% | – | |
| पर्याय दिलेला नाही | – | १ | ५ | ६ |
| | – | १६.६७% / ३.४४% | ८३.३३% / १००% | |
| एकूण | १६ | २९ | ५ | ५० |

नवरात्रीउत्सव मद्यधुंद व्यक्ती आणि बिभत्स नृत्यं करत असेल तर मंडळातील लोक कार्यकर्ते त्यावर कारवाई करतात का? त्याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्नं संशोधिकेने केलेला आहे.

१) वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, नवरात्री उत्सवात मद्यधुंद असणाऱ्या लोकांना नृत्यं करण्यास प्रवेश दिला जातो असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १६(३२%) आढळली. आणि नवरात्री उत्सवात मद्यधुंद असणाऱ्या लोकांना नृत्यं करण्यास प्रवेश दिला जात नाही असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २९(५८%) आढळली. तर पर्याय न निवडणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ५(१०%) आढळली.

२) नवरात्री उत्सवात बिभत्स नृत्यं करणाऱ्यांवर कारवाई केली जाते यास होय असा पर्याय निवडणारे २६(५२%) उत्तरदाते आढळले. तर नवरात्री उत्सवात बिभत्स नृत्यं करणाऱ्यांवर कारवाई केली जात नाही असा पर्याय निवडणारे १८(३६%) उत्तरदाते आढळले. आणि पर्याय न निवडणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ६(१२%) इतकी आढळुन आली.

३) यातही नवरात्री उत्सवात मद्यधुंद असणाऱ्या लोकांना नृत्यं करण्यास प्रवेश दिला जातो आणि बिभत्स नृत्यं करणाऱ्यांवर कारवाई केली जाते असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १(६.२५%) आढळली.

४) तर नवरात्री उत्सवात मद्यधुंद असणाऱ्या लोकांना नृत्यं करण्यास प्रवेश दिला जात नाही आणि बिभत्स नृत्यं करणाऱ्यांवर कारवाई केली जात नाही असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ३(१०.३४%) इतकी आढळुन आली.

५) वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, यातही नवरात्री उत्सवात मद्यधुंद असणाऱ्या लोकांना नृत्यं करण्यास प्रवेश दिला जातो आणि बिभत्स नृत्यं करणाऱ्यांवर कारवाई केली जात नाही असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १५(९३.७५%) इतकी आढळुन आली.

६) वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, नवरात्री उत्सवात मद्यधुंद असणाऱ्या लोकांना नृत्यं करण्यास प्रवेश दिला जात नाही आणि

बिभत्स नृत्यं करणाऱ्यांवर कारवाई केली जाते असे २५(८६.२१%) उत्तरदाते आढळले.

७)या तक्त्यातील माहितीच्या अभ्यासावरुन असे दिसुन येते की, नवरात्री उत्सवात मद्यधुंद असणाऱ्या लोकांना नृत्यं करण्यास प्रवेश दिला जात नाही तसेच एखादी व्यक्ती बिभत्सं हावभाव करुन नृत्यं करत असेल तर मंडळातील कार्यकर्ते त्यावर कारवाई करतात असे देणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २५(८६.२१%) ही जास्तं दिसुन आली.

यावरुन असे दिसुन येते की, मंडळातील कार्यकर्ते नृत्यात सामील झालेले लोक बिभत्सं हावभाव करुन नृत्यं करत नाहीना या बाबत दक्ष राहुन कारवाई करतात. पण तरिही कोणी बिभत्सं हावभाव करुन नृत्यं करत असेल तर त्याला अडवण्यात येते, समुहातुन बाजुला नेऊन समजावण्यात येते, असे नवरात्री उत्सव मंडळातील कार्यकर्त्यांनी संशोधिकेला सांगीतले. पण असे खुप कमी वेळ घडते असे संशोधिकेला दिसुन आले.

एकुणच नवरात्री उत्सवात दारु पिणे, बिभत्सं नृत्यं करणे यासारख्या गोष्टी घडतच असतात. नवरात्री उत्सवाचा मुळ ऊद्देश (देविची आराधना) हा बाजुलाच राहीला असुन हा उत्सव चंगळवाद आणि भोगवादाकडे झुकत आहे.

लोकांना दारु पिऊन बेधुंद पणे नृत्यं करण्याचे निमीत्तं हवे असते आणि ते नवरात्री ऊत्सवातुन मिळते.

तसेच आजच्या महागाईच्या काळात प्रत्येक व्यक्तीला पब अथवा डिस्को मधे जाऊन नाचणे परवडत नाही आणि त्यासाठी घरातील वडिलधाऱ्यांची पण परवानगी मिळु शकत नाही, मग ही हौस या उत्सवा

मार्फत पुरवली जाते. या काळात वडीलधारी मंडळी अडवु पण शकत नाहीत, कारण प्रश्नं हा परंपरेचा संस्कृतीचा असतो.

आजच्या काळात लोकांना फक्तं निमीत्तं हवे असते की, कर्कश्यं आवाजात म्युझीक लावुन त्यावर बेधुंदपणे नाचणे ही आज संस्कृती मानली जात आहे. जी खरे तर विकृती कडे झुकत चालली आहे असे संशोधिकेला वाटते.



ांडियाने
ुमली
अवघी
ुंबापुरी


दि. ५ (प्रतिनिधी) - नवरात्रोत्सवानिमित्त शहरात दांडियाची

नवरात्रोत्सवाची रविवारची सहावी माळ. नवरात्र सुरू झाल्यानंतरचा पहिला रविवार. त्यामुळे मुंबईकरांच्या उत्साहाला उधाण आले नसले तरच नवल. एटीएसकडून आलेले सुरक्षाविषयक एसएमएस असोत की, दशहतवाद्यांच्या धमक्या. सगळ्यांना बाजूला सारून मुंबईकरांनी रविवारी संध्याकाळपासूनच धमाल दांडिया खेळत आपला उत्साह टिपेला नेला. कोठे फाल्गुनी पाठकच्या गीतांचा जोर होता तर कोठे आदेश बांदेकरचा मराठमोळा दांडिया. पण, त्याही पलीकडे अवघ्या मुंबईतभर लहान-मोठे दांडिया गल्ली-बोळात सुरू होते. धिना ना धीन् ताक्च्या तालावर थिरकणारी पावलं जमिनीला लागण्याचे नाव घेत नव्हती. कोणाचे वेश पाहण्यासारखे होते तर कोणाचा नाच. काही ठिकाणी दोन्ही पाहण्यासारखे... अशा वेळी तरुणाईचा उत्साह तर ओसंडून वाहत होता. चिमुकल्या मुली घागरा-चोळीत तर इतक्या नटल्या होत्या की, त्यांच्या आया-आज्यांनी घरी गेल्यावर त्यांच्यावरून मीठ-मोहऱ्याच ओवाळून टाकल्या असतील... ओढणी उडे उडे जाये... असो किंवा तोडलो पेटोरे मोर का बोले... किंवा निंबुडा निंबुडा... एक ताल, एक लय, एक सूर आणि हजारो पावलांची लयबद्ध थिरकन... जणू स्वर्गातील अप्सराच भूतलावर अवतरल्या... जल्लोष, आनंद आणि कौतुक यांनी भारलेली रविवारची रात्र गरबाप्रेमींसाठी सर्वात आनंददायी रात्र ठरली असती, पण अचानक रात्री आलेल्या पावसाने हा सगळा आनंद हिरावून नेला. गोल-गोल फिरणारे घागरे चिंब झाले आणि हिरमुसलेले सारे पावसाला दोष देत आपापल्या घराकडे परत फिरले...





## गोरेगावातील गणेशोत्सवातील सार्वजनिक गणेशमंडळांची स्थापना झालेली वर्षे दाखविणारा आलेख क्र.– १




वरील आलेख हा गोरेगावातील गणेशोत्सवातील सार्वजनिक गणेशमंडळांची स्थापना झालेली वर्षे दाखवतो.

१) या आलेखात गोरेगाव पूर्व या भागातील (५ मंडळे) आणि गोरेगाव पश्चिम भागातील (५ मंडळे) अशी (१० मंडळे) उभ्या अक्षावर घेतली

**असुन आडव्या अक्षावर गोरेगावातील गणेश मंडळांची स्थापना वर्षे आखली आहेत.**

**२) हा आलेख १९८३ आणि १९८५ मधे सर्वात कमी म्हणजे प्रत्येकी (३ मंडळे) गणेशमंडळे गोरेगावात स्थापन झाली आहेत असे दर्शवतो.**

**३) १९६२ आणि १९७७ या वर्षात प्रत्येकी (४ मंडळे) गणेशमंडळे गोरेगावात स्थापन झाली असे दिसुन येते.**

**४) त्या नंतर १९९२ मधे (५ मंडळे) गणेशमंडळे गोरेगावात स्थापन झाली असे दिसुन येते.**

**५) १९८२ आणि १९८४ या दोन वर्षाच्या कालखंडाने प्रत्येकी (७ मंडळे) गणेशमंडळे गोरेगावात स्थापन झाली असे दिसुन येते.**


**६) १९८० मधे सर्वात जास्तं (१७ मंडळे) गणेशमंडळे गोरेगावात स्थापन झाली असे दर्शवतो.**

**जमा केलेल्या माहितीवरुन असे आढळुन येते की, गोरेगावातील गणेशोत्सवातील सार्वजनिक गणेशमंडळांची स्थापना १९६२ पासुन होण्यास सुरुवात झाली.**

**गोरेगावातील गणेशोत्सवातील सार्वजनिक गणेशमंडळांची स्थापना १९८० साली सर्वात जास्तं प्रमाणात झाली.**

**म्हणजेच १९८० साली गोरेगावात सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रमाण खुप वाढले. आणि आताच्या काळात गोरेगावात सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रमाण कमी होत चालले आहे.**

# गोरेगावातील सार्वजनिक नवरात्री उत्सवाची मंडळांची स्थापना झालेली वर्षे दाखविणाराआलेख क्र.– २




वरील स्तंभालेख हा गोरेगावातील सार्वजनिक नवरात्री उत्सवाची मंडळांची स्थापना झालेली वर्षे दाखवतो.

१) या आलेखात गोरेगाव पूर्व या भागातील (५ मंडळे) आणि गोरेगाव पश्चिम भागातील (५ मंडळे) अशी १० मंडळे उभ्या अक्षावर घेतली असुन आडव्या अक्षावर गोरेगावातील सार्वजनिक नवरात्री उत्सवाची मंडळांची स्थापना झालेली वर्षे दाखवतो.

२) हा आलेख १९७८ मधे गोरेगावात सर्वात कमी (१ मंडळ) सार्वजनिक नवरात्री उत्सव मंडळांची स्थापना झालेली दाखवतो.

२) आणि त्या नंतर १९८५ मधे गोरेगावात सर्वात जास्तं (१४ मंडळे) सार्वजनिक नवरात्री उत्सव मंडळांची स्थापना झालेली दाखवतो.

३) १९८८ पासुन पुन्हा सार्वजनिक नवरात्री उत्सव मंडळांची स्थापना कमी म्हणजे (५ मंडळे) झाली.

३) १९९० मधे ही सार्वजनिक नवरात्री उत्सव मंडळांची स्थापना थोड्या प्रमाणात (७ मंडळे) वाढली

४) त्या नंतर १९९३, २००१, २००२ या काळात प्रत्येकी ( ५ मंडळे) एकुण १५ मंडळे स्थापन झालेली आहेत.


५) २००३ या वर्षी (३मंडळे) सार्वजनिक नवरात्री उत्सव मंडळांची स्थापना झाली

जमा केलेल्या माहितीवरुन असे आढळुन येते की गोरेगावात सर्वात कमी सार्वजनिक नवरात्री उत्सवाची मंडळांची स्थापना १९७८ मधे झाली म्हणजेच त्या काळात नवरात्री उत्सव म्हणजेच गरबा याची सुरुवात कमी प्रमाणात झाली होती. अचानक सात वर्षाच्या कालखंडात गोरेगावात हे सार्वजनिक नवरात्री उत्सव मंडळ स्थापना प्रमाण अतिशय वाढले. म्हणजेच हा काळ हा नवरात्री ऊत्सव म्हणजेच गरबा याचा विकासात्मक कालखंड होता.

त्यानंतर मात्र गोरेगावात हे सार्वजनिक नवरात्री उत्सव मंडळ स्थापना प्रमाण थोड्या फार फरकाने कमी जास्तं होत राहीले. पण २००३

मधे गोरेगावात हे सार्वजनिक नवरात्री उत्सव मंडळ स्थापना प्रमाण पुन्हा कमी झाले.

## गोरेगाव ऊपनगरातील सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री ऊत्सव यांच्या मूर्तीतील आकारमान दाखविणारा आलेख क्र.– ३




वरील स्तंभालेख हा गोरेगाव उपनगरातील सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव यांच्या मूर्तीतील आकारमानाची उंची दर्शवीतो.

१) या आलेखात उभ्या अक्षावर सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव यांच्या मंडळातील उत्तरदात्यांची संख्या दर्शवतो, तर आडवा अक्ष

सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव मंडळ यांच्या मूर्तीतील आकारमानाची उंची दर्शवीतो.

२) वरील आलेखात निळे स्तंभ हे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांच्या मूर्तीतील आकारमानाची उंची दर्शवीतात. तर लाल रंगाचे स्तंभ हे सार्वजनिक नवरात्री उत्सव मंडळ यांच्या मूर्तीतील आकारमानाची उंची दर्शवीतात.

३) या आलेखात गोरेगाव उपनगरातील सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव मंडळ यांच्या मूर्तीतील आकारमानाची तुलना केली असता सर्वात जास्तं उंच मूर्ती या नवरात्री उत्सव मंडळातील देवीच्या असलेल्या दिसुन येतात. या ऊंच मूर्ती असणाऱ्या देवीची मंडळातील उत्तरदात्यांची संख्या ही गोरेगावात ४५ भरली.

२) या आलेखात गोरेगाव उपनगरातील १८ उत्तरदात्यांनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील गणेशमूर्तीचे आकारमान हे सर्वात जास्तं ऊंची आहे असे उत्तर दिले .

३) ६ उत्तरदात्यांनी त्यांच्या मंडळात सर्वात कमी ऊंचीची गणेश मूर्ती आहे असे ऊत्तर दिले.

४) ५ उत्तरदात्यांनी त्यांच्या नवरात्री उत्सव मंडळात देवीची मूर्ती नसते असे उत्तर दिले.

५) १३ उत्तरदात्यांनी गणेशमंडळात गणेशमूर्तीचा आकार हा सतत बदलत असतो असे उत्तर दिले.

६) १३ उत्तरदात्यांनी गणेशमंडळात गणेशमूर्तीचा आकार हा कायम ठरवलेला असतो असे उत्तर दिले.

यावरुन असे दिसुन येते की, गोरेगाव उपनगरात नवरात्री उत्सवात देवीची मूर्तीचे आकारमान उंच घेणाऱ्या नवरात्री उत्सव मंडळांचे प्रमाण हे सर्वात जास्तं आहे. आणि एका नवरात्री उत्सव मंडळात देवीची मूर्ती नसते त्या ऐवजी त्या मंडळात गर्भदीपाचे पुजन केले जाते. आणि गोरेगाव उपनगरात गणेशोत्सवात गणपतीची मूर्तीचे आकारमान उंच असण्याचे प्रमाण हे आज सर्वात जास्त आहे.

याचे प्रमुख कारण सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव मंडळात वाढणारा पैशाचा ओघ आहे हेच दिसुन येते. तसेच ज्या मंडळातील मूर्ती मोठी त्या मंडळाची जास्तं चर्चा आज होते हे पण एक कारण या उंच मूर्तीचे प्रमाण वाढण्या मागे आहे.

आज हे सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव मंडळातील लोक प्रदुषणाचा विचार न करता फक्तं दिखावेगिरीला महत्व देतात हे पण या आलेखावरुन स्पष्टं होते.

तयारी गणेशोत्सवाची




गणेशोत्सवासाठी आकर्षक गणेशमूर्तींना रंगविण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.



धारावीमध्ये घटस्थापनेनिमित्त कलाकुसर केलेले घट तयार करण्यात मग्न असलेली ही महिला. (छाया-प्रदीप कोचरेकर)

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील वर्षाला जमा होणाऱ्या वर्गणीची आकडेवारी दाखविणारा आलेख क्र.–४




वरील वृत्तालेख सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील वर्षाला जमा होणाऱ्या वर्गणीची आकडेवारी दर्शवतो.

१) गोरेगावातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील जमा होणारी आजच्या काळात वर्गणीची रक्कम ५०हजार रु. ते १ लाख रु. च्या

**आसपास १५.३० आहे. तर १० हजार रु. ते ४९ हजार रु. च्या आसपास १०. २० आहे.**


**३) गोरेगावातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील जमा होणारी आजच्या काळात वर्गणीची रक्कम २५ हजार १ रु. च्या पुढे ९.१८ आहे.**

**४) गोरेगावातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील जमा होणारी आजच्या काळात वर्गणीची रक्कम २लाख १रु. ते २.५लाख रु. च्या आसपास ६.१२ आहे. आणि १लाख१ ते २ लाख रु.च्या आसपास ४.८ आहे .**

**या माहितीवरुन असे दिसुन येते की, गणेशोत्सवातील वर्गणीची रक्कम ही लाखांच्या घरात गेली आहे. प्रत्येक मंडळाने जरी अधिकृत माहिती दिलेली नसली तरी, हि रक्कम खऱ्या जमा होणाऱ्या रकमेच्या किती तरी कमी असण्याची शक्यंता आहे.**

**एकुण काय तर आजचा सार्वजनिक गणेशोत्सव हा पैसा, त्या बरोबर येणाऱ्या चंगळवादी प्रवृत्तीला चालना देण्याचे साधन झाले आहे.**

## गोरेगाव उपनगरातील गणेशमंडळांत आजच्या काळात घेतले जाणारे कार्यक्रम दाखविणारा आलेख क्र.–५




**वरील वृत्तालेख हा गोरेगाव उपनगरातील गणेशमंडळांत आजच्या काळात घेतले जाणारे कार्यक्रम यांचे स्पष्टीकरण करतो.**

**१) वरील आलेखावरुन हे स्पष्टं होते की, आजच्या काळात साजऱ्या होणाऱ्या गोरेगाव उपनगरातील गणेशमंडळांतील कार्यक्रमात सर्वात जास्तं ३८ उत्तरदात्यांनी प्राधान्यं हे सांस्कृतीक कार्यक्रमास दिले आहे.**

२) २४ उत्तरदात्यांनी आजच्या काळात साजऱ्या होणाऱ्या गोरेगाव उपनगरातील गणेशमंडळांतील कार्यक्रमात संगीत स्पर्धेला महत्व दिल्याचे आढळुन येते.

३) २१ उत्तरदात्यांनी आजच्या काळात साजऱ्या होणाऱ्या गोरेगाव उपनगरातील गणेशमंडळांतील कार्यक्रमात महिला आणि मुलांसाठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धारुपी कार्यक्रमास महत्व दिल्याचे आढळुन येते.

४) १८ उत्तरदात्यांनी आजच्या काळात साजऱ्या होणाऱ्या गोरेगाव उपनगरातील गणेशमंडळांतील कार्यक्रमात समाज प्रबोधनास महत्व दिल्याचे आढळुन येते. त्या खालोखाल १२ उत्तरदात्यांनी आजच्या काळात साजऱ्या होणाऱ्या गोरेगाव उपनगरातील गणेशमंडळांतील कार्यक्रमात रक्तदानास महत्व दिल्याचे आढळुन येते.

५) सर्वात कमी ४ उत्तरदाते व्याख्याने घेतली जातात असे उत्तर देतात.


यावरुन असे आढळुन येते की, आजच्या काळात साजऱ्या होणाऱ्या गोरेगाव उपनगरातील गणेशमंडळांतील कार्यक्रमात सर्वात जास्तं मनोरंजनाचे कार्यक्रम घेतले जातात, त्या नंतर समाज प्रबोधनास महत्व दिले जाते, आणि त्यानंतर सामाजिक कार्यास महत्व दिले जाते.

आजच्या काळात साजऱ्या होणाऱ्या गोरेगाव उपनगरातील गणेशमंडळांतील कार्यक्रमात व्याख्याने, तिही समाजप्रबोधन करणारी, देशभक्ती जागवणारी सर्वात शेवटी म्हणजे नगण्यं उत्तरदाते या गोष्टीला महत्व देतात.

एकुण काय तर हा गणेशोत्सव टिळकांनी ज्या कारणासाठी सार्वजनिक केला (स्वदेशी, स्वराज्य, बहिःष्कार, राष्ट्रीय शिक्षण यांचा प्रसार करणे)

तो मुळ उद्देश हा संपला जाऊन आजच्या काळात गणेशोत्सव फक्तं भव्यंदिव्यं स्वरुप, स्पर्धात्मकता, यासाठी साजरा केला जात आहे .

## गोरेगाव उपनगरातील नवरात्री उत्सवातील साजऱ्या होणाऱ्या कार्यक्रमावरील खर्चाचे प्रमाण दाखविणारा आलेख क्र.– ६




वरील वृत्तालेख हा गोरेगाव उपनगरातील नवरात्री उत्सवातील साजऱ्या होणाऱ्या कार्यक्रमावरील खर्चाचे प्रमाण दर्शवतो.

१) वरिल आलेखावरुन असे दिसुन येते की, गोरेगाव उपनगरातील नवरात्री उत्सवातील साजऱ्या होणाऱ्या कार्यक्रमावरील सर्वात जास्तं ३५% खर्च हा विद्युत रोषणाई वर केला जातो असे

२) त्या नंतर गोरेगाव उपनगरातील नवरात्री उत्सवातील साजऱ्या होणाऱ्या कार्यक्रमावरील १७% खर्च हा डि.जे. म्हणजेच म्युझीक वरती केला जातो असे .

३) १८% खर्च हा मूर्तीवर गोरेगाव उपनगरातील नवरात्री उत्सव मंडळे करतांना आढळतात.

४) नंतर  गोरेगाव उपनगरातील नवरात्री उत्सवातील साजऱ्या होणाऱ्या कार्यक्रमात पाहुण्यांवर खर्च केला जात नाही.

यावरुन असे दिसुन येते की, नवरात्री उत्सव मंडळात सर्वात जास्तं खर्च हा विद्युतरोषणाईवर केला जातो. त्यानंतर नवरात्री उत्सव मंडळात सर्वात जास्त खर्च हा डि.जे. वरती केला जातो. यावरुन असे आढळुन येते की आज नवरात्री उत्सवात फक्तं दिखावेगिरीलाच महत्व आले आहे.


CITY MUMBAI MIRROR | MONDAY, SEPTEMBER 29, 2008 3

**Dandiya mandal insures its players, sets for Rs 2.5 crore**

As terror threats loom over the city, organisers have put up CCTVs, metal detectors and additional security measures during Navratri

Sankalp, the city's leading dandiya organisers known for roping in dandiya queen Falguni Pathak (right) every year, has installed 20 CCTV cameras and metal detectors at all the entrances to the mandal

# निरिक्षणे आणि निष्कर्ष

# (OBSERVATION & FINDINGS)

## प्रकरण ५ वे.

# निरिक्षणे आणि निष्कर्ष
# (OBSERVATION & FINDINGS)

तथ्यं विश्लेषण आणि अन्वयार्था वरुन संशोधिकेला असे निदर्शनास आले आहे की गोरेगावातील सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सवाचे स्वरुप बदलत जात आहे. आणि त्याबरोबर गोरेगाव ऊपनगरातील समाजाची विचारधारा पण या उत्सवा प्रती बदलत जात आहे.

## गोरेगावातील सार्वजनिक गणेशोत्सवः–

गोरेगावातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळात सहभागी होणारे २१ ते ३० वयोगटातील तरुणांची संख्या ही सर्वात जास्त आहे आणि नंतर ती वयोगटाप्रमाणे कमी कमी होत जाते.

गणेश मंडळात सहभागी होणाऱ्या उत्तरदात्यांमधे १२ वी पास आणि त्यापेक्षा कमी शिकलेले उत्तरदाते कार्यकर्ते म्हणुन सहभागी होत असतात. एकुण असे आढळते की गणेशोत्सव पार पाडणारा मोठा वर्ग जो आहे, तो तरुण आणि कमी शिक्षित आहे. की जो बेकार आहे.

गोरेगावातील गणेशोत्सवातील सार्वजनिक गणेशमंडळांची स्थापना १९६२ पासुन होण्यास सुरुवात झाली. गोरेगावातील गणेशोत्सवातील सार्वजनिक गणेशमंडळांची स्थापना १९८० साली सर्वात जास्तं प्रमाणात झाली. म्हणजेच १९८० साली गोरेगावात सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रमाण

खुप वाढले. आणि आताच्या काळात गोरेगावात सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रमाण कमी होत चालले आहे.

गणेशमंडळाकडे जमा होणारी वर्गणीचा वापर सर्वात जास्तं सजावटीवर, त्यानंतर मिरवणुकीवर, आणि सर्वात शेवटी सांस्कृतिक कार्यक्रमावर खर्च केला जातो. यात एक बाब महत्वाची आहे की, सर्वात जास्तं सजावटीवर जमा होणाऱ्या रकमेचा भाग खर्च होतो. सजावटीच्या खर्चात मग रोषणाई, मूर्तीच्या आजुबाजुची सजावट, गणेशमूर्तिच्या सभोवतालचा परीसर, आणि गणेशमूर्ति सभोवताचा मंडप इ. गोष्टी समाविष्टं होतात.

एकुणच आजच्या गणेशोत्सवात दिखावेगिरीला जास्तं महत्व आले आहे. टिळकांच्या काळात गणेशोत्सव हा देशभक्तीपर व्याख्याने, स्थानिक कलाकारांच्या कलेला प्राधान्य देण्यासाठी आणी अशा अनेक गोष्टींचा प्रसार करण्यासाठी होत असे पण आज या गणेशोत्सवाचा मुळ गाभाच हरवला आहे. नुसती सजावट आणि दिखावेगिरिला महत्व प्राप्तं झाले आहे.

सर्व लोकांकडुन जमवलेल्या वर्गणीचा विनीयोग हा एखाद्या सामाजीक कार्यासाठी न होता रोषणाई आणी मिरवणुक अशा पैशाची नासाडी करणाऱ्या कार्यक्रमात खर्च केला जातो. या पैशात एखादया सामाजिक कार्यास तडीस नेता येऊ शकते. एखाद्या गरीब मुलाचे शिक्षण होऊ शकते, अशा अनेक गोष्टी या पैशातुन होऊ शकतात. पण आज गणेशोत्सव केवळ दिखावेगिरीसाठी साजरा केला जात आहे हे आढळले.

आजच्या काळात साजऱ्या होणाऱ्या गोरेगाव उपनगरातील गणेशमंडळांतील कार्यक्रमात व्याख्याने, तिही समाजप्रबोधन करणारी, देशभक्ती जागवणारी सर्वात शेवटी म्हणजे नगण्यं उत्तरदाते या गोष्टीला महत्व देतात.

हा गणेशोत्सव लोकमान्यं टिळकांनी ज्या कारणासाठी सार्वजनिक केला (स्वदेशी, स्वराज्य, बहिःष्कार, राष्ट्रीय शिक्षण यांचा प्रसार करणे) तो मुळ उद्देश हा संपला जाऊन आजच्या काळात गणेशोत्सव फक्तं भव्यंदिव्यं स्वरुप, स्पर्धात्मकता, यासाठी साजरा केला जात आहे .

गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तिचा आकार मोठा असतो आणि दरवर्षी गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्ति प्लास्टर ऑफ पॅरिस पासुच बनवलेल्या आणतात. दरवर्षी गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्ति प्लास्टर ऑफ पॅरिस पासुच बनवलेल्या असल्या मुळे जल आणि मृदा प्रदुषणात वाढ होते. यावरुन असे दिसुन येते की, गणेशोत्सवात आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तिंचा आकार मोठा असल्याने त्या प्लास्टर ऑफ पॅरिस पासुच बनवलेल्या घ्याव्या लागतात कारण शाडु मातीच्या मूर्ति या कमकुवत असल्याने जास्तं मोठ्या असत नाहीत.

हे प्लास्टर ऑफ पॅरीस पाण्यात लवकर विरघळत नाही त्यामुळे गणेशोत्सव विसर्जनाच्या दुसऱ्या दिवशी अनेक गणेशमूर्ति पाण्यात हात पाय तुटलेल्या अवस्थेत तरंगतांना दिसतात. तसेच प्लास्टर ऑफ पॅरीस आणि त्यावर मूर्तीला दिलेले रंग हे विषारी असतात जे विसर्जनाचा आजुबाजुचा परीसर दुषीत करतात, मासे इ. जलचर यामुळे मरतात. या कारणांचा विचार न करता गणेशमूर्ती प्लास्टर ऑफ पॅरीसच्याच बनवल्या जातात आणि दहा दिवसांच्या सोहळ्यानंतर अशा हजारो मूर्ती पाण्यात विसर्जीत केल्या जातात. असे संशोधिकेला आढळले.

तसेच आजकाल विविध कंपन्या आणि राजकीय पुढारी त्यांच्या जाहीरातींचे बॅनर लावण्यासाठी गणेशमंडळाला लाखो रुपये दान करतात. मग हा पैसा गणेशमूर्तिचा आकार मोठा घेण्यात खर्च केला जातो असे संशोधिकेला आढळले.

गणेशोत्सवाच्या काळात स्पीकर्सचा वापर असणारी ध्वनीयंत्रणा अतीशय मोठा आवाज असणारी असते. हे स्पीकर्स ४ फुट ऊंचीचे आणि प्रचंड आवाज फेकण्याची क्षमता असणारे असतात.

मानवाची आवाज सहन करण्याची शक्ती ही ५५ डेसीबल असते, आणि त्यापुढे ती गेल्यास कायमचा बहीरे पणा येऊ शकतो. आणी ही स्पीकर्सचा वापर असणारी ध्वनीयंत्रणा त्यापेक्षा जास्तं आवाज असणारी असते. त्यामुळे कानांना बहीरेपणा, हृदयाच्या ठोक्याची गती वाढणे, चिडचीडेपणा असे अनेक विकार होऊ शकतात. या स्पीकर्सचा वापर असणाऱ्या ध्वनीयंत्रणेमुळे गणेशमंडळाच्या आजुबाजुच्या घराच्या भिंती हादरतात, एकमेकांचे बोलणे ऐकु येत नाही अशा अनेक अडचणी येतात. यात लोकांचा आणि ध्वनीप्रदुषणाचा पण विचार केला जात नाही.

गणेशोत्सव मंडळांना फक्तं स्पीकर्सचा वापर ध्वनीयंत्रणा म्हणुन का करतात असे संशोधिकेने विचारल्यावर डि.जे. वर शासनाने बंदी घातली आहे हे ऊत्तर देण्यात आले.

लोकांचे हे अचाट आवाजाचे स्पीकर्स ध्वनीयंत्रणा म्हणुन वापरुन पण समाधान होत नाही त्यांची ईच्छा अजुन शक्तीशाली डि.जे. ध्वनीयंत्रणा म्हणुन वापरण्याची आढळली.

संशोधिकेच्या प्रत्यक्षदर्शी पहाणीवरुन असे दिसुन आले की, या गणेशोत्सवात सकाळी ६ ते ९ आणि संध्याकाळी ७ ते ८ वाजेपर्यंतच स्तोत्र आणी संगीत म्हणजे काही भक्तीगीतं लावली जातात. बाकी दिवसभर आणि रात्री ११ वाजे पर्यंत कर्कश्यं आवाजात डी.जे., स्पीकर्स लावुन आजुबाजुच्या वृध्दं लोकांचा, विद्यार्थ्यांचा, आजारी व्यक्तींचा विचार न करता केवळ मजा म्हणुन चित्रपटातील गाणी, अश्लील गाणी, रिमीक्स गाणी मोठ्या आवाजात लावली जातात. यात लोकांचा आणि ध्वनीप्रदुषणाचा पण विचार केला जात नाही. आणि यास विरोध केला

असता १० दिवस तर गणपती आहेत असे निरर्थक उत्तर दिले जाते. असे संशोधिकेला आढळले.

गणेशोत्सवातील मुर्तिच्या विसर्जनाच्या मिरवणुकीत नाचण्या साठी कर्कश्यं आवाजात डी.जे. लावुन आजुबाजुच्या वृध्दं लोकांचा, विद्यार्थ्यांचा, आजारी व्यक्तींचा आणि ध्वनीप्रदुषणाचा पण विचार न करता केवळ मजा करण्यासाठी या लोकांना गणेशोत्सवातील मुर्तिच्या विसर्जनाच्या, मिरवणुकीच्या निमीत्ताने बेधुंद होऊन दारु पिऊन नाचण्यासाठी ६ तास हवे आहेत. कारण आपल्या देशात ही गोष्टं देवासाठी आहे म्हणल्यावर त्यावर काहीच प्रतिउत्तर द्यायचे नाही ही संकल्पना रुढ आहे. एकीकडे गणपतीला निरोप द्यायचा अणि दुसरीकडे भान विसरुन लोकांनी का नाचायचे हा संशोधिकेला लहानपणीपासुन पडलेला प्रश्नं आहे.

तीच गोष्टं गणेशोत्सवातील मुर्तिच्या विसर्जनाच्या मिरवणुकीच्या निमीत्ताने गुलाल उधळण्याची गुलाबी रंग आनंदाचे प्रतीक आहे म्हणुन या उत्सवात गुलाल लावला जातो पण काही किलो रासायनीक गुलाल ऊधळणे कितपत योग्यं आहे हा पण एक प्रश्नंच आहे.

या मिरवणुकीत पुन्हा रस्त्यावर नाचुन ६ तास ट्राफीक जाम करायचा, पोलीस यंत्रणेला कामाला जुंपायचं, आणि या गोष्टी वर्षातुन एकदा तर गणेशोत्सव येतो, आपली हीच संस्कृती आहे असं म्हणत दरवर्षी तेच करायला लोकांना आवडतं. असं संशोधिकेला आढळुन आलं.

तरीपण गोरेगावात सामाजिक आणि पर्यावरणमित्र विचार करुन कृत्रीम तलाव बांधल्याने काही प्रमाणात का होईना जलप्रदुषण कमी करण्याचा प्रयत्नं होत आहे.

गोरेगाव पूर्व भागात पांडुरंगवाडी तेथे हा तलाव बांधण्यात आला आहे. या तलावा मुळे आरे कॉलनी, आरे रस्ता, पांडुरंगवाडी, गोगटेवाडी,

जयप्रकाशनगर अशा अनेक गोरेगावातील गणेशभक्तांची सोय या तलावा मुळे झाली आहे.  पण मूर्ती दान करण्याची संकल्पना अजुनही पारंपारीक विचारांचे लोक मान्यं करत नाहीत.

गणेशोत्सवातील वर्गणीची रक्कम ही लाखांच्या घरात गेली आहे. प्रत्येक मंडळाने जरी अधिकृत माहिती दिलेली नसली तरी, हि रक्कम खऱ्या जमा होणाऱ्या रकमेच्या किती तरी कमी असण्याची शक्यता आहे.

## मुंबईतील नोंदणीकृत मंडळे

वर्ष : २००५ — नोंदणीकृत मंडळे : ८ हजार ८०५.
वर्ष : २००६ —  नोंदणीकृत मंडळे : ८ हजार ८२८.
वर्ष : २००७ — नोंदणीकृत मंडळे :१० हजार ४५५.
वर्ष : २००८ — नोंदणीकृत मंडळे :११  हजार  २०० .

## आणि त्यांची आर्थिक उलाढालः–

१ ते  ५   लाख रुपये  – ४ हजार २३० मंडळे.
१ ते  १०  लाख रुपये – २ हजार ४५० मंडळे.
१० ते २० लाख रुपये –  ३ हजार  १५० मंडळे.
२० ते ५० लाख रुपये –  ५७० मंडळे.
५० ते १   कोटी रुपये –  १४७ मंडळे.
१ ते ६     कोटी रुपये –  १८ मंडळे.
(संदर्भ - महाराष्ट्र टाईम्सः७/९/०८ संवाद पुरवणी.)

एकुणच काय तर आजचा सार्वजनिक गणेशोत्सव हा पैसा, त्या बरोबर येणाऱ्या चंगळवादी प्रवृत्तीला चालना देण्याचे साधन झाले आहे.

## गोरेगावातील नवरात्री उत्सवः–

**गोरेगावात सर्वात कमी सार्वजनिक नवरात्री उत्सवाची मंडळांची स्थापना १९७८ मधे झाली. म्हणजेच त्या काळात नवरात्री उत्सव म्हणजेच गरबा याची सुरुवात कमी प्रमाणात झाली होती.**

**नवरात्रिउत्सवात भोंडला, झिम्मा, फुगडी असे अनेक मराठी नृत्यं प्रकार या नवरात्रिउत्सवाच्या निमीत्ताने मराठी समाजातील स्त्रिया रात्री जमुन खेळत असत.**



भोंडल्याचा फेर

नवरात्रात कोणी कुमारिका म्हणून बोलावलं की लहानपणी छान वाटे. काठाचं परकर-पोलकं किंवा चुण्यांचा घोळदार फ्रॉक, बांगड्या, पैंजण, नेटकं कुंकू लावून आम्ही साऱ्या किलकिलाट करत हजर. नाईककाकू दूध-पाण्याने पाय धुवून, धुतवस्त्रने पुसून त्यावर कुंकवाचं स्वस्तिक काढणार. हळद-कुंकु लावून हातावर आणि गालाला चंदनाची बोटं उठवून त्यावर बुक्याचा काळा ठिपका टेकवणर. बदाम वेलची लावलेलं आटीव दूध असे. मग फळांनी ओटी भरून घसघसशीत नमस्कार. एवढ्या मोठ्या काकू आपल्याला नमस्कार करतात, याचं अप्रूप वाटे.

गणपतीत आरत्यांची मजा तर भोंडला ही नवरात्राची खास बात. ऐलमा पैलमा गणेशदेवा, कृष्ण घालितो लोळण, काल्यांचा वेल, अक्कणमाती चिक्कणमाती, आला माझ्या सासरचा वैद्य अशी स्त्री विश्व उलगडणारी गाणी म्हणायला मजा वाटे. खिरापतीचा रहस्यभेद करणं म्हणजे एखाद्याचा पासवर्ड शोधण्याइतकं कठीण. मालपुवा, मटाराच्या तिखट करंज्या, रताळी-नारळाचं गोड पुरण असे वेगळं पदार्थ मुद्दाम केले जायचे. गोल फिरून चक्करल्यासारखं होई म्हणून कधी बसून तर कधी एक टाळीचा झिम्मा करत फेर धरला जाई.

लग्न झाल्यावर सासरी मुलगेच जास्त होते म्हणून मुलगी झाली तर भोंडला सुरू करू, असं मनी धरलं आणि त्याप्रमाणे भोंडल्याची गाणी सासरीदेखील घुमू लागली. तोरण, रांगोळी, हळदी-कुंकु-अत्तरासाठी चांदीची उपकरणं असा थाट. खास केरळहून आणलेला राजेशाही हत्ती छान रंग-फुलांनी नटवून मध्ये ठेवायचा. आता बिल्डिंगमध्येंही कुमारिकांचा वेल बहरू लागला म्हणून अंगणात एकत्र भोंडला सुरू केला. त्यानिमित्ताने आम्ही नोकरदार शेजारणी एकमेकांना भेटू लागलो. कामं वाटली गेली. मनात गाण्यांची उजळणी झाली. अशा तऱ्हेने संस्कार म्हणून घरातच सुरू केलेला भोंडला सामुदायिक होऊन संस्कृतीच्या पाऊलखुणांशी अगदी सहजपणे सांधला गेला.

अनिल शिंदे

- मंजिरी जमदग्नी

**सात वर्षाच्या कालखंडात गोरेगावात हे सार्वजनिक नवरात्री उत्सव मंडळ स्थापना प्रमाण अतिशय वाढले. म्हणजेच हा काळ हा नवरात्री उत्सव म्हणजेच गरबा याचा विकासात्मक कालखंड होता.त्यानंतर मात्र गोरेगावात हे सार्वजनिक नवरात्री उत्सव मंडळ स्थापना प्रमाण थोड्या फार फरकाने कमी जास्तं होत राहीले. पण २००३ मधे गोरेगावात हे सार्वजनिक नवरात्री उत्सव मंडळ स्थापना प्रमाण पुन्हा कमी झाले.**

खरेतर अश्वीन महिन्यात आणि हिवाळा ऋतुत येणारा हा ऊत्सव देवीची म्हणजे या पृथ्वीची पुजा करण्यासाठी निर्माण केला गेला आहे. देवीला मातेसमान मानण्याची परंपरा या भारत भुमीत आहे. तसंच पृथ्वीला देवीचेच रुप मानण्यात आले आहे कारण तीच लोकांना अन्नं, वस्त्र, निवारा, पाणी देते. आणी त्याच देवीची पुजा करतांना आज लोक त्याच देवी समान मानलेल्या पृथ्वीची पर्यावरणाची हानी करत आहेत.

नवरात्री उत्सवातील देवीच्या मूर्तिची ऊंची ही लहान वा मोठी कशीहि असो, पण मूर्तिचा प्रकार हा पारंपारीकच असला पाहीजे याबाबत लोकांचे मत ठाम आहे. आधुनिक स्वरुपातील देवीच्या मूर्तिला सर्वजण नाकारतात. म्हणजे पोलीसाच्या पोषाखातली अथवा नेता किंवा डॉक्टर या रुपातली जर देवीची मूर्ती तयार केली तरी लोक त्याचा अस्वीकारच करतील याला एक कारण असे आहे की लोकांच्या श्रध्देचा हा प्रश्नं आहे.

सामान्यं मानवी रुपात देवी दिसत असेल तर तिच्यात आणि एखाद्या स्त्रित काय फरक राहीला? कुठल्याही देवांचे रुप लोकांनी कथा आणि पुराणातुन असे तयार केले की ते, अमानवी दिसावे म्हणजे काय तर जर एखादा देव चार हाताचा असुन त्याने विविध शस्त्रे धारण केलेली दिसली की तो लोकांना चमत्कार वाटतो आणि चमत्कारा शिवाय नमस्कार नाही ही म्हण प्रसीध्दंच आहे.

ही परंपरेने चालत आलेली एक अंधश्रध्दाच आहे, असे संशोधिकेला वाटते.

जास्तं लोक नवरात्री उत्सवातील देवीच्या मूर्तिची ऊंची ही मोठी असावी यास प्राधान्यं देतात. पण हे करतांना लोकांना मूर्ति ऊंच असली तर ती प्लास्टर ऑफ पॅरीसची असावी लागते. आणि जर ती प्लास्टर ऑफ पॅरीसची असली तर त्या मागे भूमी प्रदुषण आणि जलप्रदुषण हे पर्यावरण विषयक मुद्दे येतातच. पण याचा लोक विचार करत नाहीत.

**सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव या दोन्ही उत्सवांसाठी**

**या वर्षी २००८ मधे अतिरेकी हल्ला आणि बॉम्ब हल्ल्याच्या भितीने ८१ सिसिटीव्ही कॅमेरे मुंबतील चौपट्यांवर बसवण्यात आलेले आहेत. दांडीया मंडळांनी सुरक्षेसाठी ५० कोटी घातले आहेत. या उत्सवांत विसर्जनाच्या दिवशी महानगरपालीकेचे ३५ हजार कर्मचारी, हजारो पोलीस, शिघ्र कृतीदल, अग्नीशामकदल असे अनेक विभागाती लोक या उत्सवांमुळे वेठीला धरले जातात.**


अनंत चतुर्दशीसाठी पालिकेची जय्यत तयारी

प्रतिनिधी

गेल्या १४ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी असून मुंबई आणि उपनगरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे तसेच गणेशभक्त गणरायाला निरोप देणार आहेत. अनंत चतुर्दशीच्या दिवशी होणाऱ्या गणपती विसर्जनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने जय्यत तयारी केली आहे. पालिका, वरिष्ठ पोलीस अधिकारी विसर्जनस्थळी उपस्थित राहणार आहेत. पालिकेचे ३५ हजार कर्मचारी, हजारो पोलीस, शीघ्र कृतीदल, अग्निशम दल आणि विविध स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते गणेशभक्तांच्या मदतीसाठी विसर्जनस्थळी सज्ज राहणार आहेत. पालिकेच्यावतीने मुंबईत एकूण ८१ ठिकाणी विसर्जनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

गणेश विसर्जनासाठी चौपाट्यांवर ५९ मोटरबोटी सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. यात अग्निशमन दलाच्या १२ बोटींचा समावेश आहे. तसेच गणेशभक्तांच्या मदतीसाठी ३५० जीवरक्षक तैनात करण्यात येणार आहेत. विविध स्वयंसेवी संस्थांचे सुमारे सहा हजार स्वयंसेवक विसर्जनाच्या ठिकाणी उपस्थित असतील. विसर्जनांच्या ठिकाणी ६० प्रथमोपचार केंद्रे, ४९ रुग्णवाहिका, ७७ निर्माल्य कलश ठेवण्यात आले आहेत. तसेच चौपाट्यांवर ३१ निरीक्षण मनोरे उभारण्यात आले आहेत.

गिरगाव, दादर आणि जुहू चौपाटी येथे सर्वाधिक गणपतींचे विसर्जन करण्यात येते. त्यामुळे या ठिकाणी खास व्यवस्था करण्यात आलेली आहे. दादर चौपाटी येथील काशीनाथ धुरू रोड, कीर्ती कॉलेज, केळुस्कर रोड, एम. बी. राऊत रोड, माहीम रेतीबंदर या ठिकाणीही गणेश विसर्जन करण्यात येते. गिरगाव चौपाटी येथे लहान गणपती आणि मोठ्या गणपतीसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी मुख्यमंत्री विलासराव देशमुख, महापौर शुभा राऊळ उपस्थित राहणार आहेत. गिरगाव चौपाटीवर मोठे गणपती विसर्जनासाठी येतात. तसेच दक्षिण मध्य मुंबई आणि दक्षिण मुंबईतील गणपतींचे विसर्जन या ठिकाणी होत असते. त्यामुळे या चौपाटीवर विशेष काळजी घेण्यात येणार असून पालिकेने सर्व तयारी केली आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त माधव सांगळे यांनी दिली. त्यांनी स्वतः दादर आणि गिरगाव चौपाटीवरील तयारीची पाहणी केली. गिरगाव चौपाटीवर विसर्जनासाठी खास रस्ता तयार करण्यात आला आहे. छोट्या गणपतींसाठी वेगळी रांग लावण्यात येणार आहे.

यंदा गणेशमूर्तींची संख्या दोन लाखावर

गेल्या वर्षी दीड, पाच आणि सात दिवसांचे मिळून साधारण एक लाख २९ हजार गणेशमूर्तींचे विसर्जन झाले होते. या वर्षी गणपतींची संख्या वाढली असून आतापर्यंत एक लाख ३५ हजार गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले आहे, अशी माहिती सांगळे यांनी दिली. यावर्षी एकूण गणेशमूर्तींची संख्या साधारण दोन लाखापर्यंत जाईल, अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली.





'हाय अॅलर्ट' असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने मुंबई पोलिस सर्वत्र कसून तपासणी करीत आहेत. सीएसटी रेल्वेस्थानकातून 'एक्स्प्रेस'द्वारे कर्नाटकातील गुलबर्ग्याला नेल्या जात असलेल्या देवीच्या मूर्तीचीही पोलिसांनी तपासणी केली. (छायाचित्र : प्रशांत चव्हाण)

सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव या दोन्ही उत्सवांसाठी भरमसाठ पैसा ऊकळला जातो. आणि तो रोषणाई, भपकेबाजपणा , डी. जे., यावर खर्च केला जातो. यावरुन या उत्सवा मार्फत भपकेबाजपणा फोफावला जातो हेच सिध्दं होते. तरुण पिढी या ऊत्सवाच्या माध्यमातुन फक्तं भोगवादी प्रवृत्तीला उधाण देत असते.

सार्वजनिक गणेशोत्सवात आणि नवरात्री उत्सवात वर्गणी भरणे बंधनकारक आहे असे दिसुन येते, जरी उत्तरदात्यांनी हे संशोधिकेला स्पष्टं केले असले तरी, प्रत्यक्ष मंडळाच्या ठिकाणी तेथील लोकांच्या संवादातुन ही गोष्टं संशोधीकेला आढळुन आली. वर्गणी ११रु. पासुन ५१रु.पर्यंत लोकांच्या ऐपती प्रमाणे का असेना वाढत जाते.

आणि एका महिन्याच्या अंतरात हिच वर्गणी पुन्हा याच भपकेबाज पणासाठी तेच मंडळ घेत असते. सामान्यं लोकं पण ईतर लोकात वेगळे विरुध्दं वागलेले ऊठुन दिसेल, नंतर याच मंडळाच्या कार्यकर्त्यांकडुन समाजात त्रास होईल, या भावनेने मनाविरुध्दं का होईना ५०रु. हातावर टिकवतात. असे लाखो रुपये सार्वजनिक गणेशोत्सवात आणि नवरात्री उत्सवात एका महिन्याच्या आत पाण्यासारखे वहावले जातात.

सार्वजनिक गणेशोत्सवात आणि नवरात्री उत्सवात वर्गणी भरणे बंधनकारक आहे असे दिसुन येते, जरी उत्तरदात्यांनी हे संशोधिकेला स्पष्टं केले असले तरी, प्रत्यक्ष मंडळाच्या ठिकाणी तेथील लोकांच्या संवादातुन ही गोष्टं संशोधीकेला आढळुन आली.

या उत्सवात हवसे, नवसे आणि गवसे लोक भाग घेत असतात त्यामुळे अशा उत्सवांच्या काळात छेडछाडीचे प्रकार या उत्सवात होणे स्वाभाविक आहे, आणि मुळात या उत्सवाचा मुळ उद्देश म्हणजेच परंपरेचे जतन करणे हा आज शोधुनही सापडत नाही. कित्येक तरुण मुले मुली या

उत्सवात मजा करण्यासाठी सहभागी होत असतात, आणि यातुनच असे प्रकार घडुन येतात असे संशोधिकेला अभ्यासात आढळले.

मंडळातील कार्यकर्ते नृत्यात सामील झालेले लोक बिभत्सं हावभाव करुन नृत्यं करत नाहीना या बाबत दक्ष राहुन कारवाई करतात. पण तरिही कोणी बिभत्सं हावभाव करुन नृत्यं करत असेल तर त्याला अडवण्यात येते, समुहातुन बाजुला नेऊन समजावण्यात येते, असे नवरात्री उत्सव मंडळातील कार्यकर्त्यांनी संशोधिकेला सांगीतले. पण असे खुप कमी वेळ घडते असे संशोधिकेला दिसुन आले.

एकुणच नवरात्री उत्सवात दारु पिणे, बिभत्सं नृत्यं करणे यासारख्या गोष्टी घडतच असतात.नवरात्री उत्सवाचा मुळ ऊद्देश (देविची आराधना) हा बाजुलाच राहीला असुन हा उत्सव चंगळवाद आणि भोगवादाकडे झुकत आहे.

लोकांना दारु पिऊन बेधुंद पणे नृत्यं करण्याचे निमीत्तं हवे असते आणि ते नवरात्री उत्सवातुन मिळते.

तसेच आजच्या महागाईच्या काळात प्रत्येक व्यक्तीला पब अथवा डिस्को मधे जाऊन नाचणे परवडत नाही आणि त्यासाठी घरातील वडिलधाऱ्यांची पण परवानगी मिळु शकत नाही, मग ही हौस या ऊत्सवा मार्फत पुरवली जाते. या काळात वडीलधारी मंडळी अडवु पण शकत नाहीत कारण प्रश्नं हा परंपरेचा संस्कृतीचा असतो.

आजच्या काळात लोकांना फक्तं निमीत्तं हवे असते की, कर्कश्यं आवाजात म्युझीक लावुन त्यावर बेधुंद पणे नाचणे आणि आज हिच संस्कृती मानली जात आहे. जी खरे तर विकृती कडे झुकत चालली आहे असे संशोधिकेला वाटते.


**संशोधिकेने स्वतः मुलाखत अनुसुची भरायला नवरात्री ऊत्सव मंडळाला भेटी देतांना काही मंडळांच्या मंडपामागे दारुचे अड्डे पाहीले आहेत.**

**तर गणेशोत्सव विसर्जनाच्या आणि त्या नंतर दोन दिवस गोरगाव पूर्व भागातिल दिंडोशी येथिल मंडळांच्या जागी लॉटरी एक प्रकारचा तिकिटांचा जुगार ध्वनिवर्धकावर खेळतांना पाहीला.**

# निष्कर्ष:–

श्रावण महिना चालु झाला की, सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सवाचे वेध लागतात. मग हे उत्सव साजरे करण्यासाठी रस्त्यावरील रहदारीला अडथळा होतांना देखील मांडव टाकले जातात. ध्वनिवर्धकांच्या मोठमोठ्या भिंती लावुन अगम्यं संगीत ऐकवले जाते. विचित्र हावभावात नृत्यं केले जाते, फटाके फोडुन प्रदुषाणत भर टाकली जाते. आणि या प्रकारेच आपण आज सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव साजरे करतो आहोत.

लोकमान्यं टिळकांनी ज्या कारणासाठी गणेशोत्सव सार्वजनिक केला, तो सद्‌हेतू पुर्णपणे बाजुला सारुन आज जवळ जवळ सर्वच गणेशमंडळे मार्केटींग करत आहेत.



उत्सव कोणाचा?

सार्वजनिक गणेशोत्सवातील बदल हा हळूहळू निर्नायकी अवस्थेकडे झुकू लागला आहे. आज सार्वजनिक गणेशोत्सवाला नेतृत्व राहिलेले नाही. कोणा एकाचा शब्द अंतिम, ही स्थिती राहिलेली नाही. गणेशोत्सवामध्ये कार्यकर्त्यांमध्ये आदर असलेली नावे तर आता एका हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच असतील. सध्याचे कोणतेही राजकीय नेतृत्व हे गणेशोत्सवाचे सार्वत्रिक नेतृत्व करू शकेल असे नाही.

पराग करंदीकर
parag.karandikar@esakal.com

अनेक छोटी मोठी मंडळे वर्गण्यांची रक्कम ३ ते ४ आकड्यात मागु लागली आहेत. वर्गण्यांची ही रक्कम वाढली का तर, देखाव्याचा खर्च वाढला. मग देखावा महत्वाचा की भक्ती? सार्वजनीक गणेशोत्सवांचे प्रयोजन काय आहे? गोरगरीबांना मदत की त्यांची लुटमार? भावीकाचे पुर वाढावेत, कारण ते वाढले तरच दान पेट्या भरतील, गणेशोत्सव मंडळे श्रीमंत होतील, म्हणुन मग देखाव्यावर भर, त्यासाठी लाखो रुपयांचा चुराडा, हे वर्तुळ चालु रहाते.

ज्या कारणासाठी सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सवाची सुरुवात झाली ती कारणे बदलत्या काळानुसार बदलत जात आहेत. हे बदल समाज आणि पर्यावरण अहितकारी आहेत. गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव हा भोगवादाकडे झुकत चालला आहे. सामाजिक एकता आणि पर्यावरणाची पुजा, व्याख्याने देशभक्ती हे गणेशोत्सव व नवरात्रीउत्सवाचे उद्देश आता पुर्णपणे बदलले आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रीउत्सव यांनी समाजाचा पर्यावरण, पैसा, वेळ, पोलिसयंत्रणा यांचा अपव्यय होतो आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव यांच्या वार्षीक उपक्रमावर लक्ष दिले तर एक गोष्ट जाणवते, ती ही की जमा होणाऱ्या वर्गणीतुन कागदोपत्री सार्वजनिक ऊपक्रम राबवले जातात.


आज गोरेगावातील सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव केवळ उत्सव न रहाता एका मोठ्या उलाढालीचे स्वरुप या उत्सवांना आले आहे.

सण व उत्सव हे शरीराचे आणि मनाचे आरोग्यं चांगले ठेवण्यासाठीच असतात, ऋतुंप्रमाणे ते आहारात बदल करायला सांगतात. निसर्गातील प्रत्येक घटकावर ते प्रेम आणि आदराची भावना

व्यक्तं करावयास सांगतात. सण पर्यावरणाचे जतन करावयास सांगतात. माणसा माणसातील प्रेम माया आपुलकी अधीक दृढ करावयास शिकवतात.

तुम्ही आनंदाने जगा आणि इतरांना पण जगु द्या असा संदेश सण व ऊत्सव देतात. या सणांच्या निमित्ताने आप्तेष्टं एकत्र येऊन आनंदाने दिवस घालवतात.या सण व ऊत्सवाच्या निमित्ताने माणसे एकत्र येऊन एक टीम तयार होते, आणि यात स्वयंसेवकाचे काम हे विना वेतन असते कामे करतांना कोणि लहान वा मोठा नसतो, प्रत्येक जण स्वयंसेवक असतो.

तर हे सण व उत्सव हे साजरे जरुर करावेत, परंतु त्यासाठी प्रत्येकाने आपापली जबाबदारीची बंधने घालुन घ्यावीत, आपला आनंदोत्सव हा दुसऱ्याच्या दुखाःचे कारण होऊ नये असे वाटते.



गणेशोत्सव म्हणजे गोंधळ नव्हे,
कर्णकर्कश गोंगाट नव्हे
गुलालाची उधळण नव्हे, वाद्यांचा गजर नव्हे
हे आपण बदलू शकतो



नियंत्रित आवाजात माधुर्य असतं

**आवाजात नियंत्रण ठेवा**
**आनंद वाढवा**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
Website: http://mpcb.mah.nic.in

गुरुवार, दि. ०२.१०.२००८ सकाळी ७ ४० वा. आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर जागर पर्यावरणाचा



**हा विसर्जनाचा योग्य मार्ग नाही!**

हे चित्र आपण बदलू शकतो. कृपया शाडूच्या आणि नैसर्गिक रंगाच्या छोट्या मूर्तींचा आग्रह धरा.



**नवरात्री उत्सव**

**देवीची पूजा म्हणजे**
**निर्सगाची पूजा**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
Website: http://mpcb.mah.nic.in

काही सुधारणा करुन सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव अधिक चांगले आणि समाजोपयोगी आणि पर्यावरण हिताचे होऊ शकतात.

त्या अशा;

- प्लास्टर ऑफ पॅरीस पेक्षा शाडुच्या मूर्तीचा वापर करायचा.
- मूर्ती ही आणायचीच असल्यास लहान आकाराची आणावी.
- चकचकीत वॉटर कलर्स पेक्षा नैसर्गीक रंगानी रंगवलेली मूर्ती आणावी.
- गणेशमूर्ती न आाणता आपल्या हातांनी तयार केलेली ओरीगामी गणेशमूर्ती बसवावी.
- एक गाव एक मूर्ती ही योजना राबवावी.
- सजावटीसाठी अधीक वॅटचे विजेचे दिवे रोषणाई म्हणुन वापरु नयेत. समई किंवा दिव्यांची आरास करावी.
- गणपतीच्या सजावटी साठी थर्माकोल न वापरता विघटनशील कागद वापरावा.

ध्वनिवर्धकाचा वापर टाळावा. बँड, ढोल, ताशे इत्यादींचा वापर शक्यतो करुच नये.

- संभाव्य अपघातांचा विचार करुनच आयोजकांनी काळजी घ्यावी.

- उत्सव मंडळांनी वर्गणीच्या हिशेबाचा तपशील ठेवावा.

- धार्मीक सलोखा वाढावा यासाठी प्रयत्न करावे.

- उत्सव मंडळाची जागा उत्सवात आणि उत्सवा नंतर स्वच्छ ठेवावी

- शासनाची बंधने आणि सरकारी नियम पाळावेत.

- समाज प्रबोधनकारी कार्यक्रमाचे देखावे करावेत

- देशप्रेम भावना जागृतीसाठी काही ऊपक्रम करावेत

- शिस्तीचे वर्तन सर्व कार्यकत्यांनी ठेवावे

- अंधश्रद्धा निर्मुलनात्मक कार्यक्रम राबवावे.

- राजकारण आणि राजकारणि लोकांपासुन दुर रहावे
- सर्व वर्ग समावेशक असे ऊत्सवाचे स्वरुप असावे

- एकमेकाप्रती सहकार्याची भावना असावी.

- स्वतःच स्वतःच्या मंडळातील कार्यकर्त्यांना ट्रेनींग देऊन सुरक्षा अवलंबावी.

- रक्तदान, आरोग्यं शिबीरे तर घ्यावीच पण सोबत विज बचत, जैविक ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढवणे, प्रदुषण कमी करणे, इत्यादी आजच्या काळात आवश्यक ठरणाऱ्या बाबींचा प्रसार करावा, त्यासाठी त्या त्या क्षेत्रातील मान्यंवर व्यक्तींची व्याख्याने आयोजीत करावी.

- एखादे गाव वर्षभर दत्तक घेऊन त्याच्या विकासास हातभार लावावा.

- सौर ऊर्जेवरील कार्यक्रम राबवावे.

- अनेक गावात शिक्षक नसतात, तेथे एखाद्या हुशार गरजु व्यक्तीला रहाण्या खाण्याची व्यववस्था करु नेमणुक करावी.

- नगर परीषदांच्या शाळेत संगणक दान द्यावेत.

लोकांनीच सुज्ञपणे बदलत्या परिस्थितिचा विचार करुन उत्सवाप्रती विधायक दृष्टीकोण आज अवलंबणे हेच समाजास आणि पर्यावरणास हिताचे ठरणार आहे.

अशा अनेक गोष्टी अडचणी वर मात करुन जर अमलात आणल्या आपल्या देशात असे उत्सव होतात असे आपण अभिमानाने पुढील पिढीला सांगु शकु.

शेवटी गणपती ही विद्येचीच देवता आहे....
आणि देवी ही शक्तीची.....

हे भान आज प्रत्येकाने ठेवणे आवश्यंक आहे.

................समाप्तं.............

# मराठी संदर्भ सूची


| | | |
|---|---|---|
| १) प्र.न. जोशी | : | भारतीय एकत्मता सण आणी उत्सव.<br>शिव पब्लीकेशन.<br>मे १९९८. |
| २) ज.स. करंदीकर | : | श्री गणेशोत्सवाची साठ वर्षे.<br>अध्यक्ष गणेश मंडळ, पुणे.<br>इ.स.१९५३. |
| ३) सरोजनी बाबर | : | श्रावण भाद्रपद.<br>महाराष्ट्र राज्य लोकसाहीत्य निर्मीती.<br>मे १९८५. |
| ४) ऋग्वेदी<br>(वामन मंगेश दुभाषी) | : | आर्यांच्या सणांचा प्राचीन<br>आणि अर्वाचीन इतिहास.<br>गिरगाव प्रकाशन .<br>२२ एप्रिल १९१६. |
| ५) सौ. वैजयंती केळकर | : | आपले नवरात्र.<br>रोहन प्रकाशन, पुणे.<br>सप्टेंबर २०००. |
| ६) प्रा. मधु जाधव | : | भारतीय सण आणि उत्सव.<br>मनोविकास प्रकाशन, पुणे.<br>ऑगस्ट २००६. |

७) मंदा खारकर : वार्षिक सण व उत्सवाचा मुळारंभ.
मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे.
फेब्रुवारी २००२.

८) गणेश ल. केळकर : सात वार बारा महिने.
वसंत बुक स्टॉल प्रकाशन, दादर.
डिसेंबर १९९९.

९) पु. वि. हर्षे : सण आणि सुट्ट्या.
पुरुषोत्तम प्रकाशन, गिरगाव, मुंबई.
ऑगस्ट १९७९.

१०) दा. कृ. सोमण : आपले सण व उत्सव .
कॉन्सेप्ट बुक्स, पुणे.
मे २००७.

११) डॉ. प्रदीप आगलावे : संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे.
विद्या प्रकाशन, नागपुर.
१ जाने.२०००.

१२) कुंभोजकर ग.वि. : संशोधन पध्दती व संख्याशास्त्र.
फडके प्रकाशन, कोल्हापूर.
इ.स. १९९०.

१३) गजेंद्रगडकर व्ही. एन.: समकालीन समाजशास्त्रीय सिध्दांत.
फडके प्रकाशन, कोल्हापूर.

इ.स. २००१.

१४) कुमुदिनी रांगणेकर : भारतीय सण व उत्सव .

१५) सदानंद चेंदवणकर : भारतीय सण व उत्सव .

# हिंदी संदर्भ सूची

१) आहुजा राम : सामाजिक सर्वेक्षण एवं अनुसंधान.
रावत पब्लिकेशन, नई दिल्ली.
इ.स. २००३.

२) दोषी और त्रिवेदी : उच्चतर समाजशास्त्रीय सिध्दांत.
रावत पब्लिकेशन, नई दिल्ली.
इ.स. २००३.

३) कुँवर कन्हैया : हिंदुओंके व्रत और त्योहार.

४) महाराष्ट्र राज्यं साहित्यं संस्कृती मंडळ (संपा. महादेव शास्त्री जोशी) भारतीय संस्कृतिकोष .

## इंग्रजी संदर्भ सूची

1) Govt.of India : Census of India (1961) ( fairs & festivals of Maharashtra).

2) P. Thomas : Festivals & holidays of India.

3) Major C.H. Bulk : Faiths & Fairs & Festivals of India

4) B.N. Sharma : Festivals of India.


## नियतकालिके

| | | |
|---|---|---|
| १) अनंत पावस्कर | : | गरबो घुमतो जाय.<br>लोकप्रभा- १० ऑक्टोबर २००८.<br>पान नं.- १० . |
| २) संजीव पाध्ये | : | उत्सव ते फेस्टिव्हल .<br>श्री गजानन आशिष- सप्टेंबर २००८.<br>पान नं.- ११ |
| ३) संजीव पाध्ये | : | गणपती बाप्पा मोरया.<br>श्री गजानन आशिष- सप्टेंबर २००८.<br>पान नं.- १९ |
| ४) न्युज ब्युरो | : | बाप्पाच्या नावानं चांगभलं<br>श्री गजानन आशिष- सप्टेंबर २००८.<br>पान नं.- २१ |
| ५) विक्रम गोखले | : | टिळकांचा आत्मा तळमळत असेल<br>महाराष्ट्र टाइम्स- गणपती विषेशांक<br>२००८. पान नं – १४ |
| ६) डॉ. दिपक जयंत टिळक | : | सार्वजनिक गणेशोत्सव भरकटलेला नाही.<br>महाराष्ट्र टाइम्स- गणपती विषेशांक |

| | | |
|---|---|---|
| | | २००८ . पान नं – १४ |
| ७) स्मिता जयकर | : | परोपकाराची भावना जागवणारा सण महाराष्ट्र टाइम्स- गणपती विषेशांक २००८. पान नं – ५२ |
| ८) चित्रलेखा | : | १५ सप्टेंबर २००८. |
| ९) महानगरी वार्ताहर | : | सप्टेंबर २००८. |
| १०) लोकप्रभा | : | १२ सप्टेंबर २००८. |

## वेबसाईट्स

1) www.dictionary . sensagent.com

2) www.hindu website.com

3) www.godserver.com

4) www.envikipdea.org

5) www.nation master.com

6) www.sawal.ibibo.com

7) www.durgapujacom

8) www.lin kewords.com

9) www.rajasthan  info online.com

10) www.dir.com123 india.com

## वृत्तपत्रे

| | | |
|---|---|---|
| १) दुर्गे दुर्गट भारी...<br>मार्केट भरारी | : | सकाळ, मुंबई.<br>मंगळवार, ३० सप्टेंबर २००८. |
| २) मनीषा नित्सुरे | : | सण महाराष्ट्राचे.<br>महाराष्ट्र टाइम्स- १९ मार्च २००७. |
| ३) अपूर्वा जोशी | : | आओ रास रमवा आओ.<br>दै. नवशक्ति. दि. २६/९/२०००. |
| ४)प्रसाद मोकाशी | : | सार्वजनिक गणेशोत्सव.<br>सामाजिक उपक्रमांची धूळफेक.<br>लोकप्रभा ऑगस्ट-२००८. |
| ५) कैलास कोरडे | : | उत्सव सळसळत्या उर्जेचा.<br>लोकप्रभा-१४ सप्टेंबर २००८. |
| ६)संजीव साबळे | : | महाराष्ट्र टाइम्स<br>संवाद २८ सप्टेंबर २००८. |
| ७) महाराष्ट्र टाइम्स | : | मुंबई ३ सप्टेंबर २००८. |
| ८)प्रा. विद्याधर वालावकर | : | गणेश अवर फ्रेंड. लोकसत्ता चतुरंग .<br>१६ ऑगस्ट २००८. |

| | | |
|---|---|---|
| ९) श्रध्दा दामले | : | हे रंगलो.महाराष्ट्र टाइम्स<br>८ सप्टेंबर २००८ |
| १०) प्रवीण मुळे | : | नवी जागृती. संवाद महाराष्ट्र टाइम्स<br>३१ ऑगस्ट २००८. |

गोरेगाव परिसर विशेषांक : तरुण भारत.

केशव गोरे स्मारक ट्रस्ट : स्मरणिका .

**विषय:- गोरेगाव उपनगरातील गणेशोत्सव व नवरात्री उत्सवाचे बदलते स्वरुप : एक समाजशास्त्रीय अभ्यास .**

**(एम फिल – समाजशास्त्र)**

**(टिळक महाराष्ट्र विद्यापीठ –पुणे)**

## – मुलाखत अनुसूची –

**संशोधक** — **मुक्ता विनोद लव्हेकर**

**मार्गदर्शक** — **डॉ. विजय मारुलकर**

१) उत्तरदात्याचे नाव :– ————————————————————-
———-

२) पुर्ण पत्ता :–
————————————————————————
————————————————————————

३) वय :- ————

४) लिंग :-

अ) स्त्री ☐ ब) पुरुष ☐

५) धर्म :-

अ) हिंदु ☐ ड) जैन ☐

ब) मुस्लीम ☐ इ) पारशी ☐
क) शिख ☐ फ) इतर ☐

६) वर्गवारी :-
अ) खुला वर्ग ☐ ब) अनुसुचित जाती ☐
क) अनुसुचीत जमाती ☐ ड) भटके विमुक्त ☐
ड) इतर ☐

७)वैवाहीक दर्जा :-
अ) विवाहीत ☐ ब) अविवाहीत ☐
क) विधूर ☐ ड) विधवा ☐
इ) घटस्फोटीत ☐

८)शैक्षणीक दर्जा :-
अ) बारावी ☐ ब) पदविधर ☐
क) पदव्युत्तर ☐ ड) इतर ☐

९)व्यवसाय:–
अ) नोकरी ☐ ब)खाजगी व्यवसाय ☐

१०)कुटुंबाचा प्रकार
अ) संयुक्त कुटुंब ☐ ब) केंद्र कुटुंब ☐

## विभाग (अ) – गणेशोत्सव

११) मंडळाचे नाव :– ——————————————————-

१२) स्थापना वर्ष :– ——————————

१३) मंडळा मधील कायक्रमाचे स्वरुप :–

अ) सांस्कृतीक कार्यक्रम ☐ ब) व्याख्याने ☐

क) महीला-मुलांसाठी स्पर्धा ☐ क) रक्तदान ☐

ड) समाज प्रबोधन ☐ ई) संगीत स्पर्धा ☐

१४) मंडळाकडे वर्षाला वर्गणी किती जमा होते? :– ——————-
———–

अ) गोळा होणाऱ्या वर्गणीत दरवर्षी वाढ होते का? :– ————————–

ब) होत असेल तर किती प्रमाणात होते ? :– ——————————————-

१५)विशिष्ट वर्गणीच्या रकमेची सक्ती केली जाते का ?

अ) होय ☐ ब) नाही ☐

१६) कमीत कमी किती वर्गणी घेतली जाते ? :– ————————–

१७) तुमचेमंडळ कोणत्या राजकीय पक्षाशी निगडीत आहे ? :–

अ) शिवसेना ☐ ब) भा.ज.प. ☐

क) म.न.से. ☐ ड) काँग्रेस ☐

ड) अ.प.क्ष. ☐ ई)राष्ट्रवादी ☐

फ) इतर ☐

१८)राजकीय पक्षाचे नेते आर्थीक मदत करतात का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

१९)कोणत्या कार्यक्रमासाठी वर्गणीचा जास्तं विनीयोग केला जातो ? :–

अ) सांस्कृतीकम कार्यक्रम ☐ ब) सजावट ☐

क) मिरवणुक ☐ ड) देणगी ☐
ई) पाहुण्यांची सरबराई ☐

२०) मंडळाचा जमा खर्चाचा तपशील ठेवला जातो का? :–
अ) होय ☐ ब) नाही ☐

१) ठेवला जात असेल तर कोणत्या प्रकारे? :– ————————————
२) खर्चाच्या तपशीलाची हिशेब तपासणी होते का ? :–
अ) होय ☐ ब) नाही ☐

२१) प्रतिवर्षी होणाऱ्या कार्यक्रमात कोणत्या कार्यक्रमावर अधीक खर्च केला जातो ? :–
अ ) सजावट ☐ ब) मिरवणुक ☐
क) वाहतुक ☐ ड) गणेशमुर्ती ☐
ई) मंडप ☐ फ) इतर ☐

२२) मंडळाच्या सुरक्षेसाठी पोलीस बंदोब्स्ताची आवश्यकता भासते का ? :–
अ) होय ☐ ब) नाही ☐

२३) गरज भासत असल्यास खर्च कोण करतं ? :–
अ) मंडळ ☐ ब) पोलीस खाते ☐
क) राजकीय पक्ष ☐

२४)पुर्वीच्या आाणी आताच्या सुरक्षीततेत कोणता बदल झालाय ? :–
अ) पुर्वी पोलीस बंदोब्स्ताची गरज भासत न्हवती ☐
ब) आता पोलीस बंदोब्स्ताची गरज भासते ☐

२५) प्रतिवर्षी आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीच्या आकारमानात किती फरक असतो ? :–

अ)लहान ☐ ब) मोठा ☐

क)आकार सतत बदलतो ☐

२६) कोणत्या प्रकारच्या मूर्तीचा आग्रह धरता ? :–

अ) शाडु ☐ ब) प्लास्टर ऑफ पॅरीस ☐

२७) मूर्ती कोणत्या प्रकारच्या घेतल्या जातात ? :–

अ) पारंपारीक ☐ ब) आधुनीक ☐

२८)कोणत्या प्रकारची ध्वनी यंत्रणा वापरली जाते ? :–

अ) स्पीकर्स ☐ ब) डॉल्बी ☐

क) डिजीटल ☐

२९) डॉल्बी/डिजीटल चा वापर कधी पासुन सुरु केला ?

:————————

३०) गणपती समोर जास्त प्रमाणात काय लावले जाते ? :–

अ) गाणे ☐ ब) स्तोत्र ☐

क) संगीत ☐

३१) गणेश मूर्तीचे विसर्जन कसे करता ? :–

अ) समुद्रात ☐ ब) कृत्रीम तलावात ☐

क) दान करतो ☐

३२) नीर्माल्याचे विसर्जन कसे करता ? :–

अ) मूर्तीसोबत वीसर्जन ☐ क) दान ☐

३३) तुमच्या मते मिरवणुक किती तासांची असावी ? :———————-

३४)गणेशोत्सवात सर्व धर्मीयांचा सहभाग असतो का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

३५) हा उत्सव म्हणजे पैशाचा अपव्यय आहे असे वाटते का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

———————————————ooooo——————————————————

## – मुलाखत अनुसूची –

## विभाग (ब) – नवरात्रीउत्सव

११) मंडळाचे नाव :– ——————————————————-

१२) स्थापना वर्ष :– ——————————

१३) मंडळाची स्थापना करण्यामागे हेतु काय होता ? :–

अ) धार्मीक ☐ ब) मनोरंजन ☐

१४) मंडळातील मूर्तीचा आकार (ऊंची ) किती असते ? :–

अ) लहान ☐ ब)मोठा ☐

१५) मूर्ती कोणत्या प्रकारच्या घेतल्या जातात ? :–

अ) पारंपारीक ☐ ब) आधुनीक ☐

१६) मूर्तीचा आकार दरवर्षी वाढतो का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

१७) मंडळ वर्गणी घेते का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

१) घेत असल्यास किती ? :–————————–

२) वर्गणीची रक्कम दरवर्षी वाढते का ? :-

अ) होय ☐ ब) नाही ☐

१८) सर्वात जास्तं खर्च कशावर होतो ?:–

अ) मुर्ती ☐ ब) डि.जे. ☐

क) विद्युत रोषणाई ☐ क) पाहुणे कलाकार ☐

ड) खाण्याची व्यवस्था ☐ फ) संगीत ☐

१९) मंडळाच्या जागेवरच गरबा खेळला जातो का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

२०) किती वाजल्या पासुन गरब्यास सुरवात होते ? :————————

२१) शासनाची वेळेची बंधने पाळली जातात का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

२२) कुठल्या प्रकारच्या नृत्य प्रकारास प्राधान्य दिले जाते ? :–

अ)गरबा ☐ ब) भोंडला ☐

क) दांडीया ☐ ड) झिम्मा फुगडी ☐

ई) सर्व एकत्र ☐

२३) नृत्या दरम्यान असभ्य वर्तनाचे प्रकार होतात का? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

१) असल्यास त्यावर मंडळ नियंत्रण घालते का ? :—

अ) होय ☐ ब) नाही ☐

२४) पोलीस सुरक्षा घेतली जाते का ? :–

अ) होय ☐ ☐ ब) नाही

२५) मद्यधुंद लोकांना प्रवेश दिला जातो का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

२५) बिभत्स नृत्य करणाऱ्यांवर कारवाई केली जाते का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

२७)प्रवेश फी चे पास असतात का ? : –

अ) होय ☐ ब) नाही ☐

१) असल्यास किती रकमेचे ? :——————

२) दरवर्षी रकमेत वाढ होते का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

२८)खाण्या पिण्याची सोय मंडळ करते का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

२९) रोज वेगळा पेहराव घालण्याची सक्ती असते का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

३०) नृत्यात सामील झालेल्यांसाठी स्पर्धा असतात का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

३१) गरबा कुठे खेळला जातो ? :–

अ) देवीच्या मुर्तीसमोर ☐ ब)रेस्टॉरंट मधे ☐

क) मैदानात ☐

३२ ) गरबा व नवरात्रीउत्सव एकच आहेत का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

३ ३) नवरात्रीउत्सवात मराठी नृत्य प्रकारास प्राधान्य द्यावे का ? :–

अ) होय ☐ ब) नाही ☐

३ ४)मराठी दांडीया हा पप्रकार तुम्हाला कसा वाटतो ? :–

अ) चांगला ☐ ब) वाईट ☐

३ ५) हा उत्सव साजरा करणे म्हणजे पैशाचा अपव्यय आहे असे तुम्हाला वाटते का ? :–

अ) होय ☐ ☐ ब) नाही ☐

३ ६) उत्सव साजरा करण्याचे स्वरुप कसे असावे ? :–

अ) दिखावेगिरीला प्राधान्य ☐ ब) पुजा ☐

३ ७) पारंपारिक पध्दातिला फाटा देऊन नवीन कोणते प्रकार अस्तित्वात आले आहेत ? :–

अ) उत्सव साजरा करणे ☐ ब) नृत्य करणे ☐

३ ८) देवीच्या मुर्तीच्या विसर्जनाची पध्दत कशी आहे ? :–

अ) समुद्रात ☐ ब) कृत्रीम तलावात ☐

तथ्य संकलकाचे नाव

मुक्ता विनोद लव्हेकर.